# अभंगाञ्जलि

नारायण वामन टिळक

TRACT AND BOOK SOCIETY,
KALBADEVI ROAD, BOMBAY

# अभंगाञ्जलि

Poems of Rev. N. V. TILAK, Vol. II

# टिळकांची कविता

## पुस्तक दुसरें

# अभंगाञ्जलि

---

संपादक

रे. भास्कर कृष्ण उजगरे

---

किंमत १० आणे

---

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क रा. देवदत्त नारायण टिळक यांनीं राखून ठेविले आहेत )

Printed by K. R. Mitra, at the Manoranjan Press, 3 Sandhurst
Rd., Girgaon; & Published by Rev. J. Smith, M. A.,
Secretary, Bombay Tract & Book Society,
Kalbadevi Rd., Bombay

कवीच्या इच्छेनुरूप हें पुस्तक

**सर नारायण चंदावरकर**

यांस

अर्पण केलें आहे

# प्रस्तावना

युद्धोद्भव बिकट परिस्थितीमुळें टिळकांच्या कवितेचें पहिलें पुस्तक तेवढें प्रसिद्ध करून दुसऱ्या पुस्तकाची नुसती चिंतनिका करीत पुणें येथें मी ईश्वरपरिज्ञानाचा अभ्यास करण्यांत गढून गेलों होतों. पुढें ता. २ फेब्रुएरि सन १९१७ या दिवशीं माझी अलिबाग येथें नेमणूक झाली. या सालचे उन्हाळ्यांत मीं 'टिळकांची कविता पुस्तक दुसरें' या भक्तिपर काव्यग्रंथाची बहुतेक जुळवाजुळव करून ठेविली होती; परंतु त्याच वर्षीं ज्ञानोदय पत्रांतून 'अभंगांजलि' या नवीन सदराखालीं विविध विषयांवर अत्यंत रसाळ, प्रसादपूर्ण, हृदयंगम अभंग प्रसिद्ध होऊं लागले. रे. मि. टिळक फार तर अभंगांचे १०० अंजलि ज्ञानोदयाच्या वाचकांस देऊन रिकामे होतील या समजुतीनें अभंगांजलि हें नवीन प्रकरण या भागांतच समाविष्ट करावें असें मला वाटतें. खुद्द कवीनेंहि त्याला अनुमति दिली. हा अभंगांजलि पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यासंबंधानें एका आंग्ल मिशनरी बंधूनें माझ्याजवळ सक्रिय सहानुभूति प्रदर्शित केली असतां मीं त्यांस आपला पूर्वोक्त निश्चय सांगितला. सांप्रत हा अभंगांजलि जवळजवळ ३०० पर्यंत गेला असल्यामुळें या अंजलींतील परम रमणीय पुष्पें एकत्र गुंफून तो काव्यहार रसिक महाराष्ट्राला सादर करावा असें मला वाटूं लागलें.

'टिळकांची कविता पुस्तक पहिलें' या पुस्तकावर अभिप्राय देतांना सुबोधपत्रिकेचे संपादक ह्मणतात, कीं 'टिळक हे कवि

असले, तरी ते धार्मिक कवि आहेत. धर्म हा विषय त्यांस सर्वांहून प्रिय आहे. तेव्हां आज प्रसिद्ध झालेल्या भागांत ज्याप्रमाणें त्यांच्या विशिष्ट धर्माचा कोठेंहि उल्लेख सांपडत नाहीं, त्याप्रमाणें दुसऱ्या पुस्तकांत होणें जरी शक्य नाहीं, तरी कविताप्रिय जनांस त्यांच्या कवितेचा दुसरा भाग अधिक आवडण्याचा संभव आहे.' त्याचप्रमाणें या पुस्तकावर अभिप्राय देतांना जगाच्या परिचयाचा संदेश काय ह्मणतो आहे हेंहि अवश्य पाहण्यासारखें आहे. 'वास्तविक पाहिलें कीं, रे. टिळक जी जी कविता लिहितात त्यांत रसाचा इतका ओलावा असतो कीं, त्यामुळें त्यांच्या कवितेंत जी जी मनोवृत्ति ग्रथित झालेली असेल तिला पाझर फुटून तिच्यामुळें वाचकांचें हृदय सद्गदित झाल्यावांचून रहात नाहीं. भक्तिरसाची भट्टीही रे. टिळकांना अत्युत्तम साधते व 'वेडा झालों खरा' वगैरे त्यांचीं जीं अत्युत्तम पद्यें आम्हीं अवलोकन केलेलीं आहेत त्यांवरून भक्तिरसानें हृदयाचें काठिन्य सर्वथैव विरघळून टाकण्याचें अत्युत्कृष्ट सामर्थ्य त्यांच्या कवितेंत आहे हें आम्हीं आनंदानें निवेदन करितों.'

हें असो. पण एकतारी, किंवा चिपळ्या घेऊन रस्त्यानें गाणीं म्हणत जाणारे भिकारी टिळकांच्या 'भजनसंग्रहां'तील कविता तन्मय होऊन ह्मणतात ही मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होय. या 'भजनसंग्रहा'नें परलोकवासी संत–मिशनरी रे. एच्. जी. बिसेल यांच्यासारख्या परदेशस्थ गृहस्थालाहि केवळ वेडें करून सोडिलें होतें; आणि त्यांच्या भक्तिपूर्ण भजनांनीं पुष्कळ ख्रिस्तीतर लोकांना वेड लाविलें होतें. आपला आपलेपणा सोडून साहेबमडम बनूं पाहणाऱ्या कांहीं मूठभर व्यक्ति सोडल्या तर महाराष्ट्रांतील झाडून साऱ्या

भाविक ख्रिस्ती लोकांना या एका पुस्तकानें किती तरी तल्लीन करून सोडिलें आहे. अशुद्ध वर्णोच्चारानें पण मोठ्या भक्तिभावानें टिळकांच्या 'भजनसंग्रहां'तील गाणीं ह्मणत असलेले खेडवळ किती रंगून जातात याचा अनुभव ज्यांस असली मंडळी पाहावयास सांपडली असेल त्यांनाच येणार आहे. 'ज्या दिवशीं श्रीमद्भागवताप्रमाणें श्रीनत्ख्रिस्त-चरित्राचें या देशांत काव्यपात्रांमधून लोटचे लोट वाहवूं लागतील, ज्या दिवशीं शेंकडों ख्रिस्तशिष्यांचीं चरित्रें पुराणोपपुराणांप्रमाणें सर्व देशभर होतील, ज्या दिवशीं ह्या काव्यांतला, ह्या पुराणांतला निर्मळ, गोड, नवजीवनप्रद भक्तिरस, गानवादनवक्तृत्वाच्या कीर्तनाभिध त्रिवेणीसंगमांतून महापुरासारखा वाहूं लागेल, ज्या दिवशीं अनेक ख्रिस्ती भक्तांनीं, स्वतां ईश्वरचरणीं तादात्म्य झालेलें असतां, गाई-लेलीं साधीं, परंतु मनाला आकर्षून घेणारीं भजनें, वासंतिक वायूनें जशा वृक्षलता डोलवाव्या, त्याप्रमाणें जनतेस डोलवूं लागतील, त्या दिवशीं हिंदुस्तानांत ख्रिस्ती धर्माचा पाहुणेपणा जाऊन तो येथलाच झाला असें समजावें.' भजनी मेळ्यांचा प्रसार जितका अधिक होईल तितकें ख्रिस्ती धर्माचें पाऊल पुढें पडत जाईल यांत मला तरी मुळींच संशय वाटत नाहीं; शिवाय या प्रकारचा मार्ग आक्रमण करण्याला आमच्याजवळ 'भजनसंग्रह' हा मार्गदर्शक दीपक टिळकांनीं आपल्या उज्ज्वल प्रतिभेनें लावून दिला आहे. या 'भजन-संग्रहा'नें भाषा सुधारेल, लोक भजनशील होतील आणि त्यांच्या वृत्ति काव्यमय बनत जातील. परमेश्वरानें टिळकांसारख्या कवि-श्रेष्ठाला प्रेरणा करून असली लोकोत्तर कामगिरी त्यांच्याकरवीं करून घेतली हें अशेष ख्रिस्ती समाजाचें महद्भाग्य समजलें पाहिजे.

ख्रिस्ती लोकांच्या 'उपासनासंगीतां'त रे.मि. टिळक यांच्या बऱ्याच उत्कृष्ट भक्तिपर काव्यांचा अंतर्भाव झाला आहे. ह्या काव्यांचें परिशीलन करून त्यांतील कित्येकांस बेमालूम आंग्ल पेहराव चढविणारे विद्वान्, रसिक मिशनरि रे. डॉ. एन्. मॅक्निकल् एम्. ए., हे 'International Review of Missions' नामक एका भारदस्त नियतकालिकांत 'Hindu Devotional Mysticism' या शिरोलेखाचे शेवटीं रे. मि. टिळकासंबंधीं आणि त्यांच्या भक्तिपर कवितेसंबंधीं जे उद्गार काढीत आहेत ते चिन्तनीय आहेत:—

'As regards the Church in the Marathi area there is one indication at least that this mystic Spirit is finding in Christ its home, its 'Mother's house.' Mr. N. V. Tilak is not only a leader in the Christian Church but a poet of the true stock of Tukaram and Kabir. He has the same love for the things of nature and of daily experience round about him that they had and the same insight into their inner significance. And he has the same desire also for fellowship with God. The hymn-book of the Christian Church has been enriched by him in many directions, but in none more remarkably than in those hymns that treat of life in Christ and communion with God. The Christian community as they use these hymns enter by their means into inheritance that has been infinitely enriched by its consecration in Christ Jesus. Surely much may be hoped in the future from such a soil with such an enrichment.'

(मराठी भाषेच्या क्षेत्रामधल्या चर्चेकडे पहातां निदान एक गोष्ट निदर्शनास येते, ती ही कीं, ही साक्षात्काराची भावना [ Mystic Spirit ] खिस्ताला आपलें गृह, आपलें 'माहेर' करून घेत आहे. मि. एन्. व्ही. टिळक हे खिस्ती चर्चमधले एक पुढारी आहेत इतकेंच नाहीं, तर ते खरोखर तुकाराम आणि कबीर यांच्या वर्गांत येणारे कवि आहेत; त्यांच्याठायीं सृष्टीविषयीं व स्वतांच्या परिवारांतल्या नेहमींच्या अनुभवांविषयीं जो प्रेमभाव होता, तोच यांच्या ठायीं असून, त्यांना जसें त्यांच्या गर्भितार्थाचें अन्तर्ज्ञान होतें तसेंच यांनाहि आहे. यांची ईश्वराशीं योग पावण्याची उत्कंठासुद्धां त्यांच्यासारखीच आहे. मि. टिळक यांनीं खिस्ती चर्चेच्या 'उपासनासंगीता'ला अनेक मार्गांनीं संपन्न केलें आहे, तथापि खिस्तान्तर्हित जीवित आणि ईश्वराशीं योग या विषयांवरच्या त्यांच्या गीतांनीं ही संपन्नता जितकी आली आहे, तितकी दुसऱ्या कशानेंहि आलेली नाही. या गीतांचा उपयोग करीत असतांना यांच्या योगानें खिस्ती जनता आपल्या वतनांत प्रवेश करीत असून हें वतन खिस्तामध्यें सुप्रतिष्ठित झालेलें असल्यामुळें अनंत पटींनीं संपन्न झालेलें आहे. असली जमीन आणि असला पुरवठा असल्यावर निःसंशय पुढची आशाहि तशीच मोठी असणें साहजिक आहे.)

सारांश, रे. डॉ. एन्. मॅक्निकल् यांच्याप्रमाणें सर्व मिशनरी बंधुभगिनींनीं टिळकांच्या कवितेकडे विशेष लक्ष देऊन तिचें परिशीलन केलें पाहिजे. कारण केसरीच्या माजी संपादकांच्या म्हणण्याप्रमाणें टिळकांच्या कवितेमध्यें पूर्व आणि पश्चिम यांचें संमेलन झालें आहे. खिस्ती जीविताचेंहि चित्र किंबहुना या दोन जीवितांच्या नितान्त सुंदर संमे-

त्नाचे संध्याराग त्यांच्या काव्यप्रवाहांत प्रतिबिंबित झाले असल्या-मुळें पूर्वेंप्रीत्यर्थ धर्मप्रसाराचें कार्य करणाऱ्या पाश्चात्य मिशनरींना टिळकांच्या कवितेचें फार साह्य होईल यांत शंका नाहीं. हिंदवासी. यांचा हिंदीपणा कायम ठेवून त्यांचें ख्रिस्तीपण विशेष उज्ज्वल कर-ण्याचा मार्ग टिळकांनीं आपल्या काव्याच्या द्वारा दाखविला आहे. त्याचें ज्ञान करून घेणें ख्रिस्ती लोकांप्रमाणेंच पाश्चात्य मिशनरींचेंहि कर्तव्य आहे. येथपर्यंत टिळकांच्या भक्तिपर कवितेसंबंधानें विद्वान् लोकांचें काय म्हणणें आहे आणि सांप्रत लौकिकांत तिला कोणतें अधिष्ठान प्राप्त झालें आहे इत्याहिं गोष्टींचें मीं यथामति विवेचन केलें; आतां प्रस्तुत पुस्तकाकडे वळतों.

अभंगांजलि भावनाप्रधान आहे, त्यामध्यें कल्पनेचें पूरण फारसें नाहीं. भावनाप्रधान कविता बहुधा एकच अलंकार धारण करते आणि तो अलंकार स्वभावोक्ति. कल्पनाप्रधान काव्यें आणि भावना-प्रधान काव्यें यांमध्यें मोठें अंतर असतें. कल्पनाप्रधान काव्यांत कवीला ज्या विषयावर कविता करावयाची त्याचा प्रत्यक्ष अनुभव नसला तरी चालतें व दुसरें बहुधा त्याच्या स्वतःच्या अनुभवानें प्रेरित असतें. प्राचीन महाराष्ट्रकविशिरोमणि संत तुकाराम याची कविता भावनाप्रधान आहे, कारण तिचा पाया अनुभूति हाच असून तीहि परोक्षानुभूति नव्हे तर अपरोक्षानुभूति आहे. मला वाटतें कीं, कल्पनाप्रधान, भावनाप्रधान आणि वाक्चातुर्यप्रधान या तीन प्रका-रच्या काव्यांमध्यें पहिला प्रकार हेंच खरें काव्य होय असें शतशः लोक ह्मणत आले तरी लाखों लोकांच्या मनांवर सत्ता आहे ती भावनाप्रधान कवितेचीच. सर्व संस्कृत कवींचा गुरू कालिदास

याच्या व एकंदर संस्कृत कवींच्या काव्यांत श्रेष्ठ काव्य ह्मणजे त्याचें शाकुंतल. त्यांत चौथा अंक श्रेष्ठ आणि त्यांतलेहि चार श्लोक अत्यंत श्रेष्ठ असें रसिकांचें सर्वसाधारण मत आहे. श्रेष्ठत्वाच्या शिखरास जाऊन पोहोंचलेल्या या चार श्लोकांस हें पद कल्पनेनें दिलें नसून भावनेनेंच दिलें आहे.

अभंगांजलि ह्मणजे अभंगांची ओंजळ. हें एक काव्य नाहीं, याचा विषय एक नाहीं. ज्याला स्फुट ह्मणतात तसें हें खरोखरी स्फुटच आहे, हें ज्यांनीं ज्ञानोदयाचे गेल्या एकदोन वर्षांचे अंक वरवर चाळले असतील त्यांच्या सहज लक्षांत येईल. पुष्पहार गुंफीत असतांना तो विशेष शोभिवंत दिसावा एतदर्थ मालाकारास सुंदर, सुवासिक कलिका, कुसुमें आणि हिरवींगार पानें इत्यादि आवश्यक पदार्थ क्रमवार गुंफावे लागतात. तसें मलाहि या ठिकाणीं या अभंगांचे अंजलि थोड्याशा क्रमानें महाराष्ट्र रसिक जनांस सादर करावयाचे आहेत. 'थोड्याशा क्रमानें' ह्मणण्याचें कारण हें आहे, कीं या अभंगांजलींतील बरेच अभंग कोणत्या विवक्षित विषयांखालीं आणावे हें कळणें कठीण आहे ह्मणून ही कामगिरी ज्याची त्यानेंच करावी अशी माझी रसिक वाचकांस सविनय विनंति आहे. तरी अभंगांजलि ह्मणजे काय असा एक प्रश्न उद्भवतोच. त्याला माझें हें उत्तर आहे, कीं कवि टिळकांच्या प्रतिभावल्लीचीं व प्रतीतिवल्लीचीं खालीं विखरणारीं पुष्पें ह्मणजे अभंगांजलि; अध्यात्म साक्षात्काराच्या उत्तुंग धवलगिरीवर मनुष्याला विद्युद्वेगानें नेऊन पोंचविणारें विमान म्हणजे अभंगांजलि; असार संसाराच्या संतापानें संतप्त होऊन ग्लानि आलेल्या रुग्णाला निरामय

करणारी संजीविनी मात्रा ह्मणजे अभंगांजलि; अमावास्येची काळी-कुट्ट रात्र पडली असतां निबिड अरण्यांत बसून भक्तानें अत्यंत शांत अंतःकरणानें व सद्गदित मुक्तकंठानें केलेला देवाच्या मंगल नामाचा जयघोष ह्मणजे अभंगांजलि; कोडग्या बालकानें आईचा मार खातखात तिला बिलगून तिच्याशीं केलेला गोड संवाद ह्मणजे अभंगांजलि; सुखदुःख, आशानिराशा, जयापजय इत्यादिकांस दूर सारून भक्तानें देवास मारलेली मगरमिठी ह्मणजे अभंगांजलि; खिस्तिगुरुमाउलीचा अतिनिकट स्नेह संपादून तिजमध्यें प्रवेश करण्याची अशरीरिणी विद्या म्हणजे अभंगांजलि; अज्ञात ज्ञाताच्या प्रांतांत प्रवेश करून त्या दिव्य भूमींतील प्रफुल्ल पुष्पांची, भक्ति-रज्जूंत–आत्मानुभूतींत–गोंविलेली वनमाला म्हणजे अभंगांजलि.

वर सांगितल्याप्रमाणें अभंगांजलि भावनाप्रधान असून त्याचें मीं जें हें स्वरूप वर्णिलें आहे तेंहि भावनाप्रधान अशाच शब्दांनीं वर्णिलें आहे. कारण, भावेन भावः ! दुसरें काय ? हे अभंग वाचीत असतां रसिक भक्तांच्या अनुभूतिपूर्ण भावना कविहृदयाशीं संगत होऊन या अभंगांचें रहस्य, यांची थोरवी, यांतून सदा धांवत असणारा प्रसाद, खिस्ताचें आणि खिस्ती धर्माचें या अभंगांतून व्यक्त होणारें उदात्त स्वरूप, यांत प्रतीत होणारे अध्यात्म अनुभव इत्यादि विषय अज्ञातांतून ज्ञातांत, वेदांतांतून धादांतांत, अंधारां-तून प्रकाशांत, नाहींतून आहेंत, सारांश, परोक्षांतून अपरोक्षांत, अमूर्तत्वांतून मूर्तत्वांत उभे केले आहेत, असें वाटल्यावांचून कदापि राहणार नाहीं. शब्दसृष्टीच्या तरल लहरींवर जन्म पावून तन्मय होऊन नाचूं, गाऊं, लागणाऱ्या आत्मानुभूतिगायिकेची, शुभ्रवस्त्र-

परिधान केलेली, अंधुक आकृति ज्यांच्या अविकृत भक्तिमत्तेच्या उज्ज्वल प्रतिभेला भासमान होईल त्यांनाच माझ्या वरील विधानांची सत्यता पटेल.

यांतले जे अभंग नीट समजण्याला प्रसंग समजण्याची गरज आहे असें मला वाटलें, त्यांचें प्रसंग दिले आहेत. कित्येक अभंगांचे प्रसंग देतां आले नाहींत; कारण ते सांगण्याची कवीची इच्छा नाहीं. कित्येक अभंग ह्मणजे निःसंशय सांसारिक सुखांचे पक्के गुलाम होऊन धर्मप्रसाराचें काम करणाऱ्या लोकांना ओढलेले कोरडेच आहेत! मात्र हे कोरडे लगावणाराची वृत्ति 'निस्पृहस्य तृणं जगत्' याप्रमाणें तर असलीच पाहिजे, पण याशिवाय त्या वृत्तींत योहान्न २:१४–१७ यांत वर्णिलेल्या 'पवित्र संतापाचें' पूरण आहे हें, हे अभंग वाचणाऱ्याच्या सहज लक्षांत येईल. यांत हें पूरण आहे, हीच यांची खरी मौज आहे. हिच्याखातर व हे अभंग वाचून ज्यांना ते लागू पडतील अशा व्यक्ति थोड्याबहुत शुद्धीवर आल्या तर पाहाव्या म्हणून मीं यांचाहि संग्रह करण्याचें धाष्टर्य केलें आहे. धाष्टर्य म्हणण्याचें कारण आमच्या पुष्कळ लोकांना विशेषतः स्वतःसंबंधानें साऱ्या 'गूडि गूडि थिंग्ज' हव्या असून, साऱ्या जगाला ठाऊक असा त्यांचा एकादा लहानसा दोष दाखविला, तरी त्यांच्या अंगाची लाही लाही होत असते. असल्या अभंगांचे प्रसंग दिले नाहींत, ते जगाला सांगावे अशी कवीची इच्छा नाहीं. हे प्रसंग कवि देवाला सांगत असतो. एकदां कवीनें पत्रव्यवहार करितांना खालीं दिलेली ईशप्रार्थना माझ्याकडे पाठवून दिली. ती मीं जशीच्या तशी येथें देतों:—

'बापा, तुझ्या नांवानें स्वतः राज्य करणारे, तुझी सेवा हें द्रव्यार्जनाचें साधन करणारे तुझ्या खालोखाल स्वतःला सर्वज्ञ सम-

जणारे, माझ्या देशाची अन्तःकरणपूर्वक अवहेलना करीत असून त्याचें तारण करूं पाहणारे, आमचें एक राष्ट्रान्तर्गत गुलामांचें राष्ट्र बनविणारे असले धर्मप्रचारक तूं येथून हांकलून दे किंवा त्यांचा पूर्णपणें पालट कर!' असे लोक थोडे आहेत, पण कवि ह्मणतो, येशूचा विश्वासघात करणारा यहूदा इस्करयोते बारांमधें एकच होता! साऱ्या दुनयेच्या प्रतीतीस आलेला जर्मन कैसर एकच आहे! महाराष्ट्र-संत तुकाराम याचा हा असल्या लोकांविषयींचा संताप पाहा!

भोंदावया मीस घेउनी संताचें,
करी कुटुंबाचें दास्य सदा;
मनुष्याचें परी बोल रावा करी,
रंजवी नरनारी जगामध्यें;
तिमयाचा बैल करी शिकविलें,
चित्रींचें बाहुलें गोष्टी सांगे;
तुका ह्मणे देवा जळो ही महंती,
लाज नाहीं चित्तीं निसुगातें;

*　　　*　　　*

संतचिन्हें लेउन अंगीं । भूषण मिरवति जगीं,
पडले दुःखाचे सागरीं । वहावले ते भवपुरीं
काम क्रोध लोभ चित्तीं । वरि वरि दाविती विरक्ती
आशापाशीं बांधुन चित्त । ह्मणति झालों आह्मीं मुक्त
त्यांचे लागले संगती । झालि त्यांची तीच गति !
तुका ह्मणे शब्दज्ञानें । जग नाडियेलें तेणें

*　　　*　　　*

बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे
कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग
टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेउन चेपी घांटी
तुका ह्मणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजती यमदंड

दंभपरिस्फोटाखेरीज अभंगांजलींत कांहीं अभंग आहेत. त्या-संबंधानें खुद्द कवीनेंच प्रत्युत्तरादाखल आपलें ह्मणणें प्रसिद्ध केलें आहे. तें मी शब्दशः येथें देतों.

' " धन्य धन्य माझ्या जन्मभूमीची कुशी ! ! उपजे महर्षी, संत, मुनी ! " हा आमचा अभंग वाचून आह्माला एक ख्रिस्ती बंधु उपदेश करीत आहेत कीं, तुह्मी ख्रिस्तीपणाचें पांघरून फेंकून देऊन एकदम प्रार्थना-समाजिस्ट किंवा हिंदु व्हा ! तुमचें हें दुटप्पी वर्तन पुरें झालें. आह्मांला आमच्या या बंधूची कींव येते. आम्ही हिंदी आहों, हिंदी वाङ्मयाचा, हिंदी महात्म्यांचा आह्माला अभिमान असणें साहजिक आहे. तरी नुसत्या अभिमानामुळें आम्ही त्यांची स्तुति करितों असें कोणी समजूं नये. तुकाराम, ज्ञानेश्वर हे एक वेळ आमचे गुरु होते, व आतां आम्ही त्यांचे शिष्य नसलों तरी त्यांना हे माझे पूर्वगुरु ह्मणून कृतज्ञतापूर्वक मान देत आहों. "माझ्या मागें या," "माझें जूं घ्या,' "मजसारखे व्हा," "मजमध्यें राहा, ह्या ख्रिस्तोपदेशश्रेणीचा खरा अर्थ आमच्या लक्षांत आणून दिला, तो समीपता, सलोकता, सरूपता, सायुज्यता ह्या हिंदु तज्ज्ञांनीं मानिलेल्या व हिंदु भक्तांनीं अनुभविलेल्या भक्तियोगाच्या परंपरेनें ! आणखीं असे पुष्कळ अनुभव सांगतां येतील, पण ते सांगितले

असतां आमचे हे धर्माभिमानी बंधु अधिकच खवळतील, ह्मणून येथेंच थांबून आम्ही यांना व आमच्या इतर खिस्ती बंधुभगिनींना मान्य अशा कित्येक खिस्तशिष्यांचे अनुभव सांगतों.

सॉक्रेटिस हा खिस्ती नव्हता, अस्सल ग्रीक मूर्तिपूजक होता. इरॅस्मस तर आपल्या प्रार्थनापद्धतींत, त्याची गणना इतर खिस्ती संतांबरोबर करून "हे पवित्र सॉक्रेटिसा, आह्माप्रीत्यर्थ प्रार्थना कर!" अशी त्याची विनंति करीत आहे! "मला खिस्ताकडे आणून घालणारा प्लेटो असून त्याची माझी ओळख झाली म्हणून मी देवाचा ऋणी आहें" हें ऑगस्टिनचे शब्द आहेत. थॉमस ॲक्विनस् खिस्ती सत्याचें प्रमाण म्हणून प्लेटोचे कित्येक विचार पुढें करीत आहे. लूथरच्या निर्याणानंतर त्याच्या जागीं लुथरन पंथाचें पुढारीपण करणारा मेलानेथान स्वताला प्लेटोचा विद्यार्थी ह्मणवीत आहे. अगदीं अलीकडचे खिस्ती धर्मवेत्ते जेरेमी टेलर, जॉन होवे, आर्चबिशप लेटन, जॉन हॉल हे प्लेटोनिस्ट होते. सारांश हे आमचे प्राचीन अर्वाचीन धर्मपिते आपल्या गुरुप्रमाणेंच "जे आह्माला प्रतिकूल नाहींत, ते आह्माला अनुकूल आहेत" असें समजणारे त्याचे अत्यंत उदार मनाचे शिष्य असून यांची वृत्ति "Amicus Plato, Amicus Socrates, sed Magis Amica Veritas" या म्हणीप्रमाणें जेथें सत्य सांपडेल, तेथें लीन होणारी आहे. अगदीं कालपर्वां होऊन गेलेला खिस्ती कवि काउपरसुद्धां एके ठिकाणीं खुशाल म्हणतो, कीं:—

'How oft when Paul has served us with a text,
Has Epictetus, Plato, Tully preached!'

आब्राहाम मूर्तिपूजक तरी त्याला ईश्वराचें आव्हान होतें व तोहि त्याला अतुल्य श्रद्धापूर्वक अथपासून इतीपर्यंत शिरसा मान्य करितो! तो परमेश्वराचा मित्र ठरतो (२काल २०:७, यशाया ४१:८; याकोब २:२३) हा देवाचा मित्र ज्याला परात्पर देवाचा याजक (उत्पत्ति १४:१८)म्हणून मान देतो, तो मल्खी सेदक त्याला तिरस्करणीय अशा खनानी लोकांत निपजतो( उत्पत्ति२४:३) या खनानी मल्खीसेदकाला इस्राएली व ख्रिस्ती संत याजक या नात्यानें प्रत्यक्ष ख्रिस्ताचा मान देतात !(स्तोत्र ११०:४; इब्री ५:६)या विदेशी याजकाला यहुदी व ख्रिस्ती लोकांनीं निरंतरचा सन्मान्य करून ठेवावा याचा अर्थ काय ? 'गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः' हाच नाहीं का ? मोशाचा सासरा इथ्रो कोण होता ? मिद्यानी ह्मणजे अरब, मोशाला मूर्तिपूजक मिसरी समजून आपली मुलगी देणाराच ना ? आणि याला त्याच मिसऱ्यांचा वैरी मोशे गुरुस्थानीं मानतो ! ( निर्गम १८:६–२५ ) ज्याला पवित्रशास्त्रानें 'यावच्चंद्र दिवाकरौ' शांतीचा, सहनशीलतेचा,श्रद्धेचा, सत्वधीरतेचा आदर्श करून ठेवला आहे, तो ईयोब एक अरब जातीचा शेख ! काय ह्मणावें याला ? प्रत्यक्ष पवित्रशास्त्रसुद्धां कर्मठांविरुद्ध ? हा हन्त हन्त ! राहाब,शीबाची राणी, रूथ, अरवना, यबूसी, हीराम, कोरेश वगैरे किती तरी विदेशी सज्जनांची पवित्र शास्त्र प्रशंसा करीत आहे. चांगुलपणाचीं, श्रद्धेचीं उदाहरणें देतांना प्रत्यक्ष आपला गुरु, आपला प्रभु येशू ख्रिस्त कितपत आपपर भेद ठेवीत आहे, हें त्याच्या चरित्राची व उपदेशाचीं पारायणें करणारांना कोणी सांगायाला नको.पुरें झालें; आह्मी आणखी एक शब्द लिहीत नाहीं; इतकेंच अगदीं प्रांजलपणें सुचवून ठेवितों,

कीं, आम्हांला जगांतील सारे साधुसंत देवाच्या संदेष्टयांप्रमाणें असून हिंदु साधुसंतांचे बोल हा आमचा पहिला जुना करार आहे. याच्या-योगानें आमचा प्रभु आह्माला अधिकाधिक व्यक्त, अधिकाधिक जवळ होत आला आहे, आणि तोच आह्माला "Amicus Socrates, Amicus Plato, sed Magis Amica, Veritas" या ह्मणीचें सत्यत्व अधिकाधिक पटवून देत आहे.' ( ज्ञानोदय एप्रिल ११-१९१८.)

वरील उताऱ्यांत आपल्या जन्मभूमीबद्दल, तीमध्यें जन्म पावलेल्या महर्षि, संतमुनींबद्दल निरतिशयाभिमान, सत्याग्रह, स्पष्टवक्तेपणा, उदारमतवादित्व, ख्रिस्ताविषयींची अचल श्रद्धा इत्यादि गोष्टी टिळकांनीं अत्यंत रसाळ, गोड, परिणामकारक भाषेंत आपल्या एका ख्रिस्ती बंधूस व अर्थात् कूपमंडूकन्यायानें बडबड करणाऱ्या ख्रिस्ती व ख्रिस्तीतर लोकांसहि सांगितल्या आहेत.

धर्मप्रसाराचें काम करणाऱ्या कांहीं व्यक्तींना असले अभंग व टिळकांची ही प्रार्थना वाचून वाईट वाटण्याचा संभव आहे. अशा मंडळीला टिळकांचा 'पवित्र संताप' ह्मणजे काय हें मी त्यांच्याच शब्दांनीं सांगतों.

बोलशील तें तें बोल प्रेमभरें । नाहीं तरी बरें मौन व्रत
प्रेम ह्याचा अर्थ नव्हे खुशामत । प्रेम आणि सत्य वस्तुच्छाया
प्रेम कडू काढे पाजीतें रोग्याला । सोसुनी रोषाला घडीभरी
सत्यास्तव प्रेम खांबाला खिळीलें । मनुजाचें झालें उद्धारीतें
इक्षुदंड गोड चरकांत जाती । एरंड वाढती सावकाश

घर्षण ताडन अग्निनिवेशन । खरें सोनेंपण सोशी सारें
मना प्रेमशब्द गोड उच्चाराया । परी आचराया नाहीं तैसा
आचरणीं प्रेम जरी गोड व्हावें । तरी आलिंगावें ख्रिस्तपदा
दास ह्मणे ख्रिस्त विचार उच्चार । ख्रिस्तच आचार होवो तूझा

प्रभूची प्रार्थना

मनुष्य स्वभावतः स्तुतिप्रिय असल्यामुळें त्याला कटुभाषण अप्रिय वाटतें तथापि ते कटु बोल हितपरिणामीं असल्यामुळें त्यांचीच विशेष किंमत आहे. रामदास ह्मणतातः—

न्यायनिष्ठूर बोलणें । लोकांसि वाटे कंटाळवाणें ॥
परि मळमळ करीत जेवणें । विहीत नव्हे ॥

दासबोध

' टिळकांची कविता ' या मालेचें हें दुसरें पुष्प किंवा पुस्तक. दोन्ही पुस्तकांतील कविता एकाचीच, पण त्या एकाचीं या दोन्हीं पुस्तकांतलीं स्वरूपें मात्र एक नाहींत; हा इतका फरक होण्याचीं कारणें या अभंगांचें मार्मिक दृष्टीनें परिशीलन करणाराला कोणीं सांगावयाला नको.

जॅन्युएरि महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत मी अहमदनगरास असतां अभंगांजलीसंबंधानें एक नवलाची गोष्ट माझ्या अनुभवास आली. एका चार वर्षांच्या लहान मुलीला आम्हीं गाणें ह्मणण्याचा आग्रह केला. त्यावर ती थोडें हंसून आपल्या बोबड्या शब्दांनीं एक अर्थपूर्ण, प्रासादिक, हृदयंगम अभंग गाऊं लागली. मधून

मधून तिचे वडील त्या बालिकेच्या सुरांत सूर मिळवून हळुहळू गात असतां ते कोठेंसे चुकले.इतक्यांत ती कन्या आपल्या पित्यास ह्मणते, ‘बाबा, तें तसं नाहीं, तुम्ही चुकलां.’ हें वाक्य ऐकून वडील स्वस्थ बसले व त्या गोड मुलीनें तो अभंग कोठेंहि न अडखळतां शेवट-पर्यंत गाऊन दाखविला. ‘हा कुणाचा अभंग आहे ?’ अशी पृच्छा केल्यावर, ‘तो अभंगांजलींतला आहे’ असें त्या चार वर्षांच्या बालिकेनें उत्तर दिल्यावर तर मीं विस्मयानें चकित् होऊन तिचें कौतुक केलें. अभंगांजलि अजून पुस्तकरूपानें बाहेर पडला नसतां त्यांतील अभंग खिस्ती लोकांच्या लहानलहान लेंकरांना जर तोंडपाठ ह्मणतां येऊं लागले तर तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यावर खिस्ती समाजांत सर्वतोमुखीं होऊन त्याला किती मोठें अधिष्ठान प्राप्त होईल याचा मीं त्यावेळीं विचार करीत होतों. या शिवाय अभंगांजलीसंबंधानें मीं जे वादविवाद ऐकिले, भजनी मेळ्यांत या अभंगांनां जें स्थळ प्राप्त झालेलें पाहिलें आणि स्वतःच्या अंतःकरणावर जो कांहीं परिणाम झाला त्या सर्वांवरून मी येथें भीतभीत परंतु निश्चयानें भाकीत करून ठेवितों, कीं हा अभंगांजलि महाराष्ट्रीय खिस्ती समाजाच्या एक प्रकारच्या नवीन अध्यात्म संक्रमणाला कारणीभूत झाल्यावांचून राहणार नाहीं; यांत विशद झालेलें श्रीखिस्ताचें स्वरूप, मनुष्य खिस्ती असो वा नसो, त्याला आकर्षून धरिल्यावांचून राहणार नाहीं. अस्तु.

शेवटीं, कवि टिळकांच्या प्रतिभावल्लीला व प्रतीतिवल्लीला अशींच गोड, सुंदर सुवासिक पुष्पें येऊन त्यांचा परिमळ रसिक, भाविक भक्तांस प्रमुदित करो व महाराष्ट्र–सारस्वतांत हा पुष्पहार अभंग

राहून ही तिलककाव्यलतिका अभंगरूपानें सदाफुली होवो असें चिंतून मी ईश्वराची प्रार्थना करितों.

अलिबाग, जि. कुलाबा,
ता. ७ फेब्रुएरि, १९१९.

भास्कर कृष्ण उजगरे

अरेरे! ह्या काव्यवृक्षाचीं कितीतरी फुलें खुडून मी महाराष्ट्राला आणून देणार होतों! परंतु हें एकच पुष्प खुडून मी तें वाचकांना सादर करण्याकरतां वळणार तोंच माझा आणि महाराष्ट्राचा आवडता काव्यवृक्ष माझ्या डोळ्यांदेखत उन्मळून पडला. वरील शेवटला पॅरेग्राफ खोडून टाकणार होतों पण डोळ्यांतील अश्रूंमुळें तो दिसेनासा झाला व टिळक गेले–माझे परमपूज्य गुरु गेले–ही कल्पनाच असह्य होऊन मी तो जसा होता तसाच कायम ठेवीत आहें.

माझे परमपूज्य गुरु रे. नारायण वामन टिळक यांच्या अत्यंत जिवलग प्रेमाच्या माणसांपैकीं सर नारायण ग. चंदावरकर हे एक आहेत असें रे. मि. टिळक यांनीं लिहून ठेविलेल्या दुसऱ्या एका इच्छापत्रावरून दिसतें. सर नारायण चंदावरकर हे टिळकांच्या कवितेचे किती निस्सीम, एकनिष्ठ भक्त आहेत, हें त्यांनीं खुद्द कवीस, कवीच्या रसिक विद्वान् मित्रांस वेळोवेळीं लिहिलेलीं प्रशंसापर खाजगी पत्रें, वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलेले विद्वत्ताप्रचुर लेख व सार्वजनिक सभांत काढिलेले प्रेमोद्गार यांवरून सहज सिद्ध होतें.

'अभंगांजली'चें 'मॅन्युस्क्रिप्ट्' तयार झाल्यावर रे. मि. टिळक यांनीं मला लिहिलेल्या एका पत्रांत हा काव्यग्रंथ सर नारायण

चंदावरकर यांस अर्पण करण्याविषयीं इच्छा प्रदर्शित केली होती. या सदिच्छेस सर साहेबांनीं मान देऊन ती परिपूर्ण केली हें त्यांच्या तिलककाव्यप्रेमास साजेसेंच झालें.

हा ग्रंथसमर्पणाचा योग अपूर्व व सुखदुःखपूर्ण तर खराच तथापि माझ्या दिवंगत मालाकाराच्या नितांत सुंदर काव्योद्यानांतील वल्लरीला, कालातपानें सुकून जाईपर्यंत येत असलेल्या मधुर काव्यकुसुमांचा सरस रमणीय अंजलि त्याच्या इच्छेनुरूप उपरिनिर्दिष्ट विद्वद्वरांस अर्पण करण्यांत आला. ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय.

१ ऑगस्ट १९१९ भा. कृ. उजगरे



प. वा. रे. **नारायण वामन टिळक.**

# अभंगाञ्जलि

## अञ्जलि पहिला

### पश्चात्ताप आणि शरणागति

१

गेलों गेलों गेलों स्वर्गाला पोंचलों । आलों आदळलों नरकांत ॥
काय ही अवस्था कोण माझे हाल । कसा तूं खुशाल पाहतोशी ॥
जीव जाऊं पाहे तरी तूं निराळी । काय गे माउली ह्मणूं याला ॥
कां गे मोकलीलें वांसरूं एकलें । परम वत्सले घोर रानीं ॥
कोणत्या तोंडानें तुला लावूं बोल । मीच अमंगल नीच पापी ॥
दास ह्मणे माये उगार तूं काठी । मारिली मीं मीठी तुला आतां ॥

२

उडोनी वाऱ्यानें अग्निकण आला । तेणें विध्वंसीला गांव सारा ॥
नकळत वीख अन्नीं प्राप्त झालें । कारण जहालें देहान्ताला ॥
खेळतां उरांत रोंविलें सुरीला । कशाची मृत्यूला बाललीला ॥
दास ह्मणे पाप कोणत्याही मिषें । प्रवर्तता नाशें गांठीयेलें ॥

३

फुटोत हे डोळे होवोत पांगळे । पाय हात लूले देवबापा ॥
झडो ही रसना वेड लागो मना । परी दुर्वासना नको नको ॥
माझें मजलागीं बघूं दे मरण । घेऊं दे खिळून खांबालागीं ॥
देऊं दे मजला मला मूठमाती । गती यापरती दुजी नाही ॥
कंटाळलों बापा निवारीं सांकडें । दयाळा एवढें लेंकुराचें ॥
दास ह्मणे ह्मण मेल्यावीण कोणा । स्वर्ग गवसेना हीच खरी ॥

४

मर्कट निघाला भाव्यावर गेला । आकंठ चरला आनंदानें ॥
तेणें हो तयाची कठीण अवस्था । मरतां मरतां वांचला तो ॥
नको नको ऐशा वृक्षाचें दर्शन । ह्मणे संतापून स्वप्नीं आतां ॥
संताप विरला निश्चय सरला । झाले विसरला हाल सारे ॥
म्हणे मन माझें माझीया अधीन । घडेना दर्शन घडे तरी ॥
दुरून पांहून घ्यावया वैभवा । गांठीयेला भावा वेडप्यानें ॥
म्हणे छायेमाजी क्षणैक विश्रांती । घेण्यांत अनीती काय झाली ॥
तेथूनी ऊठला वृक्षारूढ झाला । गोंजारी शेंगांला कौतुकानें ॥
गोंजारितां एक मुखामाजी गेली । दुसरी चालली तिच्यामागें ॥
म्हणे न करावी अती तेथें माती । एवढीच नीती पुरे झाली ॥
इकडे चालले नीतीचे विचार । तिकडे उदर फुटों आलें ॥
दुःसह यातना ओढवल्या पूढें । मृत्यूनें बापूडें सोडवीलें ॥
ओकिलें वमन पुन्हा जे सेवीती । त्यांची हीच गती दास ह्मणे ॥

५

अरेरे अरेरे केवढा हा घात । क्षणमात्र हात सूटला तों ॥
ठाऊका असोनी तुजला उनाड । कां रे दृष्टिआड होऊं दिला ॥

होउं दीला हेंच बरें तुवां केलें । उपकार झाले नवे तूझे ॥
भला आदळलों अर्धमेला झालों । मरतां वांचलों भलें झालें ॥
लोळवीला रेडा क्षणें गाय झाला । असेंचि खळाला हवें होतें ॥
मोल देउनीयां घेतली अक्कल । नव्हे ती नक्कल खरें सोनें ॥
आतां याजपुढें निराळी प्रार्थना । कशाची प्रार्थना मीच अंगें ॥
दास ह्मणे बापा आतां जातां येतां । ऊठतां बसतां पाय तूझे ॥

६

नको नको सोडूं घर । टपलेले दुष्ट चोर ॥
घरभेद्या घरांतच । तुझ्यामूळें स्तब्ध नीच ॥
तुला ठावें माझें बल । किती मजला अक्कल ॥
दूर होशी जरी थोडा । तरी पडेल दरोडा ॥
सारा नाश दाणादाण । क्षणामध्यें तूझ्यावीण ॥
दास ह्मणे दुर्बळ मी । तुझ्यासंगें पराक्रमी ॥

७

रचीयेले दुर्ग विध्वंसी क्षणांत । पिशाचांचा नाथ संताप हा ॥
दुज्यासाठिं जीव देइल अशाला । लावीतो घ्यायाला जीव त्याचा ॥
थोडें डवचीतां उतणारें वीख । हेंच मात्र एक विश्वीं साऱ्या ॥
अन्तःकरणाच्या केंद्रापाशीं दडे । तुटुनीयां पडे जेव्हां तेव्हां ॥
एक करी पाप दुज्याचा संताप । आधिं याला शाप मग तया ॥
न्याय तुझा ऐसा कां हें समजलें । अनुभवा आलें किती वेळां ॥
दास ह्मणे बापा बिलगलें बाळ । मिठी नको सैल होऊं देऊं ॥ १ ॥

८

प्रसंग मोठाले येतील जातील । चिंतुनियां फळ काय त्यांतें ॥
थोडकें होतांना मनाच्या विरुद्ध । जिवा होशि क्रुद्ध याचें काय ॥
थोडकें ऐकतां अप्रिय वचन । जिवा होशि खिन्न याचें काय ॥
थोडकेसे श्रम होतां संसाराशीं । कंटाळून जाशी याचें काय ॥
पदोपदीं जीवा थोडक्यावरून । तुझा अपमान याचें काय ॥
थोडकें चुकला क्षमा त्या करावी । नाहि तुझ्या गांवीं याचें काय ॥
थोडकें ह्मणशी परी ही सांखळी । जड तुज झाली याचें काय ॥
थोडक्यानें तूझें होतसे पतन । तरी तूं अजाण याचें काय ॥
दास ह्मणे जीवा थोडकेंच खोटें । यानें मोठमोठे नागवीले ॥

९

घडे जन्मभरीं समागम तूझा । विचार तिला जा जीवा आधीं ॥
जन्मल्यापासोनी दिली तुझ्या हातीं । ऐक ती संतती काय बोले ॥
दासदासी घरीं तरी त्यां विचारीं । ह्मणती शेजारी काय ऐक ॥
विचारूनी घेई आपण आपणा । तुझा मोठेपणा जाणती हीं ॥
जगाच्या श्वानांला जग मान देई । फार सांगूं काई याच्याहून ॥
दास म्हणे देव लौकिकावेगळा । न्यहाळीतो तूला जीवा माझ्या ॥

१०

जिथें जन्म गेलें तिथें मी परका । पाहुण्यासारखा काल आल्या ॥
माझें समजोनी जया आलिंगीतों । तेंच ओळखीतों अर्धवट ॥
अर्धवट तरी कशाचें ह्मणावें । नाही मज ठावें शतांशही ॥
जेथला मी ह्मणें मीच यजमान । तेथेंच फिरून भीकमाग्या ॥

गृह किंवा कारागृह उमजेना । कोठें दिवसांना कंठीतों मी ॥
खरोखर जग माझें मी जगाचा । परी काय ह्याचा अर्थ देवा ॥
दास ह्मणे बापा चौकस हें भारी । तुझें तुला परी गोड पोर ॥

११

काय करूं आतां नावरती वृत्ती । वृथा येति जाती त्रास देती ॥
इथेंच कळों ये मज माझेपण । कसें तुझ्यावीण भिकारडें ॥
कळूनी वळोनी पुन्हा माझें माझें । कराया न लाजे जीव वेडा ॥
धर या वेड्याला दृढ थोडा वेळ । मग हो सकळ आपोआप ॥
थोड्यासाठिं नको आतां ओढाताण । याच्याहून प्राण गेला बरा ॥
दास ह्मणे माझ्या नाहि नाही धर्मा । देह प्राण सीमा नाही नाही ॥+

१२

काय हातावर उभें तें दिसेना । दूरदर्शिपणा ऐसा माझा ॥
माझ्या चरित्राची पुढलीच पंक्ती । कळेना मज ती प्रज्ञावंता ॥
संरक्षक माझा मीच ही अहंता । तूंच रे अनंता रक्षीणारा ॥
दास ह्मणे माय जाणे काळवेळ । रंगलेलें बाळ स्वानंदांत ॥

१३

नाहि आंवाका मूळाला । वरी वृक्ष विस्तारीला ॥
तुझ्या सामर्थ्याचा अर्थ । तूंच जाणाया समर्थ ॥
माझ्या दुर्बलाच्या माथां । ठेव डोंगर परता ॥
मी तों निमित्त्यापूरता । तूंच त्याला सांवरीता ॥

---

+ माझ्या जन्माची सरहद्द देह आणि प्राणहि नाहीं, अर्थात् वरच्या चरणांत ह्मटल्याप्रमाणें त्याच्या प्रीत्यर्थ प्राण गेला तरी मला पर्वा नाहीं—संपादक

तूंच सेवा सांगणारा । तूंच करोनी घेणारा ॥
मन राहो आज्ञांकित । सारें सारें आलें यांत ॥
जिवा तूझा निदिध्यास । मुखीं प्रार्थनेचा घोष ॥
तुझ्या पायीं दृष्टी जडो । पुढें पाऊल हें पडो ॥
संगें माझीया संतत । माझा प्रभू येशू ख्रिस्त ॥
भीत नाहीं मी कोणाला । चान्हि खंड पृथिवीला ॥
मी तो कोणी नाही नाही । तूंच बापा सर्व कांहीं ॥
दास ह्मणे हीच श्रद्धा । सदा राहो जशी सध्या ॥

१४

किती रे भराऱ्या मारिशील उंच । येणें काय नीचपणा झांके ॥
सर्व उच्चतेची उंची जी असेल । नीच ती ठरेल जीच्यापुढें ॥
अशि उंचि जीवा तूजला गांठणें । नातरी पावणें अधःपात ॥
करीं एक आतां पुन्हा जन्म घेईं । पालटून होईं बाळ अल्प ॥
तुज लडिवाळें स्कंधीं बसवील । प्रभु पोंचवील इष्ट स्थलीं ॥
दास ह्मणे माझा धन्य अनुभव । जिवाचा तूं जीव माझ्या ख्रिस्ता॥

१५

पहाशी माराया उंच उंच उड्या । जिवावर गड्या कोणाच्या ह्या॥
उड्या मारुनीयां आपुल्या बळानें । फसले शहाणे मोठमोठे ॥
फसली ज्ञानाची तपस्येची ऊडी । धर्माचि तों प्रौढी रिकामीच ॥
अवघ्यांचे येथें हिशोब चूकले । हात टेंकियेले ज्यानें त्यानें ॥
दास ह्मणे माझा धन्य प्रभू खीस्त । माझि सारी भिस्त तया वरी ॥

१६

बाळकाच्या हातीं दीधली मोहर । स्वयें त्याचा कर धरीयेला ॥
करांत अन्याच्या बळें सोडवीली । शाबासकी दीली बाळालाच ॥

बाळही लागलें सांगाया जगाला । आज मींच केला धर्म मोठा ॥
कळेना तयाला कशाचाच अर्थ । तीच माझी गत देव बापा ॥
दास ह्मणे घोडा एवढा वाढलों । तरी मी ऊरलों नेणताच ॥

१७

जें जें काळावरी टेंके । तें तें विनाशी ठाउकें ॥
देह आणी नांव दोन्ही । जाणें काळाला वाहोनी ॥
सांभाळावा तरी ऊगा । कोणिं लौकिकाचा फूगा ॥
धन्य नीनाव्याची सेवा । मान्य जगा आणी देवा ॥
दास ह्मणे मी तों दास । नको अन्य नांव यास ॥*

१८

सांग सांग पुष्पा कां रे हासतेंस । हसावें मूढास प्राज्ञें तेवीं ॥
मधुर हा गंध मधुर हें रूप । मधुर निष्पाप वृत्ती तूझी ॥
बघून थोडासा रंगलों वर्णनीं । वर्णन अस्थानीं झालें का हें ॥
विचारीलें ऐसें फूलल्या फुलाला । ह्मणे तें मजला नम्रभावें ॥
क्षमा करा ठावें मज माझें दैन्य । कसें मी हसेन कोणालाही ॥
सनातन शुद्ध माधुर्यं तुषार । एक मजवर सोडीयेला ॥
त्यांत काय झालें माझें मोठेपण । मजला ह्मणून स्तवी जें तें ॥

---

* कवीच्या 'अभंगाच्या शेवटच्या चरणाचा आरंभ "दास म्हणे" या वाक्यानें होतो, तो तसा न करितां त्यांत आरंभीं किंवा अंतीं आपलें नांव आणावें असला मोह झाला असतां त्यांतून पार पडावें म्हणून' कवीनें 'एकदां प्रार्थना केली. तिचें जें उत्तर मिळालें त्यावरून हा अभंग लिहिला आहे.'
—संपादक

कळेना मजला समजती जन । मज लाजवून लाभ काय ॥
माझीया दैवाचें कधीं कधीं मज । हसूं ये सहज काय करूं ॥
दास ह्मणे लोकीं माजला देव्हारा । असाच हा सारा जेथें तेथें ॥

१९

जें जें पाहावें तें मोजकें दीसतें । कोण दरिद्रते भाळेल ह्या ॥
मोजक्याच्या पाठीं मोजवेना ऐसें । लागलेलें पिसें आह्मा त्याचें ।
मोजक्याचा थारा मोजक्याचा जीव । हेंच हो गौरव मोजक्याचें ॥
जुनें आणि नवें नवें आणि जूनें । काय कोण जाणे याच्यापूढें ॥
दास ह्मणे देवा तुझ्यासंगें राहूं । एवढेंच घेऊं दान आतां ॥

२०

पूढचें पाहीलें मागचें सोडीलें । हातांतून गेलें हेंही तेंही ॥
आजवर झाला हाच व्यवहार । अतां तों जर्जर तनू झाली ॥
सांभाळीतां येना उगा हांका मारी । असला भिकारी निर्लज्ज हा ॥
दास ह्मणे बापा मार दोन लाता । परी नको आतां दूर धाडूं ॥

२१

पश्चात्तप्त आत्मा तुझा झाला काय । करपला काय काय तुझा ॥
झालें काय जीर्णें नरकसमान । भाररूप प्राण झाला काय ॥
काय अन्नासवें कालवे गरल । पेटला अनल शय्येवरीं ॥
अनन्य पातकी जगामध्यें मीच । अनन्य मी नीच वाटे काय ॥
खरें सांग थोडा तरी मी चांगला । वाटेना तुजला नको चोरूं.॥
पाप झालें काय वमनासमान । नकोसें स्वमन झालें काय ॥
दास ह्मणे आग लागे मीपणाला । पश्चात्ताप झाला सुरू तेथें ॥

( भजनसंग्रह )

# अञ्जलि दुसरा

## ख्रिस्ताचें दर्शन

[ या अभंगांचा संबंध कवीला झालेल्या प्रभु येशूख्रिस्ताच्या दर्शनाशीं आहे,–संपादक ]

२२

विचारीतां तरी सांगतों मी आतां । पाहीलें मीं ख्रिस्ता डोळयांनीं ह्या ॥
नाही नाही स्वप्नीं परी जागेपणीं । तयाच्या दर्शनीं रंगलों मी ॥
ओढाळ हें मन तरी ह्मणे भ्रांती । माझीच उत्पत्ती पाहातों मी ॥
किती अधन्य मी माझे विश्वासाचें । वांकडें सदांचें काय करूं ॥
परी माझा प्रभू नाही कंटाळला । नाही विसरला क्षण मला. ॥
पुनःपुन्हा येई पुढें उभा राही । खरोखर आई नाही ऐशी ॥
हाक मारिली मीं परवां तयाला । ह्मणे रे कशाला आक्रान्त हा ॥
पुढती तुझ्या मी अंतरीं तुझ्या मी । आंधळ्या तूं भ्रमीं बुडालास ॥
प्रभू मज दे दे डोळे मी ह्मणालों । पायीं बिलगलों दुःखावेशें ॥
उठवीलें मला हृदयीं धरीलें । पुढें काय झालें कोणा ठावें ॥
इतुकें खरें कीं हरवला पत्ता । माझ्या मीचा आतां याच्यापूढें ॥
दास ह्मणे योगीश्वर ख्रिस्तराज । करी युक्त मज भगंगाला ॥

२३

कां रे भेटशीना ह्मणालों प्रभूला । वदे तो मजला निर्लज्जाला ॥
भेटलों एकदा त्याचें काय झालें । कोणते लावीले दिवे सांग ॥

जागेपणचें तें स्वप्न मानिलेंस । विचारीं मनास तूंच तुझ्या ॥
साता दिवसांचा करीशी वायदा । ह्मणशी एकदा भेटे जरी ॥
तरी मी ह्मणेन खराच भेटला । नातरी जहाला आभास हा ॥
सात दिवसांचीं सात वर्षे झालीं । तयांचीहि केली तिप्पट मी ॥
सांभाळीति तूतें माझे कारभारी । जवळ मी दूरीं परी तूला ॥
कामापुरता मी बोंललों तूजशीं । परी भेट ऐशी दिली नाही ॥
दास ह्मणे खरें गुणाच्या माझ्याच। फळांचा हा खच झाला खरा ॥

२४

अनुतापें केलें दु:सह जीवित । तरी त्याचा अन्त करवेना ॥
आज नाही उद्यां भेटशील मला । जीव ह्या आशेला बीलगला ॥
तुझा हस्तस्पर्श तोषवी स्कंधाला । तोच हृदयाला ताप देई ॥
अरे आला आला ह्मणून उठावें । पतन पावावें मेल्यावाणी ॥
असे माझे हाल पुरे पुरे झाले । डोळयांनीं पाहीलें तुवां सारे ॥
तेव्हां एकदाचा भेटशी मजला । परमप्रेमला कृपासिंधो ॥
आतां कोठला मी पाऊलें सोडाया । कोठला रे जाया क्षण दूरीं ॥
दास ह्मणे आतां तूंपण मीपण । टाकूं जखडून एकदाच ॥

२५

माझीया करांना पुण्यपादस्पर्श । नयनें सहर्ष दर्शनें हीं ॥
माझीया श्रुतींनीं आयकील्या उक्ती । सर्व सौख्यपूर्ती झाली येथें ॥
कुठें तूं होतास कोठुनी आलास । सांग सावकाश पुढें आतां ॥
कधीं कधीं कधीं सोडणार नाही । एवढीच देई भाक आधीं ॥
दास ह्मणे ज्याचा जीव पोळलेला । सोडीतो तुजला तोच कैंचा ॥

२६

अहो काय सांगू जाहलें नवल । झालें स्वप्नतुल्य मागलें तें ॥
पुढें दूर कोठें भासत जें होतें । तेंच आज हातें धरीलें मीं ॥
काल आणि उद्यां शब्द हारपलें । आजच उदेलें निरंतर ॥
दास ह्मणे प्रभो काय रे हें केलें । तुझें तुला कळे नाही मला ॥

# अञ्जलि तिसरा

## प्रार्थना

२७

बाळ कंठा बिलगलें । हर्षभरें माता डोले ॥
दोघें सारखीं प्रसन्न । देह भिन्न एक मन ॥
तुझी प्रार्थना करीतां । हेंच खरें माझ्या ताता ॥
लाभ दोघांचा दोघांचा । नाहि माझा एकल्याचा ॥
एकल्याचा लाभ तरी । नव्हे प्रार्थना ती खरी ॥
दास ह्मणे जीवा ठावें । मुखें केवीं तें बोलावें ॥

२८

तुझें तुला रूप पहायाचें काय । तरी धरीं पाय देवाजीचे ॥
पूढल्याचें आज व्हावें का दर्शन । धरीं रे चरण देवाजीचे ॥
चाललेली घडी व्हावी का बोलाया । तरी देवराया शरण जा ॥
काय नीट व्हावा गेल्याचा निकाल । तरी टेंक भाल देवापूढें ॥
दास ह्मणे खिस्तासमेत प्रार्थना । करून पहाना एकवार ॥

२९

ओळखीली सर्वज्ञता । तुझी प्रेममया सत्ता ॥
तुझें होय वंद्य जैसें । तुझें नाहीं मला तैसें ॥
तुला देणें तेंच देई । अन्य ठायीं म्हण नाही ॥
एवढीच आतां माझी । तुला प्रार्थना देवाजी ॥

द्वेष केला आजवरी । क्षमा त्याची मला करीं ॥
दास ह्मणे दुजा भाव । भक्ति कैंची बेबनाव ॥

३०

मी तों ओळखीलें तुला । तूंच ओळख मजला ॥
माझि तुझ्यावरीं सत्ता । करूं देईं पूरी आतां ॥
देह बुद्धी नांवगांव । पणा लावीयेला जीव ॥
एक अर्धी नको कमी । सोळा आणे घेईन मी ॥
दास ह्मणे वेळ नाही । कर आधीं भरपाई ॥

३१

प्रसंगापरीस एक मूठभर । मला उंच कर देवबापा ॥
आवडे तूजला तरी मज ठेवीं । ठेंगणा एऱ्हवीं आहें ऐसा ॥
प्रसंग येतील जातील शेवटीं । मारीन मी मीठी शेवटली ॥
तोंवरी तुझें मीं नांव सांभाळावें । एवढेंच व्हावें कृपादान ॥
दास ह्मणे माझ्या ख्रिस्ताचा मी भाऊ । मज अन्य होऊं देऊं नको ॥

३२

एवढ्याच वेळेपूरतें दयाळा । चित्त दे मजला दयापूर्ण ॥
एवढ्याच वेळेपूरता सत्याला । असूं दे वाहिला आत्मा माझा ॥
एवढ्याच वेळेपूरतें कोंवळें । असो मन ओलें प्रेमें माझें ॥
एवढ्याच वेळेपूरती आनंदें । पूर्ण ही असूं दे मनोवृत्ती ॥
एवढ्याच वेळेपूरता विनीत । ठेवीं मग शांत क्षमाशील ॥
एवढ्याच वेळेपूरतें माधुर्य । दे दे मज धैर्य उदारता ॥
एवढ्याच वेळेपूरतें शालिन्य । देईं, तूं वदान्य विश्वीं साऱ्या ॥

एवढ्याच वेळेपूरती परार्थी । अविच्छिन्न रती असो माझी ॥
दास ह्मणे बापा तूं तों दयासिंधू । परी एक बिंदू पूरे सध्या ॥

३३

पोरक्या पोराच्या कराव्या चौकशा । जगीं माझ्या तैशा चाललेल्या ॥
अशानें शेवटीं होईल कीं काय । बुद्धिभेद भय वाटे मला ॥
दुर्बलता माझी मजला भीववी । भुतें नवीं नवीं नाचवून ॥
राहिं राहिं बापा माझीयाजवळ । नाही बरा काळ सांगतों मी ॥
कळे तेंच पुन्हा कळेनासें होय । दीसतो अपाय मला पूढें ॥
कर्णिं तुझी वाणी भरलेली राहो । ऐकूं नच येवो दुजें कांहीं !
ऐकूं आलें तरी तूंच दे उत्तर । मज अवसर देऊं नको ॥
दास ह्मणे बापा कर कांहीं तरी । दिलेंस तें करीं राहो माझ्या ॥

३४

पाउस थांबावा पूर ओसरावा । सारा बदलावा सृष्टिक्रम ॥
असें कांहिं देवा मागत मी नाही । नको मूर्खता ही तुला मला ॥
जगन्नाथा तूझ्या कामामधें हात । घालायाला कीट कोण धजे ॥
कोण ह्मणे पापी जगाला तूं सोड । पुरीव रे लाड लाडक्याचे ॥
तुझिया इच्छेला वाहिलेला ठेव । सदा माझा जीव हेंच पूरे ॥
दास ह्मणे माझा मला मीच नको । तुझेंपण झांको राखो त्याला ॥

३५

झोपेंत पाहीलें भोगिलें साहीलें । त्यांतुनीयां आलें काय हाता ॥
खरेंच मजला भरवीशी जरी । झोपेमाजि तरी तेंही नको ॥
संकल्पविकल्पांमध्यें लोंबकळे । काय त्या आकळे मना सांग ॥
दास ह्मणे आधीं कर पुरा जागा । मग मज दे गा देणें जें तें ॥

३६

देवा तूझ्या चिंतनांत । माझा आदि आणी अंत ॥
हीच माझी अमर्त्यता । हीच माझी मुक्ती आतां
मन माझें तुला ध्याय । पुढें माझा पडे पाय ॥
दास ह्मणे पुरे झालें । पाहिजे तें हाता आलें ॥

३७

घरीं दारीं बाजारांत । किंवा राजदरबारांत ॥
देह कोठें का जाइना । काज कांहीं का करीना ॥
तुझें मनाला चिंतन । असो माझ्या रात्रंदिन ॥
यांत धर्म सारा आला । लाभ अवघा सांठवीला ॥
दास ह्मणे माझें कांहीं । दुजें मागणेंच नाही ॥

३८

तुझे पाय तुझे पाय । माझें चित्त नित्य ध्याय ॥
तुझें नाम तुझें यश । मुखी नित्य मंगल घोष ॥
तुझी अहर्निश सेवा । हाच देहाचा विसावा ॥
हेंच दान देगा देवा । माझ्या जीवाचीया जीवा ॥
दास ह्मणे दया येवो । मी तों फोडिताहें टाहो ॥

३९

पाणि चंचल उच्छृंखल । जया पात्रांत घालाल ॥
धरी तयाचा आकार । नको क्षणाचा उशीर ॥
तरी त्याचा पाणीपणा । लवमात्र न हो उणा ॥
अशी माझी वृत्ति व्हावी । कृपा एवढी करावी ॥

जगीं ठेवणें मजला । जरी आवडतें तूला ॥
दास ह्मणे तुला तूझें । ज्ञान मला जें पाहीजे ॥

४०

ज्यांत तुझी खूशी तसा वाग मशीं । रिकामी चौकशी मला नको ॥
रुचे तूज तें तें देईं किंवा नेईं । मागणेंच नाही अन्य माझें ॥
जिणें माझें झालें तुझ्याठायीं गुप्त । इथें मज ख्रिस्त सांपडला* ॥
सांपडला झाला माझा मी तयाचा । नाहि नाहि वाचा ही ही पूरी ॥
दास ह्मणे बापा प्रार्थना संपली । हीच ऊरलेली सदा राहो ॥

४१

ठेविशील जेथें जसा जोंपर्यंत । राहीन मी तेथ देवराया ॥
सांगशील तें तें करीन दयाळा । परी दे मजला दान एक ॥
माझा प्रभु ख्रिस्त माझियासमेत । असो सदोदित जीव माझा ॥
दास ह्मणे जीव अंतरला ज्यातें । उगीच मढें तें कोठें नेशी ॥

४२

झालि तेवढीच पुरे ओढाताण । हेंच दे गा दान देवराया ॥
तुझ्यामाझ्यामध्यें जेणें अंतराय । निवारीं अपाय ते ते बापा ॥
कशाला मी सांगूं कोणते कोणते । तुझ्या सर्वज्ञते कळे सारें ॥
गुरू आलिंगीला शिष्य लाथाळीला । असा न तुजला बोल लागो ॥
दास ह्मणे दारीं धरीलें धरणें । कोणत्या कारणें ठावें तूला ॥

४३

पुरे झाले बापा झाले ते सोहळे । आतां दे निराळें कांहीं तरी ॥
काय देऊं ऐसें नको रे विचारूं । काय मी लेंकरूं सांगूं तुला ॥

---

* कलस्सै ३:३.

देई ऐसें जेणें कंटाळलें मन । जाईल रंगून एका ठायीं ॥
तुज ठावें काय शोभेल पचेल । काय आवडेल लाडक्याला ॥
दास ह्मणे बाळ आपूलीच मती । जाणे ना पूरती कांहीं केल्या ॥

४४

[ हें सायंकालाचें वर्णन आहे—संपादक ]

पुरोवृत्ती[1] परावृत्ती[2] । आलिंगीती दूर होती ॥
एक निघाली तीकडे । दूजी राहीली ईकडे ॥
मिळे पश्चिमेला धडा । राग[3] वैराग्याचा[4] घडा ॥
पुढें रवी काढी पाय । सुखें लोकांतरा जाय ॥
उद्यां करूं राहिलेलें । जीवमात्रें ठरवीलें ॥
गेलिं कोटरां पांखरें । मधुपादि लुप्त सारे ॥
आल्या गोठ्यांमध्यें गाई । बाळ कुशी निजे आई ॥
सारें कांहीं आटोपून । मीहि गांठीलें सदन ॥
दास ह्मणे चला आतां । बसूं बोलूं प्रेमें ताता ॥

४५

पलीकडे पलीकडे । मला ने ने आधीं गडे ॥
घडे तेव्हां मात्र तेथें । लाभ भेटीचा दोघांतें ॥
नाहि तरी एके ठायीं । बसोनीही फळ नाहीं ॥
ह्मण वाईट ही खोड । परी चल मला ओढ ॥

---

१ पुढें होणें–प्रवृत्ति–कामाकाजाला लागण्याची इच्छा. २ मागें होणें–निवृत्ति–सारें सोडून विसावा घेण्याची इच्छा. ३ लाली किंवा आसक्ति. ४ लालीचा–रंगाचा अभाव किंवा विरक्ति.

माझि अवघी मूर्खता । तुला ठावी माझ्या ख्रिस्ता ॥
दास ह्मणे माझें मन । कोण जाणे तूझ्यावीण ॥

४६

पुरवूं दे मला अन्यांचें अभीष्ट । येऊं दे अनिष्ट माझ्या दैवीं ॥
अधिकाराहोनी कमीच मागेन । असें मज मन दे गा बापा ॥
सर्वांच्या पायांशीं जागा शेवटली । असूं दे राखीली माझ्यासाठीं ॥
तुझी इच्छा तीच माझि असो देवा । एवढाच व्हावा अनुग्रह ॥
दास ह्मणे एक आणखीं राहीलें । ओळखून दीलें पाहिजे तें ॥

४७

कशाला मी लाजूं कां रे भीऊं तरी । इच्छा तुला खरी सांगतांना ॥
सत्य तूं तुजला सत्य मात्र प्रिय । माझाही आशय सत्य देवा ॥
मजला व्हायाचें सांगतों मी ख्रीस्त । नाही तरी अस्त पावायाचें ॥
मोहवश पापी दुर्बल मी नीच । परी मज तूंच नीवडीलें ॥
तूंच दावियेलें ख्रिस्ताकडे बोट । धांवलों मी नीट त्याच्या पायीं ॥
त्यानें ऊचलीलें हृदयीं धरिलें । आश्वासन दीलें मला प्रेमें ॥
ह्मणाला मजला तुझें मी जीवन । अभिन्न आपण गुरुशिष्य ॥
आतां नाही नाही नाहि थांबणार । मला क्षणभर धीर नाही ॥
ख्रिस्त आणखीं तूं तुह्मामध्ये * मीही । दुजी सोय नाही हेंच व्हावें ॥
दास ह्मणे वेडा असेन ईश्वरा । वेड लावणारा कोण सांग ॥

४८

जगताचा काय स्वामी । जगन्नाथा दुर्बल मी ॥
ह्मणूनीयां ह्मणूं नीट । सारें असावें अवीट ॥

---

* योहान्न १७:२१; योहान्न १५:५; गलती २:२०; कलस्सै. ३:४.

नको जीवा ऐसें व्हावें । हें तों घडणें स्वभावें,
मला माझें ऊणेपण । दे दे सारें दाखवून ॥
नसो कोणाचाही रोष । घडो प्रेमपरिपोष ॥
बाकि तूझें तूंच पाहीं । मला त्याची चिंता नाही ॥
घडो समस्तांची सेवा । हीच जोड देई देवा ॥
सखा पातक्यांचा ख्यात । गुरू माझा प्रभू खिस्त ॥
त्यानें मला स्वीकारीलें । ह्मणूनीच नीभावलें ॥
दास ह्मणे शेफारला । न दे बापा होऊं मला ॥

४९

चावलें कराला तरी चावो परी । सेवो घांसभरी अन्न बाळ ।
इच्छिणाऱ्या एका अन्तःकरणानें । मजला प्रेमानें वाढवीलें ॥
अन्तःकरणाचा तया थोढा तरी । मज वांटेकरी राहूं देई ॥
बंधुभगिनींचें थोडें तरी ऋण । मग मी फेडीन वाटे मला ॥
एवढें लाधतां तुज हवा तैसा । होईन थोडासा देवबापा ॥
दास ह्मणे परी पाहिजे जहालें । ममत्व मोकळें माझें आधीं ॥

५०

समजून आलें माझें मोल मज । थोर तुझ्या रज चरणींचें ॥
तरी तूं मलाही ह्मणशी आपूला । येणें फुशारला जीव माझा ॥
स्थानाच्या महत्त्वें मजला महत्व । बिंबलें हें तत्व मनीं माझ्या ॥
अतां कोठला मी पाऊलें सोडाया । तुझीं गुरुराया क्षणार्धही ॥
दास म्हणे नाही समजलें ज्याला । सांग जा तयाला दूर व्हाया ॥

५१

मरतांना सात वेळ । जरि देहाला येईल ॥
तरी हा मी सिद्ध देवा । एक अनुग्रह व्हावा ॥
तुझ्या नांवें अरेरावी । तुझ्या राज्यांत नसावी ॥
तुझीं पाहणें लेंकरें । नको झालीं जनावरें ॥
दास ह्मणे डोळे फोड । नको दर्शन हें द्वाड ॥

५२

मुखें न यो शाप उचलो न हात । नको आत्मघात संतापानें ॥
आतांशीं कुठेंसा आरंभ जहाला । पूढचें मजला दिसे सारें ॥
संभाळ संभाळ तुझें तूंच नांव । आलिंगी ये धांव मला खिस्ता ॥
समजलें मला मीही जलावर । चालतों पैतर वेडेपणें ॥ *
दास ह्मणे मी तूं भावना ही मरो । मग मागें उरो उरेल तें ॥

५३

देरे देरे देरे सदा हेंच गाणें । नातरी गाऱ्हाणें संकटाचें ॥
ठाउकीं न केव्हां स्तवनें भाषणें । सदा रडगाणें तूझ्यापूढें ॥
प्रार्थना ही खरी अक्षरशः खरी । सुख नाही परी येणें बापा ॥
बापा लेंकूरानें अंकारूढ व्हावें । हसावें बोलावें लाडें कोडें ॥
तुज हेंच व्हावें आज्ञा हेंच व्हावें । प्रार्थना हें द्यावें नाम ह्याला ॥
असें कर अगा प्रेमरूपा आतां । बालकांना चिंता अन्य नको ॥
देशील तें घ्यावें नेशील तें द्यावे । संन्निध रंगावें तूझ्या सदा ॥

---

*मात्थी १४:२८–३१.

तुझें नाम चित्तीं गौरव मुखांत । प्रार्थनेचा अर्थ हाच असो ॥
ख्रिस्तशिष्य ह्मणे हेंच रे मागणें । तुजला सांगणें कां हें नको ॥
( उपासनासंगीत )

५४

अनुभूति भक्तीं स्वर्गाचेंच दार । परम सुंदर प्रार्थना हें ॥
अहा प्रार्थना हें पवित्र मंदिर । येथें परात्पर भक्तांसवें ॥
स्वर्ग पृथ्वीमध्यें उभारीला जीना । तयाचें प्रार्थना नाम साजे ॥
प्रार्थना पित्याची मांडीच केवळ । चढे वर बाळ लडीवाळें ॥
प्रेमाचा वर्षाव आत्म्याचा प्रकाश । आसवें सहास प्रार्थना हे ॥
ख्रिस्तशिष्य ह्मणे ख्रिस्तासंगें जाणें । देवा आलिंगणें प्रार्थना हें ॥
( उपासनासंगीत )

## अञ्जलि चौथा

### योग आणि योगस्पृहा

५५

पुष्कळच मला बोलायाचें होतें । आठवेल तें तें खरें परी ॥
तुजला पहातां अर्धं विसरतों । अर्धं समजतों निरर्थक ॥
लागतें धरावें येणें मला मौन । तुला परी ज्ञान सारें बापा ॥
वक्तृत्व मौनाचें कोठून जिव्हेला । स्वतावर जीला सत्ता नाहीं ॥
हास्यरोदनाची इथें सारी भाषा । व्याकरणकोषा अतीत ही ॥
दास ह्मणे आज असेंच होऊं दे । मुकाच बसूं दे पायांपुढें ॥

५६

तुझीया दर्शनीं रंगलेली दृष्टी । चिंतनांत तुष्टी सारी माझी ॥
तुझीया इच्छेच्या पलीकडे कांहीं । मागायाचें नाहीं ऊरलेलं ॥
तुझें राज्य माझ्या सार्थक्याची सीमा । अगा सर्वोत्तमा देवबापा ॥
कधीं रे होईल अशी माझी वृत्ती । कधीं रे संपत्ती व्याप दूजे ॥
कधी येथवर योग मी पावेन । ख्रिस्तांत विलीन होईन मी ॥
दास ह्मणे माझी भूक जाणणारा । अगा प्रेमागारा तूंच तूंच ॥

५७

होतों तैसा नाही व्हावें तैसा नाही । असली स्थिति ही माझी बापा ॥
समाधान आणी तळमळ दोन्ही । रथास जुंपोनी निघालों मी ॥
माझा गुरु माझा बांधव सारथी । प्रभु येशू भीती मला नाहीं ॥

भीती हो कशाची आनंदी आनंद । सर्व सौख्यकंद हातीं माझ्या ॥
हातीं हो कशाचा हृदयीं भरीला । जातो कोठें मला सोडोनी तो ॥
दास ह्मणे आतां साराच पूढला । मार्ग सोपा झाला अनायास ॥

५८

नको मिठी करूं क्षणभर सैल । मन हें ओढाळ भारी माझें ॥
आणखीं आणखीं धर बळकट । नको कटकट ह्मणूं याची ॥
कटकट तरी कशाची तूजला । तूंच हा जोडीला असा मित्र ॥
तरी लाव पाहूं आपुली संवय । पुरी मग भय नाही याला ॥
दास ह्मणे डोई आपण होऊन । घेतला सहन करीं भार ॥

५९

खेळतां खेळतां खेळ रंगा आला । कशाचे कुणाला भान आतां ॥
तोच पाहिली मीं येतांना दुरून । हात पसरून तुला माये ॥
तुझें माझें हास्य तुझी माझि दृष्टी । तुझी माझि तुष्टी आत्मा एक ॥
कुणाचे सोबती कशाचा गे खेळ । काढीला मीं पळ तुझ्याकडे ॥
दोघे दोघांकडे धावत सूटलों । कंठिं बीलगलों हर्षें तूझ्या ॥
परतून खेळाकडे मीं पाहीलें । पुन्हा फीरवीलें तोंड माये ॥
हृदयींच जणूं तुझ्या प्रवेशलों । तन्मय मी झालों माऊली गे ॥
स्मरतें दीसतें हुबेहूब सर्व । अहा महापर्व आनंदाचें ॥
दास ह्मणे नको ह्मणुं झाला मोठा । नको करूं तोटा असा माझा ॥

६०

पायालागिं पाय सदा बांधलेला । असाच राहीला तरी काय ॥
झालि का इथेंच सांग कार्यपूर्ती । तुझी तरी तृप्ती झाली काय ॥
पलीकडे किंवा अलीकडे भेद । कशाला जो बद्ध झाला त्याला ॥
ह्मणूं नको प्रभो एवढी कां घाई । आधिं हात देई घेई वर ॥

तुझा माझा एक होऊं दे संसार । सारे कारभार एक पाहूं ॥
दास ह्मणे वंध्या व्यर्थ समीपता । जरी सलोकता नाही व्याली ॥

६१

तूंच ह्मणतोस तुझें मी जीवन । तरी ये आपण एक आतां ॥
शिष्य आणि दास खराच मी तूझा । मी तों प्रजा राजा तूंच माझा ॥
असो हेंच नातें परी सांगतों मी । नाहि कांहिं कमी घेणार मी ॥
जीवन तूं माझें तरी हो जीवन । तुझें माझें मन भेद नको ॥
मला पाहतांना तुझी आठवण । तुझेंच दर्शन जगा होवो ॥
दास ह्मणे नाही मागत भलतें । ओघानें आलें तें मागतों मी ॥

६२

समीपता किंवा लाधो सलोकता । किंवा सरूपता माझी होवो ॥
कोणता शहाणा ह्मणे पायऱ्यांस । आला हा कळस हाता माझ्या ॥
जगणें ह्मणजे माझा प्रभु खिस्त । सायुज्य हें प्राप्त करीन मी ॥
असेल हें स्वप्न अजून कल्पना । परी खरेपणा पोटीं हीच्या ॥
हाच मी पाहीन पाहीन भोगीन । सुखें दाखवीन बघणारा ॥
दास ह्मणे बापा लेंकुराचा पण । तुला अभिमान सारा त्याचा ॥

---

६०–६२ या अभंगांचा विषय समीपता, सलोकता, सरूपता व सायुज्यता हा आहे.

**समीपता**—मात्थी ८:२२, १६: २४; १९:२१ योहान्न १२: २६

**सलोकता**—योहान्न १२:२६; १७:२४;

**सरूपता**—रोम ६:५; १ योहान्न ३:२; फिलिप्पै २:५

**सायुज्यता**—योहान्न ६: ५४, ५६; योहान्न १५: ४, ५, ७; गलती २:२०; फिलिप्पै १: २१; कलस्सै ३:३; योहान्न १७: २१.

अभंग २०४ वाचून पाहा.

६३

अलीकडे मला शब्द सूचती ना । सांचती भावना अन्तर्यामीं ॥
इथेंच ये पाहूं पाहून घे सारें । वाईट वा बरें असेल तें ॥
असेल तें घेई ठेवूं नको कांहीं । वाहीलें मीं पायीं सारें तूझ्या ॥
दास ह्मणे प्रभो तुला माझें ज्ञान । तसा माझा मी न ओळखीचा ॥

६४

संदेहा दे जीव एखाद्या डोहांत । भया घे ही लाथ पाठाडांत ॥
चिंते आजवरी जाळिलेंस मला । अतां घे तुजला भडाग्नी[1] हा ॥
अगे जनलज्जे तुझीं पाळेंमूळें । खणीन मी काळें कर आधीं ॥
अरे मीपणारे नीघ बऱ्या बोलें । नातरी भरलें पूरें तूझें ॥
दास ह्मणे माझा प्रभु माझा झाला । आतां मी कोणाल्या जुमानीतों ॥

६५

पूढच्या घडीला जाईना का जीव । परी माझा देव मला व्हावा ॥
सारें सौख्य माझें तयाचें चिंतन । अहो विस्मरण दुःख सारें ॥
तयाच्या इच्छेची करणें पूर्तता । अन्नपाणी आतां हेंच माझें ॥
शोधिती तयाचें राज्य जे जे ते ते । माझें आवडतें गणगोत ॥
तयाच्याकडून येईल जो प्याला । पिईन तयाला अत्यानंदें ॥
दास ह्मणे झाला पुरा माझा अस्त । माझ्यांतला ख्रिस्त पुढें झाला ॥

६६

येथवर येतों पुढें येववेना । मनच होईना माझे देवा ॥
पुढें एक पाय टाकीतां जहालें । सर्वस्व बुडालें वाटे मला ॥

---

१ प्रेत विधिपूर्वक न जाळतां नुसतें पेटवून देतात त्याला भडाग्नि ह्मणतात.

कुठें मग प्रेम कुठें मग सेवा । कुठें तो विसावा दर्शनाचा ॥
कुठें मग भाई कुठें मग ताई । कुठें माझा मीही सारें गेलें ॥
नको नको मज पुढें होऊं देऊं । थोडकासा राहूं देई दूर ॥
दास ह्मणे माझ्या ख्रिस्तामध्यें लुप्त । असो हें जीवित आहे तेथें ॥

६७

जगन्नाथ बाप आई । उणें मला कांहिं नाही ॥
कशाला मी द्रव्य मागूं । व्यर्थ लोभामागें लागूं ॥
नको मनुष्यांत कीर्ती । कीर्ति नव्हे ती फजीती ॥
ज्ञान येथलें अज्ञान । मान पोरांचें खेळण ॥
तुझ्यावांचुन देवराया । उरे कांहीं न मागाया ॥
देणें तरी हेंच देई । नित्य माझ्या मनिं राहीं ॥
ख्रिस्तशिष्याचें वैभव । दास ह्मणे तूंच देव ॥

( भजनसंग्रह )

---

सहासष्टावा अभंग व उपासनासंगीत ७१७ बरोबर वाचावीं ह्मणजे प्रसंग व अर्थ चांगले लक्षांत येतील.

# अञ्जलि पांचवा

## श्रद्धा आणि आत्मानुभव

६८

बाळ माहेरला गेली । मायबाप नव्हते स्थलीं ॥
गेलि तयांना शोधित । गांव हिंडत हिंडत ॥
मायबाप सांपडले । तेंच माहेर ठरलें ॥
माझा स्वर्ग तसा तेथें । माझा देवबाप जेथें ॥
दास ह्मणे स्वर्ग देव । एक नको भेदभाव ॥

६९

कांहिं मागायाचें नाही । सांगायाचें नाही कांहीं ॥
कशाला मी आलों येथें । माझें मला कळेना तें ॥
मला देऊं दे हुंदके । आधिं येतील तितुके ॥
उगा तूझ्या पायांकडे । मला पाहूं दे गा कोडें ॥
मला हसूं दे हसूं दे । मुखा येई तें बोलूं दे ॥
मग आलों तैसा जातों । पुन्हा सेवेला लागतों ॥
दास ह्मणे वेडें पोर । कृपा तूझी परी थोर ॥

७०

ऊठतांच प्रातःकाळीं । आधिं आईला आरोळी ॥
आधिं आईचें दर्शन । स्तन्यपान गोंजारण ॥
मग जीवा सारें सुचे । चित्त ऐसें बाळकाचें ॥

हेंच चित्त माझें निकें । तुला सर्वज्ञा ठाउकें ॥
दास ह्मणे ऊजाडलें । धांव दाखवीं पाउलें ॥

७१

फुलें हासती बोलती । पक्षिराज गाणीं गाती ॥
नित्य नवी रम्य प्राची । खाण सर्व सौंदर्याची ॥
तूंहि माझ्या अन्तर्यामीं । तुझ्या आवडीच्या धामीं ॥
प्रवर्तीशी उषःकाल । सर्व सौख्यांचा सुकाळ ॥
जीव माझा मग्न झाला । तुझ्या चिंतनीं रंगला ॥
दास ह्मणे उजाडलें । खरोखरीं उजाडलें ॥

७२

*स्वयें घेई मांडीवरीं । जणुं गांभीर्य माधुरी ॥
खिन्नतेच्या मुखावरीं । प्रसन्नता शोभे सारी ॥
आलिंगाया अंधकारा । तेज पसरीतें करा ॥
पुरस्कारी प्रवृत्तीला । करें निवृत्तीं वत्सला ॥
मिठी मारिशी तूं स्वयें । मला तूंही माझ्या माये ॥
दास ह्मणे उजाडलें । खरोखरी ऊजाडलें ॥

७३

माझ्या अन्तरात्म्याचिया । पलीकडे देवराया ॥
दिसे बाप माझा मला । स्वर्ग दूसराच झाला ॥

---

* गांभीर्यानें आपल्या मांडीवर माधुरीला घेतलेलें आहे. खिन्नतेच्या मुखावर प्रसन्नता शोभत आहे. प्रकाशानें अंधाराला आलिंगन देण्याकरितां आपले हात पसरले आहेत. वत्सल निवृत्ति, प्रवृत्तीला पुढें करीत आहे ! हें पहांटेचें वर्णन कितीतरी सुरेख आहे. —संपादक.

मला ठावें नाही केव्हां । तुवां निर्मीयेला देवा ॥
दिव्य गायनाचा ध्वनी । सदा येथें मंगल वाणी ॥
हिच्यापूढें कोलाहल । जगांतला हीनबल ॥
दास ह्मणे चित्तीं कर्णीं । तुझी भरलेली वाणी ॥

७४

तुझ्या पडोनीयां गळां । कंठ करोनी मोकळा ॥
रडावेसें मला वाटे । ऊर वारंवार दाटे ॥
येइं प्रभूराया येईं । धरीं मला ये हृदयीं ॥
सखा माझा वांटेकरी । तूंच दीनाचा कैवारी ॥
मला काय होतें ख्रिस्ता । पाहिं तूझें तूंच आतां ॥
दास ह्मणे अश्रू हेंच । पुरे झालें तूला वाच्य ॥

७५

कडाडली वीज आलि अंगावरी । मज दूर सारी तूझा हस्त ॥
आला आला लोंढा अतां बूडवीतो । वळवी तया तों तूझा हस्त ॥
जमीन दुभंग झालि पायांखालीं । मजला ऊचली तूझा हस्त ॥
कडा कोसळला अदळतो शिरीं । तयाला निवारी तूझा हस्त ॥
पंचमहाभूतें खावया धावली । मजला सांभाळी तूझा हस्त ॥
दास ह्मणे बापा पाडिली विस्मृती । कशाला ह्मणती भय याची ॥

७६

नाहि मी एकला कुठेंही वसतां । कुठेंही हिंडतां पृथ्वीवरी ॥
तूं माझा संगाती अगा माझ्या ताता । माझा संगोपिता माझ्यासवें ॥
काय मीं चिंतावें तूंच माझें चित्त । माझें उक्त[2] कृत[3] तुझें सारें ॥

---

१ स्पष्टीकरण, अर्थ. २ बोलेन तें तें. ३ करीन तें तें.

सुखाचा दुःखाचा कालवीला काला । तुझ्यासंगें झाला गोड सारा
दास ह्मणे बाप जवळ लेंकरा । कितीही इतरां दूर वाटो ॥

७७

कशाला स्वर्गांत करीशी तयारी[1] । स्वर्गच अंतरीं माझ्या आला ॥
परम पवित्र परम समर्थ । तोच माझा तात पामराचा ॥
हृदयीं रमला रमला सर्वत्र । आतां इहामुत्रे[2] भेद कैंचा ॥
दास ह्मणे माझ्या प्रभू येशू ख्रिस्ता । खरा खरा त्राता तूंच तूंच ॥

७८

उच्चाराचें रूप त्याला । जणूं विचार आपुला ॥
आपुलेंच ऊर ऊडे । शब्द त्याचा कानीं पडे ॥
जवळ देवा याच्याहूनी । मंद मंजुल तूझी वाणी ॥
केव्हां केव्हां फार दूर । आकाशाच्या पैलपार ॥
मेघ सारे एक झाले । गर्जावयाला लागले ॥
ऐकुनीयां घोर रव । घाबरतो माझा जीव ॥
बोल लोभें किंवा रागें । बोल माझ्या माऊली गे ॥
नको धरूं तूं अबोला । एवढेंच पूरे मला ॥
रागावलें प्रेम जरी । दास ह्मणे इष्ट तरी ॥

७९

तुझें सामर्थ्य चिंतीतां । भय वाटे भारी चित्ता ॥
तेव्हां वाटतोशी दूर । कोटि सूर्यांच्याही पार ॥
तेंच तुझें वत्सलपण । करी चित्ता सुप्रसन्न ॥

---

१ योहान्न १४:१२. २ इहलोक परलोक.

तेव्हां वाटे अंकीं माथा । तुझ्या ठेविला मीं ताता ॥
दास ह्मणे लाडावला । धाक पाहीजेच त्याला ॥

८०

परा पश्यन्ती मध्यमा । वैखरी[1] ही सर्वोत्तमा ॥
वाहियेली यांची माला । तुझ्या पायीं जगत्पाला ॥
आतां वाणी माझी तुझी । एक जहाली देवाजी ॥
नको ह्मणूं याला खूळ । माझ्या सौख्याचें हें मूळ ॥
माझ्या गुरुचा तुझा योग । मी तों तुम्हां मागोमाग ॥
दास ह्मणे पुरा श्रोता । मीच देवा तुझा आतां ॥

८१

सुटोत वादळें उठोत पर्वत । पंचमहाभूत पिंगा घालो ॥
माझीया अंतरीं सदा वसणारा । तयास हा सारा पोरखेळ ॥
सदाचें संगाती सामर्थ्य जीवन । नाहि परिमाण जया नाही ॥
दास ह्मणे माझ्या खिस्तासह मीही । येथें तेथें नाही जातों नीट ॥

८२

कशाला कुणाचे पाय मीं धरावे । कशाला सांगावें कोणा कांहीं ॥
कशाला कुणाचें माथां ऋण घ्यावें । कशाला ह्मणावें धनी कोणा ॥

---

१ परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी ही आपल्या मुखांतून जी वाणी निघते तिची परंपरा आहे. परा हें वाणीचें मूळ किंवा प्रथमावस्था ही अहंभावांत गुप्त असते. पश्यन्ती म्हणजे तिचीच विषयग्रहणक्षम अवस्था. या अवस्थेची प्रवृत्ती-पुढें होणें-मध्यमा. वैखरी म्हणजे याचें अंतिम कार्य, प्रत्यक्ष बोलणें.

माझा धनी तात एक जगन्नाथ । नाही मी म्हणत सावकार ॥
लेंकरूं म्हणजे पुरें घेणेकरी । याहून दूसरी मात नको ॥
ममत्वें मुखांत घालीतो कवळ । तयाचा प्रेमळ हस्त माझ्या ॥
तयाच्याच अंकीं नीजतों खुशाल । माझे सारे खेळ त्याच्यापूढें ॥
तयाच्याच राज्यीं तोंच आज्ञापीतो । तीच आचरीतो सेवा हर्षें ॥
काय मज व्हावें काय मज द्यावें । त्यानें ठरवावें घ्यावें तें मीं ॥
संपला करार एवढाच सारा । पुढचें विचारा जा जा त्याला ॥
व्यर्थ चवकशा करूं नका कांहीं । कोणाचाच नाही लाभ त्यांत ॥
लाभ व्हावा तरी जोडा देव आधीं । भलते उपाधी मोडा तोडा ॥
दास म्हणे चर्चा उधळिली धूळ । प्रतीतिचें फळ वेगळेंच ॥

८३

शहाण्यांनो दूर व्हारे । या रे पिसे ते ते सारे ॥
नको आम्हा मध्यें हद्द । देवबाप अमर्याद ॥
चला त्याचे पाय गांठूं । तिथें आनंदानें भेटूं ॥
बाकी आनंद हें नांव । स्वप्निं वाऱ्यावरी नाव ॥
दास म्हणे जैसा संग । तैसा तितूकाच रंग ॥

८४

भुकेनें चालला जीव तया जात । कशाचा हो पंथ धर्मभेद ॥
सर्व पंचाईती लुप्तप्राय होती । स्वभावेंच जांती मावळून ॥
माझा देहजीव मागि भूक खाई । सोसवत नाही यातना ह्या ॥
माझे संत मला आणून भेटावा । वांचवा वांचवा मला कोणी ॥
आलिंगूं द्या मला उराशीं तयांना । जिवाच्या जीवांना एकवार ॥

वाहूं द्या अमूच्या नेत्रांतून गंगा । करूं द्या हो दंगा आनंदाचा ॥
हृदयें हृदयां ओळखीती पूरीं । तिथें कोण करी अडथळा ॥
आम्हि नाचणार सारे एका ठायीं । आम्हां ताल देई विश्वंभर ॥
दास ह्मणे आम्हां आड येई खट । सारा भेद बाट त्याच्या माथां ॥

८५

माझ्या आशेला अडथळा । धजे कोण करायाला ॥
माझ्या आत्माच्या भराऱ्या । कोण मोजणारा साऱ्या ॥
देह सोडो आज प्राण । मला नाही हो मरण ॥
सनातन माझा बाप । मींच काय केलें पाप ॥
जगीं माणसें जेवढीं । माझें जीवन तेवढीं ॥
गुरू माझा मनुष्याचा । पुत्र पुत्र ईश्वराचा ॥
दास ह्मणे त्याचा चेला । कसा सांपडे मेलेला ॥

८६

बाप माझा बाप खरा । ज्ञान पूरे हें लेंकुरा ॥
यांत दोघांचा संतोष । ममत्वाचा परिपोष ॥
तुझ्याठायीं चित्त धालें । तुझें सर्वथैव झालें ॥
एवढेंच पूरे ज्ञान । बरा याहून अज्ञान ॥
दास ह्मणे तुझा झाला । मूर्ख मूर्खाहोनी भला ॥

८७

गेलेलि घडी ही ठरली नादान । घडतां दर्शन पूढलीचें ॥
पुढीलीचें हेंच क्रम हा असाच । उच्च आज नीच तेंच ऊद्यां ॥
मीळणारें सारें मिळालें वाटतें । परी तें ठरतें अंश त्याचा ॥
समजलें मशीं असें कां करीशी । सांगूच का तूशीं अर्थ याचा ॥

प्रेम विनोदन आणि कृपादान । दिव्य संमीलन तिहींचें हें ॥
दास ह्मणे धन्य तूंच एक दाता । प्रभु येशू खीस्ता विश्वामाजी ॥

८८

हजार संकटें येऊनी भिडोत । हजार झोंबोत रोग देहा ॥
होवो कडेलोट बुडो राहो नांव । परी माझा देव माझा राहो ॥
नको तो नरक तुझें विस्मरण । एवढेंच दान दे गा बापा ॥
तूं माझी विश्रांती तूंच माझें बल । हवें तें सकल तूंच माझें ॥
दास ह्मणे आतां श्वसनोच्छ्वसन । आणखीं चिंतन तूझें एक ॥

८९

बापा तुझें तूंच पाहीं । माझें कांहीं जात नाही ॥
समर्थाचें मी लेंकरूं । कशाला मी चिंता करूं ॥
नित्य उभा तुझ्या दारीं । मी तों पूरा घेणेकरी ॥
तुवां संमानीला कीट । कसा होईल उद्धट ॥
परी धीट पुरा केला । तुझ्या वात्सल्यानें याला ॥
दास ह्मणे कळे नातें । कोण वारणारा त्यातें ॥

९०

नाहि झालों थोंडा जिवंत मन्मन । पहिल्याहून तीक्ष्ण शंका नको ॥
तीक्ष्ण तीक्ष्ण तीक्ष्ण आणखींही तीक्ष्ण । जाणार होऊन शंका नको ॥
एकच चाललें अंतर पडत । खिस्त माझें चित्त शंका नको ॥
मन्मन त्वन्मन भेद अस्ताचला । जावया लागला शंका नको ॥
आजवर झाला तयाच्या पूढला । गांठितों मी पल्ला शंका नको ॥
दास ह्मणे खिस्ती नलगे खिस्ताला । खिस्तच खिस्ताला व्हावा व्हावा ॥

९१

पाहिलें तिघांहीं पांखरूं सुरेख । तिघांना हरीख सारखाच ॥
अंतराळाचीया अगा अलंकारा । अगा सर्वसारा वनश्रीच्या ॥
ह्मणे एक पूर्ढे शब्द सूचती ना । आपण आपणा वीसरला ॥
दूसरा ह्मणे मी हृदयीं भरून । जाईन घेऊन घरीं याला ॥
रंगवीन ह्याचें आलेख्य सुंदर । आणील शंभर रुपये तें ॥
तीसरा हळूच सोडि तीक्ष्ण तीर । पडे भूमीवर पांखरूं तें ॥
ऊचली शवातें चाटि जीभल्यांतें । वमती क्रूरते तोंड डोळे ॥
दास ह्मणे स्वर्ग पृथिवी नरक । पाहिजे तें एक येथें आहे ॥

९२

काय मीं योजीलें माझें जन्मस्थान । ठेवीले नेमून मायबाप ॥
तुवां पाठवीलें तेथला मी झालों । ममत्वीं रंगलों देवराया ॥
ममत्वें वत्सले मला तूं जवळीं । अगदीं माऊली माझी माझी ॥
पाहीन तीकडे भावंडें प्रेमलें । ममत्वानें केलें विश्व माझें ॥
ममत्वें ह्मणतों जगाला सेवीन । मरून जाईन जगासाठीं ॥
ममत्वें मजला खिळीलें खांबाला । ख्रिस्त ओळखीला ममत्वें मीं ॥
ममत्वीं लाधल्या भुक्ति मुक्ति दोन्ही । ममत्व शिराणी श्रेयसाची ॥
ह्मणणें ममत्वा पापदुःखमूळ । नको नको खूळ आह्मा ऐसें ॥
नाचतां येईना आंगण वांकडें । रडोत बापूडे रडणारे ॥
ममत्वानुबंध तुझ्यामाझ्यामध्यें । असाच असूं दे देवबापा ॥
दास ह्मणे तूं मी आणि विश्व एक । ममत्वें सुरेख त्रयी केली ॥

९३

नाहि ठेवियेलें मजला तिष्ठत । सारें वस्तुजात मौन सोडी ॥
वृक्षवल्लरींची करपल्लवी ही । नव नवलाई सांगे तूझी ॥
बोलतां येईना न यो नाहि चिंता । कधींच संकेता उणें नाही ॥
गुलगूल गोष्टी पांखरें करीती । सर्व समजती तूला त्यांना ॥
उगाच मी नाही डोलत हासत । मज अवगत भाषा यांची ॥
तृणांचे तरंग लहरी नर्तन । वाणी ती याहून काय करी ॥
तुझीया कीर्तनीं रंगले निर्झर । श्रवणीं डोंगर रंगलेले ॥
दास ह्मणे देवा जाईन मी जेथें । उपासक तेथें तेथें तूझे ॥

९४

सुंदर देऊळ हृदय हें माझें । एथेंच विराजे देवबाप ॥
समक्षता त्याची राखी शुद्ध ह्याला । सदा अशुद्धाला दूर ठेवी ॥
प्रवृत्तीचें पीठ उभा तयावरी । उपदेश करी पवित्रात्मा ॥
सारा येशू ख्रिस्त भरुनी ऊरला । आतां ह्या देऊळा भय कैंचें ॥
दास म्हणे एथें अवघी मंडळी । भजाया जमली देवबापा ॥

(उपासनासंगीत)

९५

देऊळ अंतरीं तुझें घरीं दारीं । शेजारीं बाजारीं राजद्वारीं ॥
भेटतील भाई भेटतील ताई । देउळें भव्य हीं बापा तूझीं ॥
कृतींत मतींत सर्व प्रतीतींत । देऊळ नितान्त रम्य तूझें ॥
सर्व लाभालाभ सर्व जयाजय । तुझें देवालय सुखें दुःखें ॥
आठवत नाही पुढें आठवेल । सुंदर देऊळ तेंही तूझें ॥
दास म्हणे बापा एकदा दीसलें । तेंच दीसलेलें राहो आतां ॥

९६

असो उरावर चिंतेचा पत्थर । नको होऊं दूर देवबापा ॥
करोत संकटें हवें तें काहूर । नको होउं दूर देवबापा ॥
होऊं दे हा देह आणखीं जर्जर । नको होऊं दूर देवबापा ॥
जाऊं दे प्राणाला सोडूनी शरीर । नको होऊं दूर देवबापा ॥
दास म्हणे माझा एवढाच हट्ट । धरीले मीं घट्ट पाय तूझे ॥

९७

मिळो वा न मिळो अम्हा अन्नपाणी । देवाच्या चिंतनीं मग्न आम्ही ॥
अंगावर चिंध्या असोत नसोत । तसेच जगांत राहूं आम्ही ॥
फुलांचें शयन किंवा कंटकांचें । इच्छेनें देवाचे एक आम्हा ॥
वधस्तंभावर आम्ही टांगलेले । तेथेंच मिळालें सर्व आम्हा ॥
दास म्हणे ख्रिस्तें केलें आम्हा मुक्त । सेवनीं असक्त झालों त्याच्या ॥

( उपासना संगीत )

९८

तूंच एकली एकली । आजवरी माझी भली ॥
तूंच एकला एकला । आजवरी माझा मला ॥
अतां विश्वाच्या पंगतीं । बस माझी ही विनंती ॥
तिथें करीन मी सेवा । प्रेम तेंच ध्यानीं ठेवा ॥
तेंच परी विस्तारलें । देवासंगें दूर गेलें ॥
गेलें सीमेच्या बाहेरी । तेणें झाली नवी परी ॥
दास म्हणे सर्वोत्तमा । तुला ठावी तुझी सीमा ॥

९९

दिसे मजला तें पाहतां येईना । पाहिलें दिसेना काय करूं ॥
हातिं लागलेलें हातांत राहीना । राहिलें लाभेना काय करूं ॥
सद्गुरुवांचून तारण होईना * । पटलें हें मना पूरें येथें ॥
म्हणशी तूं खिस्ता मजमध्यें राहीं[1] । प्रत्यंतर येई याचें येथें ॥
चल ये म्हणतों खिस्तार्पण सारें । देहांतलें वारें देह बुद्धी ॥
दास म्हणे आतां तरी घे सांभाळ । मग मज बोल लावूं नको ॥

१००

गान ऐन रंगीं आलें । देहभान हारपलें ॥
तार तूटली वीणेची । नाहि जीवा दाद त्याची ॥
ताल धरणारा नीजे । तोहि कोणाला पाहीजे ॥
अन्तरात्मा वीणा झाला । मनोवृत्ती धरी ताला ॥
विश्व नर्तनीं रंगलें । द्यावापृथ्वी ऐक्य झालें ॥
डोले माझा देवबाप । हीच स्फूर्ती आपोआप ॥
लेंकुराचा बाप श्रोता । मग काय हो पाहातां ॥
चला माझीया संगीतीं । जें जें येईल तें साथी ॥
दास म्हणे सारें प्यार । इथें सदा मुक्तद्वार ॥

१०१

ओळखीला काय प्रभु येशू खीस्त । त्याचें उक्त वृत्त चित्त रूप ॥
घ्यारे ओळखूनी सारें सारें सारें । नव्हे नव्हे बरें अर्धें मुर्धें ॥
नव्हें उपदेश निषेध सिद्धान्त । साराच सारार्थ खिस्त माझा ॥

---

* सुवार्तिकाचा साथी, अनुक्रमांक ३८–१. १ योहान्न १५:४

आम्हां आटलेल्यां आलिंगी धावून । अक्षय जीवन ख्रिस्त माझा ॥
जीवात्मा आपण परमात्मा त्रय । मधला अन्वय ख्रिस्त माझा ॥
दास म्हणे कोणा येईना सांगतां । अशी माझि सत्ता ख्रिस्त माझा ॥

१०२

मलाहि भेटला मंबाजी दयाळा । धन्य तुझी कळा मायबापा ॥
कुठें कां असेना मंबाजीवांचून । तुझें राज्य शून्य देवराया ॥
मंबाजी भेटला जीव माझा धाला । संस्तवीं तुजला आनंदानें ॥
भला निवडीला पंतोजी तापट । देईल चापट ती ती खरी ॥
इथें नाहि मीचें कांहीं चालायाचें । पाहीजे देहाचें विसर्जन॥
शहाण्याचें नोहे मूर्खाचें गाढव । व्हावें तेव्हां देव कळे येथें ॥
इथेंच चढणें पुढली पायरी । इथेंच ईश्वरी कृपा भेटे ॥
दास म्हणे नाही म्हणणार छळ । सोहळा केवळ सुखाचा हा ॥

१०३

अहो जीवन जीवन । जीवन हें सनातन ॥
तुझ्याकडे धाव घेई । यास प्रतिबंध नाही ॥
उंच नीच लहरींचा । तरंगांचा तुषारांचा ॥
तूंच एकला मालक । तूंच योजक चालक ॥
बदलाया ह्याची गती । गेले मेले मरताती ॥
जीवनाच्या जीवना रे । तूंच सांभाळ हें सारें ॥
दास म्हणे गट्ठी माझी । तुशीं याशीं यांत राजी ॥

१०४

जीवन ह्मणजे अस्थिमांसचर्म । किंवा यांचें कर्म काय काय ॥
जीवन ह्मणजे मातिधोंडे जें जें । म्हणतोस माझें तें तें काय ॥

नाहि त्यास आहे म्हण इवें तर । म्हण जा अमर मेलेल्याला ॥
जीवन म्हणजे मृत्यूचें मरण । धन्य आहेपण सनातन ॥
जीवन म्हणजे स्वयें परात्पर । प्रभु विश्वंभर विश्वकर्ता ॥
जीवन म्हणजे तुझें त्याचें सख्य । भिन्नपणीं ऐक्य विराजलें ॥
दास म्हणे ख्रिस्त पाहिजे तो येथें । नको सांगायातें कोणी कोणा ॥

# अञ्जलि सद्भावा

## वैराग्य

### १०५

नको तेंच कां रे लावीशी पाठीशीं । सांग अर्थ मशीं याचा आधीं ॥
कां रे याला त्याला मज ओढूं देशी । त्रेधा उडवीशी कां रे माझी ॥
कोंबुनी कोटरीं ठेवायाचें होतें । तरी कां पंखांतें वाढूं दीलें ॥
आपूल्याच हस्तें फोडीं हे नयन । बसूं हे झांकून कोठवरीं ॥
सदा पूढें पूढें जीव ओढा घेई । अवजड पायीं बीडी परी ॥
कधीं रे मजला सोडवीशी देवा । सोसवेना जीवा त्रास आतां ॥
दास म्हणे बापा माझि कूरकूर । एकदाची दूर करीनास ॥

### १०६

यारे यारे यारे लुटा सारें धन । तरीच संपन्न होईन मी ॥
यारे यारे यारे करा विडंबन । हाच माझा मान मला व्हावा ॥
यारे टाका मज खांबाला खिळून । तरीच होईन चिरंजीवी ॥
दास म्हणे द्यारे एवढेंच दान । जाऊं द्या म्हणून पूर्ण झालें ॥

### १०७

तूंच दे पितों मी वीख एकदाचें । मजला देहाचें मोल नाही ॥
नको नको धाडूं मज येथें तेथें । सोडुनी पदातें तूझ्या बापा ॥

राहीन उपाशीं राहीन नागवा । राहिं माझ्या देवा तूंच धनी ॥
तूंच धनी माझा भार सोसणारा। माझिया संसारा थारा तूंच ॥
सोड मज मग सोडीलाच प्राण । गांठीले चरण पुन्हा तूझे ॥
दास म्हणे सारें ठाऊकें असोनी । परीक्षा अजोनी किती घ्यावी ॥

१०८

त्याग करवीशी तरी होवो पूरा । नाहि तरी बरा न झालेला ॥
त्रिशंकू सारीखा ठेवणें लोंबत । जिवाची गंमत नको ऐशी ॥
आपटून खालीं चुराडा जहाला । तरी पूरवला याच्यापेक्षा ॥
दास म्हणे बापा लाव रे निकाल । जहाले ते हाल पुरे झाले ॥

---

१ 'त्रिशंकुरिवांतरा तिष्ठ' किंवा 'त्रिशंकूसारखा मधेच लोंबत राहा" ह्या म्हणी प्रसिद्ध आहेत. त्रिशंकु हा सूर्यवंशांतला एक राजा होता. त्याला सदेह स्वर्गीं जावयाचें होतें, म्हणून त्यानें आपला कुलगुरु वशिष्ठ याला तसा यज्ञ करायाची विनंति केली. वशिष्ठानें ती अमान्य केली. पुढें तो विश्वामित्राला शरण गेला. एका दुष्काळांत त्रिशंकूनें विश्वामित्राला व त्याच्या परिवाराला साह्य केलें होतें, ते उपकार स्मरून विश्वामित्रानें त्याला स्वताच्या तपोबलानें सदेह स्वर्गाला नेऊन पोंहचविण्याचा उपक्रम केला. त्रिशंकु वर वर चालला. जातां जातां त्याचें डोकें आकाशाच्या पृष्ठभागाला लागलें, पण इंद्रादि देवांनीं तें धरून खालीं फेंकून दिलें. तो खालीं डोकें वर पाय होऊन पृथ्वीवर येऊं लागला. इतक्यांत विश्वामित्रानें त्याला 'त्रिशंकू, तसाच राह.' अशी आज्ञा केली व तो तसाच लोंबत राहिला, तो अजून तसाच आहे !

( आकाशांत दक्षिणेकडे त्रिशंकु नांवाचा एक नक्षत्रगण आहे ).

१०९

तुला कुठें होते चाकरनोकर । मला हा जोजार कशाला रे ॥
तुझीया पुढारां वाढीलें कदन्न[1] । मजला पक्कान्न कशाला रे ॥
तुला नाहि जागा डोकें टेंकायाला । मला रे कशाला घरें माड्या ॥
कोण हा जुलूम गरीबावरतीं । कां रे ही फजीती मांडीयेली ॥
नको तें लादीलें माझ्या डोईवर । प्रेमाचा सागर धन्य तूंच ॥
बोलतों रागानें काय करूं तरी । ऐकशीना जरी तूंच माझें ॥
दास म्हणे खिस्ता तुझ्या कंथेवरीं[2] । मला जागा करीं थोडकीशी ॥

११०

तुझ्या तोंडावर थुंकले दुर्जन । मग मीच कोण मोठा आलों ॥
तुझ्या पाठीवर ओढियेले वेत । मग ते नकोत मलाच कां ॥
लागे ऊचलावा तुझा तुला खांब । मग मला थांब कोण म्हणे ॥
तुझीया मस्तकीं कंटककिरीट । माझा थाटमाट हाच अंतीं ॥
तुजला खांबाला खिळून मारीलें । मरण निराळें मला कैंचें ॥
दास म्हणे सारा सुखाचा सोहळा । तुझिया निराळा होऊं न दे ॥

१११

पूर आला ओहोळाला । जसा आला तैसा गेला ॥
तैशा संपत्ती विपत्ती । आम्हां भेट देती जाती. ॥
नाही करीतांना आलें । तेंच देवें करवीलें ॥
नावडली चुके तरी । कैशि जिन्याची पायरी ॥
कारागृहीं पूर्ण व्हावें । तई विहंगें जन्मावें ॥
दास म्हणे पंख येतां । दृष्टि सहज व्योमीं आतां ॥

---

१ वाईट अन्न. २ गोधडीवर.

## ११२

शालि फेंकून दीधल्या । आम्हि चिंध्या पांघरील्या ॥
धनाढ्यांनों वीटाळाल । जरी अम्हाजवळीं याल ॥
डोळयांतोनी पाणी वाहे । गरीबांनों घ्यारे घ्या हें ॥
श्वान मांजरें पळालीं । नव्या घरीं जूनीं झालीं ॥
गुरू तैसा त्याचा चेला । कधीं तरी व्हावा झाला ॥
दास म्हणे तूं मी आतां । भले झालों एक खिस्ता ॥

## ११३

अरे हस्ता अरे चित्ता । अतां सोडा सारी चिंता ॥
अतां सोसुन घेणें डाव । नको नको स्वप्नीं नांव
जिणें खोटें पैशावीण । नको आपणा हें ज्ञान ॥
आजपासोनी उदेलें । जिणें नीराळें आपुलें ॥
दास म्हणे जागेपण । जिणें जीणें नव्हें स्वप्न ॥

## ११४

सारें धन द्यावें तेव्हां निर्धनता । थोडीशी ये हातां वेंडप्यांनों ॥
वाटेवर नाही पडलेले हाल । किंमत भराल तेव्हां सारें ॥
देहविसर्जन खांबावर होणें । भाग्य हें पावणें सोपें नाही ॥
अधिरोहिणी[1] ही कळस गांठाया । कोठून लाधाया ज्याला त्याला ॥
दास म्हणे ज्याला प्रसन्न हो देव । अर्पितो ही ठेव तोच त्याला ॥

---

1 शिडी.

११५

अरे दैन्या हारी कोण । तुझें दैन्य आम्हांवीण ॥
आम्हांवीण तूझा दुःखा । गुणग्राही कोण सखा ॥
अगे निंदे अरे छळा । तुम्हा आमूचाच ळळा ॥
वधस्तंभा तुझी तरी । कोण इच्छा पूर्ण करी ॥
आधिं तूम्हाला भाळलों । पुढें आम्ही खिस्ती झालों ॥
दास म्हणे हीच शांती । सर्व आनंदसंप्राप्ती ॥

११६

जया स्वतंत्र ह्मणतां । नाहि त्याच्या स्वचा पत्ता ॥
तेंच गेलें वहावत । कोठें तरी वेड्यागत ॥
आधिं तया एकवटा । मग त्याची करा थट्टा ॥
नाहि तरी थट्टा त्याची । तीच तूमच्या जीवाची ॥
दास म्हणे व्योमावर । चला थुंका हवें तर ॥

११७

जों जों जगाला मी होइन अप्रिय । तों तों माझें ध्येय माझें झालें ॥
जों जों निंदा छळ तों तों वाढे बळ । उज्वळ उज्वळ आत्मनिष्ठा॥
जों जों जग कोपे दूर दूर जाई । तों तों तेंच येई हारीं[1] माझ्या ॥
भय काय आह्मा जगज्जेता गुरू । आमुचें तो करूं पाहीजे तें ॥
आमुचें कशाचें कुठें त्याचा पत्ता । विराजली सत्ता सारी त्याची ॥
दास म्हणे खीस्त अवघाच खीस्त । हळू हळू अस्त पावलों मी ॥

---

१ हारीं किंवा आहारीं ह्मणजे आटोक्यांत, कबज्यांत

११८

प्रपंच प्रपंच प्रपंच हा द्वाड । इथें नाही चाड तूझी माझी ॥
चल प्रभू जाऊं दूर कोठें तरी । चल घडीभरीं माझ्यासाठीं ॥
म्हणालों प्रभूला रागवला नाही । परी खिन्न होई मुद्रा भारी ॥
दाखवी करांना आणि चरणांना । म्हणे पटल्या ना खूणा बोल ॥
कंठककिरीट दिसे शिरावर । कांपू थरथर लागलों मी ॥
पुन्हा बळकट धरी माझा हस्त । अवघा इत्यर्थ ध्यानीं आला ॥
दास म्हणे हें तों घडोघडी चाले । गुरु शिष्य भले दोघे आम्ही ॥

११९

बोकडाचें म्यां म्यां आणी बोलावून । आपण होऊन वैरी सारे ॥
घेउनीयां जीव पळे रानोमाळ । करीत वाचाळ म्यां म्यां म्यां म्यां ॥
सांपडे नरडें मुखांत अरीच्या । तरी तीच वाचा खळ नाही ॥
प्राण आणि म्यां म्यां दोन्ही एकदम । पावती विश्राम अखेरीचा॥
दास म्हणे देहीं अहंकार ऊभा । तोंवर न क्षोभा ऊणें कांहीं ॥

# अञ्जलि सातवा

## वियोग व उत्कंठा

### १२०

अरे माझ्या जीवा कां रे भ्रांत होशी । कां रे हिंडतोशी वणवण ॥
काय पाताळांत तुझें तें डोंबलें । गाठोडें ठेवीलें स्वर्गीं तूझें ॥
तुझें तूझ्यापाशीं तुजला कळेना । मिळालें मिळेना अभाग्याला ॥
माउलीच्या अंकीं नीजलेलें बाळ । वियोगें विव्हळ स्वप्नीं रडें ॥
दास म्हणे ह्याला हालवून करीं[1] । तूंच जागा करीं माउली गे ॥

### १२१

आज नाहि ऊद्यां सुटेल अबोला । मला ही वेड्याला आशा होती॥
एकाएकिं ऐशी जाशिल टाकोनी । कल्पनाही स्वप्नीं नाही आली ॥
परी तेंच केलें खरें त्वां माऊली । पराकाष्ठा झाली दुर्दैवाची ॥
सुचेना रुचेना तुजवीण कांहीं । भारभूत देहीं प्राण वाटे ॥
फाटेना धरित्री कोसळेना गिरी । करूं काय तरी आतां सांग ॥
जगा ठाउका जो मृत्यु तयाहून । हा तो शतगुण भयंकर ॥
धाव धाव ये गे तेंच रागेजलें । पाहूं दे दयाळे मुख तूझें ॥
धाव ये घेऊनी उगारीला दंड । भाग्य तें उदंड मानीन मी ॥
धाव धाव ये गे देइं देइं लाथा । धाव पहा माथा लववीला ॥
नको नको राहूं दूर लपलेली । शिक्षा ही माऊली सोसवेना ॥

---

१ हातांनीं.

तुजविण झालों मृताहून मृत । नको पाहुं अंत दुर्बलाचा ॥
दास म्हणे देवा तुजला मूकला । नरक तयाला दुजा नको ॥

१२२

घडोघडि येई मधे कांहीं तरी । मती हो घाबरी घडोघडी ॥
तळव्याएवढें असो अल्प पान । तरी ते समान डोंगराच्या ॥
किती रे छळावें तुजला म्हणून । धरीतों मी मौन वारंवार ॥
काय दयासिंधो नदीऐसा धावूं । तुझ्याठायिं पावूं लोप पूरा ॥
काय कांहितरी पिऊनीयां घेऊं । निद्रागत होऊं निरंतर ॥
नको नको लावूं असल्या कुमार्गा । नको ऐसा त्रागा करूं देऊं ॥
दास म्हणे मला राहूं दे वेगळा । पडलेला गळां तूझ्या सदा ॥

१२३

अरे माझ्या बंधो स्कंधिं तुझा हस्त । तरी मी संत्रस्त वियोगानें ॥
अरे माझ्या पंथा उभा तुजवरी । दूर कां रे तरी भासतोशी ॥
अरे माझ्या सत्या तुला आलिंगीलें । तरी तूं निराळें कां गा ऐसें ॥
अरे माझ्या जीवा व्यापिलेंस मला । तरी मी मेलेला कां रे ऐसा ॥
अरे द्राक्षवेला मी तों तूझि शाखा । तरी कां पारखा क्षणोक्षणीं ॥
काय अर्थ याचा मजला कळेना । सांगतों यातना होती त्या त्या ॥
ये रे ये रे ये रे आणखीं जवळीं । आणखीं कवळीं मला पाहूं ॥
दास ह्मणे वेड लाविलेंस ज्याला । सांभाळ वेडाला तूंच त्याच्या ॥

१२४

जों जों सांपडशी तों तों पाहिजेशी । स्थितीच ही ऐशी झाली माझी ॥
डोळे भरोनीयां पाहीलें वाटतें । भूक नयनांतें तोंच पुन्हा ॥

आलिंगनीं हस्त ढिले जो पडावे । तोंच आवळावे घट्ट पुन्हा ॥
हृदयीं निवास अनुभवा येतो । तोंच जीव होतो वेडा पुन्हा ॥
दास म्हणे सख्या प्रभु येशू ख्रिस्ता । काय करूं आतां तूंच सांग ॥

१२५

औचित्याचे बंध झाले । ढिले तुटोनीयां गेले ॥
माझि माझीयावेगळी । वृत्ति झालेली माऊली ॥
तुझ्या वात्सल्यानें गडे । केलें शेवटीं एवढें ॥
अतां नाचूं दे नाचूं दे । तुझ्यापुढें प्रेमानंदें ॥
तुझ्यापूढें नको तरी । नको पाताळीं अंबरीं ॥
तुझ्या दर्शनें पावनें । माझ्या नृत्या रंग येणें ॥
दास म्हणे घडीभर । चल आधीं ताल धर ॥

१२६

माझिया अंगाची होते लाहिलाही । राहवत नाही स्तब्ध मला ॥
स्तब्ध राहतांना फुटेल हृदय । नलगे संशय अणुरेणू ॥
बोलतोंच आतां उघड उघड । तुला अवघड वाटेना कां ॥
उंटावरुनियां शेळया राखण्यानें । कितीसे साधणें कार्य कोणा ॥
ये रे ये रे ये रे पुन्हां ऊतरून । दाखवीं राहून पुन्हां येथें ॥
कळे हीत नोहे नेहमीं राहणें । तरी येणें जाणें पाहीजेच ॥
कुठेंही केव्हांही कसाही संचर । परी पृथ्वीवर येच आतां ॥
नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती परी ख्रिस्त ख्रिस्त । जग हें संतत जप करी ॥
याहून आणखी बोलूं मी कशाला । तुला सर्वज्ञाला सारें केळें ॥
दास म्हणे आलों बोलावणें तुला । कोणीं धाडीयेला तुला ठावें ॥

SURESH V. RANADE, Pune
B
3652
PERSONAL LIBRARY

# अञ्जलि आठवा

## निषेध

१२७

खरें हित तेंच आम्हि बोलणार । जग हें हत्यार उपसीना ॥
शिव्याशाप निंदा छळ अप्रतिष्ठा । माकडें ही चेष्टा करीतना ॥
खिळे आणि खांब यांचेच सोबती । किंमत ती कीती यांची अम्हा ॥
देह आणी जीव आधींच त्यजीले । तेव्हां उघडीलें तोंड आम्ही ॥
दास म्हणे आम्ही गुरूचेच चेले । आमुचें वेगळें काय आतां ॥

१२८

एक म्हणे मज द्याहो अधिकार । दुज्याचा संसार आटोपेना ॥
तिसऱ्याचें पोतें निरंतर रीतें । नाचतें चवथें नांवासाठीं ॥
पांचव्याची रड कदापि थांबेना । सहाव्याची दैना मत्सरानें ॥
आपणावांचून उणे सारे जन । सातव्याचें मन हेंच सांगे ॥
खाया घालीं तोच आठव्याचा देव । तयाची सदैव आराधना ॥
नववा रामाचा रावणाचा सखा । सर्वत्र सारखा गोडबोल्या ॥
दहाव्याची जाती सर्वांहून उंच । अकरावा नीच सर्वांहोनी ॥
देवच बारावा स्वयें ज्याचा त्याचा । तयाचीच वाचा धर्मवाणी ॥
असे हे प्रेषित नकोत रे देवा । याहून बरवा अनारंभ ॥
दास म्हणे थट्टा मांडीयेली सारी । अशांचा कैवारी देव नाही ॥

१२९

मुठींत धरोनी बीज मूठभर । गेले जगभर पेरायाला ॥
पुढें करोनीयां सहस्र खद्योतं[1] । रजनीचा अंत करों आले ॥
बुडत्या हत्तीचा कराया उद्धार । मर्कटाचे कर पुढें झाले ॥
दास म्हणे थट्टा मांडीयेली सारी । अशांचा कैवारी देव नाही ॥

१३०

प्रभूच्या नांवाचा उच्चार कधींही । ऐकूं येत नाही बोलतांना ॥
निरंतर आम्ही आम्हीची लाखोली । कदापि संपली होणें नाही ॥
असलीं हीं सोंगें तुझ्या कारभारीं । काय म्हणूं तरी देवा याला ॥
तुझीया नांवानें पूजा आपुलीच । करवाया नीच प्रवर्तले ॥
नव्हते का लोकीं अनेक भूदेव । कशाला हे नव पाठवीले ॥
दास म्हणे बापा उतर हा भार । जाहली जर्जर पृथ्वी यानें ॥

१३१

माझि अडचण माझें नियमन । मतें माझिं ज्ञान इच्छा माझी ॥
सांभाळणें माझा हाच आदिधर्म । पहिलें सत्कर्म हेंच माझें ॥
एवढें करोनी मग देवराया । तुजला सेवाया सिद्ध हा मी ॥
साधीन पराचें हित जन्मभर । तुझा मी किंकर प्रेमार्णवा ॥
अरे मीपणाच्या गुलामा गव्हारा । तुला नाहि थारा देवद्वारीं ॥
दास म्हणे देव नाही ओळखीला । मूढ पुढें झाला त्याच्या कार्या ॥

१३२

निरोप्या देवाचा स्वयें देव झाला । हृदीं विराजला ज्याच्या त्याच्या ॥
राष्ट्र गुलामांचें उभारून नाचे । स्थापितों देवाचें राज्य म्हणे ॥

---

१ काजवे.

गळ्यांत बांधोनी निराशा चालला । जगा द्यावयाला आशा मूढ ॥
दास म्हणे बापा कशाला हीं सोंगें । तूझें कार्य आंगें तूंच करीं ॥

१३३

वादविवादाच्या उघडील्या शाला । व्यर्थ आरंभीला धर्मच्छल ॥
पेटवीला क्रोध कलह विरोध । येणें धर्मबोध कैंचा कोणा ॥
देववेल तरी देऊं अनुभूती । करूं याहो तृप्ती जीवात्म्यांची ॥
कोठें प्रभु ख्रिस्त जग हें विचारी । नका तया चारी दिशा दावूं ॥
दास म्हणे आतां नाही अवकाश । हाच उपदेश आरंभू या ॥

१३४

* धोंड्यांच्या भाकरी । कांरे नाही केल्या तरी ॥
सारे भुकेलेले येते । तुझें राज्य वाढवीते ॥
प्रश्न सहज ऐसा केला । एकदा मीं माझ्या प्रभुला ॥
नाहि रागावला तरी । खिन्नपणा मुखावरी ॥
मला उत्तर मिळालें । मिळालें तें पूरे झालें ॥
दास म्हणे भोजनभाऊ । प्रभो तूझे प्राण घेऊं ॥ ६ ॥

१३५

वैद्याकडे नेऊं व्याधिग्रस्ता आला । आपणच झाला वैद्य त्याचा ॥
बुडत्याकारणें नाव आणियेली । आपुलीच केली पाठ पुढें ॥
मरणारापूढें ठेवी संजीवनी । मुखामाजीं पाणी ओती त्याच्या ॥
दास म्हणे देवा ज्ञात्यांचें अज्ञान । तुझ्यावीण कोण निवारी हें ॥

---

*माथी ४: १- ४

१३६

निंदावया अन्यां तोंडें सवकलीं । जळे पायांखालीं काय पाहा ॥
सतरा पिढ्यांहीं प्रभू आलिंगीला । तरी नाहि झाला भेद दूरीं ॥
जातिभेद पाप अन्य भेद पुण्य । पढविलें ज्ञान कोणी सांगा ॥
काय देवराया तुला अशांवीण । सेवक न अन्य गवसले ॥
दास म्हणे बापा घे रे घे रे छडी । आधिं यांस झोडीं नीट करीं ॥

१३७

मारुनी स्वार्थाला लाथ येथें आला । घेउनी खिस्ताला आम्हांसाठीं ॥
आम्हांसाठिं देह जीव सर्व कांहीं । ऋणाला ह्या नाही सीमा कोठें ॥
तरी एक आतां लहानशी अर्जी । ऐकाल का माझी गरीबाची ॥
तुम्ही मायबाप आम्ही पंगु बाळें । आतां पुरे झालें नातें ऐसें ॥
देव दूर येथें तुम्हीच दैवतें । कधीं पातकातें त्यजाल ह्या ॥
स्वयें उभारून राज्य गुलामांचें । राज्य हें देवाचें म्हणूं नका ॥
आम्ही नाचणारे तुम्ही सूत्रधार । नाट्य कोठवर चालेल हें ॥
कोठवर आम्हा ठेवाल मेलेले । ईश्वराला डोळे नाहीत का ॥
पोहूं द्या बुडूं द्या मरूं द्या आम्हाला । पोहण्याची कला देणें तरी ॥
गुंडाळून ठेवा अवघे सिद्धान्त । आधीं आम्हा खिस्त सांपडूं द्या ॥
नका येऊं रागा निरोप्या मी दीन । आलें तिकडून तेंच बोले ॥
दास म्हणे बंधू भगिनी व्हा पाहूं । मग सारें घेऊं सांवरोनी ॥

१३८

जिथें प्रेम नाही तेथला विचार । क्रूर निशाचर बोकाळला ॥
जिथें प्रेम नाही तेथली कल्पना । डाकिनी[1] नर्तना करी स्वैर ॥

---

१ स्त्रीपिशाच.

जियें प्रेम नाही तेथली वासना । महाविषानना[1] खवळली ॥
दास म्हणे माझा देवबाप प्रेम । प्रेम हाच धर्म शर्म मुक्ती ॥

१३९

[ आकाश मेघव्याप्त झालें आहे अशा सूर्योदयाचें हें
वर्णन आहे. संपादक. ]

व्योम खेळलें शिमगा । गाळ राख सारा अंगा ॥
उषा लज्जा दुःखग्रस्त । पुढें येइ भीत भीत ॥
वायु कोठला थांबाया । परी लागे रेंगाळाया ॥
रवी उदयारूढ झाला । घेइ झांकोनी तोंडाला ॥
काय कळे बाळकांला । किंवा फुलां पांखरांला ॥
एवढींच सुप्रसन्न । बाकि सारें झालें खिन्न ॥
दास म्हणे मोठा चुके । जग सारें भोगी दुःखें ॥

१४०

आधिं तूतें आराधीलें । पुढें भांडण मांडीलें ॥
दुर्वृत्तीची धनूकली । ज्यानें त्यानें सज्ज केली ॥
सिद्ध दुर्भाषेचे बाण । एकाहून एक तीक्ष्ण ॥
वीर ईर्षा त्वेष रोष । सेनापती बंधु द्वेष ॥
झालि लढाई संपली । तुला अंतीं समर्पीली ॥
काय करूं सोसवेना । महापाप पहावेना ॥
दास म्हणे अगा देवा । किती करूं तूझा धावा ॥

---

१ मोठी थोरली नागीण.

१४१

कुठें आहे आई मेली । स्मृतींतूनी पार गेली ॥
तरी कांटा जातां पायीं । रडे तोंड आई आई ॥
अशांतली तुझी भक्ती । नाहि ठाव तूझा चित्तीं ॥
दास म्हणे देवराया । नाहि कंटाळलों वायां ॥

१४२

साउली बघोनी भयाकुल व्हावें । मोहें आलिंगावें किंवा तीतें ॥
रात्रीं ऊन नाही ह्मणून रडावें । दिवसा कल्पावें रात्र झाली ॥
कोठें तरि वाजे नगारा ऐकोनी । रंगावें नर्तनीं नादें त्याच्या ॥
वडीलांनीं भले शाबास ह्मणावें । तेव्हां मात्र व्हावें कार्यासक्त ॥
व्याधि पुरवले नको कडु काढे । सदा हात पुढें खाऊसाठीं ॥
रडावें हसावें हसावें रडावें । क्षणोक्षणिं व्हावें रुष्ट तुष्ट ॥
माझें तें माझेंच तुझें तेंहि माझें । म्हणतां न लाजे अज्ञ स्वार्थी ॥
मृत्तिकेचे घोडे मृत्तिकेचे स्वार । स्वयें धुरंधर सेनापती ॥
अंगुष्ठ आपूला मिष्ट आपणातें । म्हणून अन्यातें समर्पावा ॥
दास म्हणे झाला पोरपणा सारा । तरुण म्हातारा भेद नको ॥

१४३

सदा विठ्ठल विठ्ठल । नाहि क्षणभरी खळ ॥
संसाराची दाद नाही । नाहि प्रेमलेश देहीं ॥
मनीं विठ्ठलाची मूर्ती । उभी जेशी बाहेरीं ती ॥
महापापी म्हण याला । किंवा म्हण चूकलेला ॥
तूं तों देवाजीचें स्थान । दिलें स्वार्थाला आंदण ॥
काम क्रोध लोभ गर्व । कोणि तरी तूझा देव ॥

पूर्ण करावी वासना । हीच तूझी उपासना ॥
भला विठलाचा भक्त । तूं तो विटंबीला खीस्त ॥
भयंकर मूर्तिपूजा । तुझी विचार कोणा जा ॥
नाश मोठाच मोठ्याचा । दास बोले सत्य वाचा ॥

१४४

आम्हीं टाकीलें टाकीलें । अरे नंदी तूझें झालें ॥
नको भीती नको कोप । ये रे घे घे हें आटोप ॥
वेड्याऐसें नको करूं । नको शिंगांना ऊगारूं ॥
आम्हापाशीं काठी नाहीं । न ती घेणें आम्हालाही ॥
तरी तूला दंडिणार । आम्हामागें निरंतर ॥
दास म्हणे वाटे दुःख । आत्मघात करी मूर्ख ॥

१४५

पट्टासांखळीची आवड जयांना । होवोत तीं त्यांना लखलाभ ॥
असोत लोहाचीं सोन्याचीं असोत । मौक्तिकें गुंफोत कोणी त्यांना ॥
नांवें तयांवर अधिकार कीर्ती । सन्मान श्रीमंती कांहीं कोरा ॥
नकोत तीं आम्हां नरकयातना । कोणता शहाणा आलिंगील ॥
दास म्हणे देवा तुवां सोडवीलें । पाहिजे राखीलें तूंच आतां ॥

१४६

कांहीं नव्हतें जोंवरीं । खेळगडीच तोंवरीं ॥
धार उडाली वरोनी । गेलि हाडूक टाकोनी ॥
गूरगूर डसाडसी । सुरू फाडाफाडी खाशी ॥
संधिविग्रह विग्रहसंधी । मौज सारी सारी धुंदी ॥
दास म्हणे तुझ्या तूला । अरे स्वार्थी साध्य लीला ॥

१४७

जमेकडे आलें नाहि त्याची दाद । खर्चाची फिर्याद घडोघडीं ॥
असे घेणेकरी देवा तूझ्या दारीं । केविं सावकारी वर्णू यांची ॥
खर्च वीसरले जमा नित्य ध्यानीं । बरे यांच्याहोनी श्वानगज ॥
केल्याचें कौतूक कुठेंच होईना । सारि विडंबना न केल्याची ॥
दुःखाचे डोंगर सौख्या लवमात्र । हेंच महासूत्र पाठ यांना ॥
जळो ऐशि वृत्ती जळो ती प्रार्थना । असो माझ्या मना वीट यांचा ॥
दास म्हणे बापा दुखी तूझें मूल । कृतघ्नाचें खूळ दुःख न तें ॥

१४८

[ १४८–१५० हे अभंग १९१८ च्या इन्फ्लुएन्झाच्या सांथीमध्यें लिहिलेले आहेत—संपादक. ]

पाहिलीं सकाळीं दोन तीन प्रेतें । मन संसारातें कंटाळलें ॥
लाविलें दुपारीं स्वार्थें भांडावया । रात्रिं जागावया संतापानें ॥
पुन्हा उजाडलें रोगानें गांठीलें । दीनवाणें गेलें घाबरून ॥
अनुतापें तप्त करी समर्पण । तनमनधन जगन्नाथा ॥
ऊठलें लागलें पुन्हा संसाराशीं । पातकाच्या राशी घालावया ॥
दास म्हणे सोंग श्मशानविरागी । सदाचें अभागी भ्याड मूढ ॥

१४९

ये रे ये रे ये रे धाव रे विवेका । उच्च स्वरें हांका मारी आर्त ॥
मूळ नाही तेथें पाहाया विस्तार । इच्छिणें हें सार मूर्खत्वाचें ॥
विवेक पाहीजे आधीं हृदयांत । जागा वा प्रसुप्त कैसा तरी ॥
तेव्हां जाय हाक ऐकावया तया । करुनीयां दया पूढें होई ॥

प्रसंग पडतां आरडाओरडा । करून कोरडा फळ काय ॥
दास म्हणे आला हंगाम साधोनी । करून पेरणी ठेवा आधीं ॥

१५०

रडलों रडेन प्रभूही रडला । ह्मणूनच झाला घरचासा ॥
हसेना रडेना असला पत्थर । मेलें कलेवर आम्हा नको ॥
आनंदाचा वृक्ष प्रेमाची वल्लरी । आमूच्या अंतरीं फुललेलीं ॥
कधीं याचीं पुष्पें कधीं तीचीं अर्पूं । जगाला संतर्पूं सुखें आम्ही ॥
आम्ही ओळखीलें पुरें पुरें त्याला । भितें जग ज्याला निष्कारण ॥
दिसो कोणा भूत सखा दिव्यदूत । देवाचा प्रेषित काळ आम्हा ॥
दास म्हणे ज्याचा प्रभु मृत्युंजय । भिई सारें भय तयालाच ॥

१५१

रवीचा प्रकाश वालुकानिकरीं । किती दाहकारी पुसूं नका ॥*
तोच अवतरे चंद्रम्याच्या ठायीं । होय तोषदायी संतप्तांना ॥
दान अपात्राला करोनी आपाप । जगताचे शाप माथां घ्यावे ॥
परी तेंच पात्रालागीं करीतांना । प्रसवे फलांना अमोघांना ॥
दास म्हणे होती विवेकावांचून । सद्गुण दुर्गुण पुण्य पाप ॥

१५२

आतां वैजयन्ती गळयांत पडती । कुऱ्हाडींचे माथीं घाव आतां ॥
आतां रडारड अश्रूंचे अंजली । घडीमध्यें झालीं तीन सोंगें ॥

---

* रवि... न दहति तावद्यावद्दहतीव वालुकानिकरः । अन्यस्माल्लब्धपदः प्रायो नीचः सुदुःसहो भवति" ॥ या सुभाषिताचा या चरणाला आधार आहे.

वारा वाहे तैशी जनताही वाहे । जाणून मी आहें देव बापा ॥
लोकमत मला नलगे स्वप्नांत । पुरे तुझें मत समजूं दे ॥
तुझीयाप्रीत्यर्थ घडो जनसेवा । एवढाच व्हावा आशीर्वाद ॥
दास म्हणे मीही त्यांतलाच प्राणी । घेइं सांभाळोनी तूंच बापा* ॥

१५३

थोडा वेळ तरी उगा राहिं पाहूं । होईल तें होऊ जीवा तूझें ॥
सामर्थ्य जयाचें ज्याचा मान राज्य । धर कांहिं लाज त्याची तरी॥
काय तयाहून शहाणा तूं क्षुद्रा । पातक्या अभद्रा मूढा जीवा ॥
करील तो न्याय करील तो शुद्धी । देईल तो बुद्धी नवी कोणा ॥
दास म्हणे जीवा येईल जो तया । नेईं तयाचीया पायांपाशीं ॥

१५४

घडा ऊपडा पडला । वर मेघ कोसळला ॥
कोसळला चाऱ्ही मास । नाहि खंड ठावा त्यास ॥
घडा कोरडा राहीला । अंतिं फुटोनीयां गेला ॥
दास म्हणे बहिर्मुखे[1] । तया बोध व्योमीं[2] डांख ॥

१५५

सदैव उराशीं चिकटला बाल । झालाखालीं[3] शाल लावलेला ॥
वृद्ध झाला तरी मायबाप शिरीं । सांगितलें करी काज मूढ ॥
दुर्बळ बावळा सदा ठरलेला । पुरा संवकला पारतंत्र्या ॥

---

* शेक्सिअरच्या ज्यूलिअस शीझर नाटकामधल्या एका प्रसंगाचा या अभंगांत उल्लेख केला आहे. * मात्थी ६: १३

१ तोंड फिरवून बसलेला बेफिकिर. २ आकाशाला. ३ झाडाखालीं.

पाठ थोपटावी तोंड गोंजारावें । मेलें मढें व्हावें तेव्हां जागें
दास म्हणे बापा सोडीव ! सोडीव । जरी तुझें नांव व्हावें येथें[1] ॥

१५६

ठेवा गुंडाळून तर्क आणी ज्ञान । कासावीस प्राण केले यांहीं ॥
नकोत कुणाला गारुड्यांचीं पोतीं । भट्टींत परतीं पडतना ॥
भेटवा जगाला सखा प्रभु ख्रिस्त । जग हें तृषार्त तयासाठीं ॥
तोच तोच तोच उभा करा पाहूं । नका व्यर्थ गाऊं गाणीं अन्य ॥
दास म्हणे तोच आणीला पाहिजे । मग होईल जे होंऊं द्या तें ॥

१५७

देवदिनी[2] येई सप्तकाच्या अंतीं । हारवे महती तेणें तीची ॥
बारा मास होतां सणाचें दर्शन । महत्त्व म्हणून थोर त्याचें ॥
अतिपरिचयें अवज्ञा म्हणती । चुकेना प्रतीती देवालाही ॥
जों जों परिचय अधीक अधीक । दुणावतें सुख तों तों जेथें ॥
तेथें खरें प्रेम श्रद्धा पुरी तेथें । स्वयें प्राप्त होतें प्राप्य तेथें ॥
दास म्हणे देवें ताजवा कसोटी । ठेवियेलीं गांठीं ज्याच्या त्याच्या ॥

१५८

रडावें अथवा हसावें कळेना । सखा बाबा मौना तूंच तेथें ॥
बाजरपारखी रत्नें पारखीती । तिथेंही संगाती तूंच मौना ॥
सर्वज्ञ धांवले सर्वज्ञाच्या काजा । तिथें तूंच माझा थारा मौना ॥
लाथ देणाराचा लाथखाऊ भक्त । तिथेंही संगत तूझी बरी ॥

---

१ या देशांत. २ देवदिनी म्हणजे देवाचा दिवस, शब्बाथ.

गुळाचा गणेश गुळाचा नैवेद्य । तिथें गुरु वंद्य तूंच मौना ॥
दास म्हणे बापा स्तब्ध तूं जोंवरी । आम्हीही तोंवरी मौनव्रती ॥

१५९

घरामध्यें विश्व सर्व । अंतरांत सारा गर्व ॥
झालि दृष्टी अस्तंगत । कानांवरी सारी भिस्त ॥
दिसे दूसरें वाईट । म्हणूनीच माझें नीट ॥
नसे आशा कोणाचीही । विश्वासाचें नांव नाही
सदा मी मी माझी सत्ता । जप नाही यापरता ॥
काय देवा अशांवीणें । तुला सेवकांना ऊणें ॥
मर्कटें हीं खोडकर । जाळितील सारें घर ॥
दास म्हणे काय करूं । काय क्रोधावेशें मरूं ॥

१६०

बांधा रे गाठोडीं व्हा रे व्हा चालते । जयां नावडते हिंदभूमी ॥
हात जोडितों मी प्रेमावीण कोणी । नका खिस्तवाणी खोटी करूं ॥
तारील आम्हाला सत्ता किंवा वित्त । हीच समजूत आधीं खोटी ॥
नकोत आम्हाला पितरें दैवतें । बंधुत्वाचें नातें जोडा पाहूं ॥
दास म्हणे झालें काल तें वीसरा । नवी वृत्ती धरा आज आधीं ॥

१६१

मृत्तिकेसमान झालें सारें वित्त । तरी धडगत नाही तूझी ॥
आई बाप भाऊ बहीणी समस्त । तरी धडगत नाही तूझी ॥
गेला मेला देह साऊली उद्वृत्त[१] । तरी धडगत नाही तूझी ॥
दास म्हणे नेत्रकर्णचित्त तेथें । ठेवुनीयां येथें स्वस्थ राहीं ॥

---

१ शिल्लक.

१६२

स्वभावानें सूचवीलें । तेंच माउलीनें केलें ॥
देहभावें संपादून । दिलें बापा बापपण ॥
कशाचा मी ऋणी यांचा । ऋणी तोच ज्याचात्याचा ॥
ज्ञान झालें बाळकाला । गेला कामांतून गेला ॥
खरी ज्याची त्याची मती । काय ज्ञानाचीया हातीं ॥
प्रेमश्रद्धेचा कुठार । ज्ञान हेंच येथें सार ॥
भला अज्ञानीच भला । देवबापा मी आपला ॥
तुझ्या पायीं सारा जीव । पुरे झाली ही जाणीव ॥
दास म्हणे नको नको । मला दूर धाडूं नको ॥

१६३

पहीलें तयांचें प्रेम अतोनात । परी केला घात संशयानें ॥
देहाचे विलास कापट्याचा हास । अवघा उल्हास वंचनाचा ॥
संतापावरतीं सारें पांघरूण । लौकिका कारण घातलेलें ॥
मनोवृत्ति आणि विश्वास भांडलीं । संदेहाचीं झालीं दास दोघें ॥
असले हे भक्त तुझ्या देऊळांत । पाहुनीयां पित्त खवळतें ॥
तुला म्हणतों मीं तुझें तूंच पाहीं । मनीं स्वास्थ्य नाही परी माझ्या ॥
खडे मिठाचे हे दुधांत अदृश्य । करितील नाश त्याचा परी ॥
दास म्हणे देवा सांगावें तूजला । इथें आटोपला पराक्रम ॥

१६४

परपीडकाचा येईना संताप । त्याच्या माथां पाप तितूकेंच ॥
आत्मघातक्याला निवारीना त्याला । नरक नेमीला सारीखाच ॥

ठावूका असोनी मार्ग दाखवीना । चूकणें यातना त्याला नाही ॥
दास म्हणे दीलें देईना परत । त्याचें भाग्य अस्त पावलेलें ॥

१६५

क्रूरं न दे देवा कार्य मुक्तपणें । मधेंच शहाणें हात घाली ॥
इथेंच तयानें आत्मघात केला । देव कोपवीला अभाग्यानें ॥
अंतरिं कंटाळा ज्यांचा त्यांची सेवा । म्हणे मान्य देवा प्रेमरूपा ॥
इथेंच तयानें आत्मघात केला । देव कोपवीला अभाग्यानें ॥
चारिले भुकेल्या दहापांच घास । म्हणूनीयां दास केलें त्यांचें ॥
इथेंच तयानें आत्मघात केला । देव कोपवीला अभाग्यानें ॥
देवें अल्पज्ञाचा शिकवीता केला । म्हणोनीयां झाला देव त्यांचा ॥
इथेंच तयानें आत्मघात केला । देव कोपवीला अभाग्यानें ॥
आपुल्या सत्तेची पसरी कांटेरी । कुधी राज्यीं सारी देवाजीच्या ॥
इथेंच तयानें आत्मघात केला । देव कोपवीला अभाग्यानें ॥
दास म्हणे ऐशा अभाग्यां बघून । तुझे अश्रुपूर्ण डोळे ख्रिस्ता ॥

१६६

एकीकडे होय एकीकडे नाही । भिंतीवर लीही शब्द दोन ॥
तयांना करून प्रधान आपूले । राज्य चालवीलें महामूर्खें ॥
व्हावयाचें तेंच शेवटीं जहालें । राज्य लया गेलें अकस्मात ॥
याचक तस्कर धूर्त कुक्षिभर । सखे चाटुकारे[1] जोडीयेले ॥
आपुल्या ध्वनीचे खरे प्रतिध्वनी । आणीक मंत्रणीं[2] कोण व्हावें ॥
व्हावयाचें तेंच शेवटीं जहालें । राज्य लया गेलें अकस्मात ॥
दास्य स्वीकारीना तयाचें हननें[3] । किंवा विवासनें[4] साधीयेलें ॥

---

१ तोंडपुजे. २ सल्लामसलतींत. ३ वध. ४ हद्दपारी.

उभारून ऐसें गुलामांचें राष्ट्र । परमसंतुष्ट राव त्याचा ॥
व्हावयाचें तेंच शेवटीं जहालें । राज्य लया गेलें अकस्मात ॥
दास म्हणे देव आणी अरेराव । यांचा वैरभाव सनातन ॥

१६७

हात मी जोडीतों पायां मी पडतों । शिरावर घेतों जोडे ऐका ॥
संदेश तुम्हाला ईश्वरें धाडीला । नका कोणि याला तुच्छ करूं ॥
तुम्ही ईश्वराचे ईश्वराचे राहा । खवळल्या दहा दिशा तरी ॥
आजच देहाला पावूं द्या पंचत्वं[1] । विकूं नका स्वत्व परी कोणा ॥
स्वत्व म्हणतां तें देवाचें ऊसनें । त्याचें देणेंघेणें तोच करो ॥
खरोखर कांड्या पोटामध्यें भरा । करूं नका नरा देव परी ॥
मूर्तिपूजा दूजी कुठेंहि हीहोनी । विनाशकारिणी नाही नाही ॥
नव्हे हें जीवन नव्हे खिस्तीपण । मरण मरण मरण हें ॥
दास म्हणे खिस्त खरा मुक्तिदाता । भलतीच सत्ता त्याची नोहे.

१६८

नव्हे हिंदुस्तान लेंकुराच्या चेष्टा । नव्हेत प्रतिष्ठा भंडाच्या[2] या ॥
इथेंच जाहाले महाधर्मवीर । जयां थरथर विश्व कांपे ॥
इथेंच जहाले मुनी योगीश्वर । अहो आजवर प्रभा ज्यांची ॥
श्रद्धा हेंच ज्यांचें जीवित सर्वस्व । आपुलेंच विश्व घर ज्यांचें ॥
असे भक्तराज इथेंच जन्मले । हृदीं[3] विराजले ज्याच्या त्याच्या ॥

---

१ पंचत्व पावणें म्हणजे मरणें. २ विदूषकाच्या, १३९ याच्या.
३ हृदयांत.

इथें नाचवून भलतींच सोंगें । करुनीयां ढोंगें अर्थ काय ?
मिळवाल तेंही घालवाल अंतीं । घालील फजीती माळ कंठीं ॥
दास म्हणे येथें प्रभु येशू ख्रिस्त । पाहिजे संतत उभा केला ॥

# अञ्जलि नववा

## उपदेश

१६९

इथें ख्रिस्त व्हावा तिथें तो नसावा । स्वहिताशिं दावा मांडीयेला ॥
पायावीण माझ्या पहातों मी डोळां । भयें जीव गोळा होतो माझा ॥
मुळांत मेलेल्या वृक्षाचा पसारा । दिसे मरणारा आज ऊद्यां ॥
मिळाल्या जीवना कां रे कंटाळलां । कोणत्या भूललां विषा सांगा ॥
असो कुणाचेंही मढें तें मढेंच । तेथें उंच नीच भेद नाही ॥
दास म्हणे ख्रीस्त संतत जीवन । हेंच ख्रीस्तपण अन्य सोंग ॥

१७०

[ हा अभंग जर्मनीच्या अध्यात्म व नैतिक अधःपातावरून सुचलेला आहे—**संपादक.** ]

रंकाचा संसार राज्यकारभार । सारखे असार ख्रिस्तावीण ॥
विद्या मीपणाची विवादाची माय । केला हा अपाय मूर्तीमंत ॥
संपत्ती विपत्ती प्रगती दुर्गती । जगणें ह्मणती मरण तें ॥
कशाला कोणाला सांगाया पाहिजे । इतिहास गर्जे आज हेंच ॥
दास म्हणे ख्रिस्ता कधींरे पाहीन । तुजला जीवन जगताचें ॥

१७१

अरे रे ! हा प्राण राहीना जाईना । केवढ्या यातना जीवाला ह्या ॥
केवढे आयास केवढा हा त्रास । मित्रबांधवांस अन्य जगा ॥

आधिंपासुनी जे मरून बसले । शहाणे ते भले भले धन्य ॥
जीवनाच्या अंतीं मरण पहावें । दुर्भाग्य ह्मणावें केवढें हें ॥
मरणाच्या अंतीं जीवन आम्हांला । आम्हि मरणाला लाथाळींलें ॥
आम्हीं नाहीं सारें गुरुरायें केलें । पुरें उद्धरीलें आम्हा दीनां ॥
दास म्हणे आम्हीं धरीले जे पाय । उगाच ते काय सांगा पाहूं ॥

१७२

असा हात मार असें पाणि तोड । करा बडबड शहाणयांनों ॥
इकडे ही थोप येथें ही ऊखळी । इथें दडलेली धोंड मोठी ॥
पुढें धवधवा इकडे भोंवरा । सदा जोर पूरा नवा नवा ॥
फूटल्या सांगडी बुडाला मचवा । मुकायाचें जीवा ठरलेलें ॥
वरचे वरीं घे कोणी ऊचलून । तरीच तारण होणें आतां ॥
दास म्हणे ऐशी एकाचीच सत्ता । बिलग रे खिस्ता जीवा माझ्या ॥

१७३

अन्नपाणि झालें देवाचें चिंतन । तेथेंच प्रसन्न पवित्रात्मा ॥
अशाला समजे तर्कशास्त्रावीण । कसा आणी कोण आपण हें ॥
अशाचा आनंद अशाचीच शांती । अशाच्याच चित्तीं प्रेम राहे ॥
अशानेंच खिस्त पुरा ओळखीला । अशालाच चेला नाम साजे ॥
देवा तूझ्या राज्यीं असेच साजती । शूर सेनापती अजिंक्य हे ॥
दास म्हणे बापा मन्मनीं विचार । नको रे इतर तूझ्यावीण ॥

१७४

* झालि पोटाची दामटी । तहानेनें प्राण कंठीं ॥
आयतें ये पूढें पाणी । पुढें पापीही तत्क्षणीं ॥

---

* योहान ४:६–१४;३१–३४

आधिं तयाचें तारण । आधिं तयाला जीवन ॥
तृषा तुझी काय झाली । सांग कशानें भागली ॥
मला वाटे तुलाही हें । सांगु जातां जड आहे ॥
दास म्हणे प्रेम प्रेम । प्रभु माझा मूर्त प्रेम ॥

१७५

× किती उशीर जाहला । प्रभू माझा भुकेलेला ॥
म्हणे जो तो ऐसें चित्तीं । धांवे तांतडीनें कीती ॥
अनुतापें कासावीस । तुझ्या पुढें उभे शिष्य ॥
अन्न मांडोनी पूढतीं । तुला विनंती करीती ॥
क्षमा करा सद्गुरुनाथा । अन्न सेवन करा आतां ॥
तयां प्रेमें आश्वासीलें । तुवां उत्तर दीधलें ॥
देवबापाचें सांगणें । जगीं पूर्णतेला नेणें ॥
हेंच मला अन्न पूरे । काय नाही ठावें बरें ॥
माझें झालेलें भोजन । नका होऊं कोणी खिन्न ॥
शिष्य सारे समजले । नाहि परी ऊमजले ॥
ऊमजणें तुझ्या हातीं । नाही आम्हा कोणा शक्ती ॥
दास म्हणे योगीश्वरा । युक्त करीं घे किंकरा ॥

१७६

माय बहिणी भाऊ आले । तुझ्या दर्शना भूकेले ॥
वाट दारीं पाहातातील । माया वेडी खरीच ती ॥

---

× योहान्न ४: ३१-३४.

तुला निरोप पावला । म्हणशी तूं नीरोप्याला ॥
जीं जीं देवा समर्पित । तीं तीं माझें गणगोत ॥
ममत्वानें पूर्ण तूंही[1] । इतिहास साक्ष देई ॥
मग ऐसें कैसें केलें । तयां[2] विन्मुख धाडीलें ॥
सांग सांग अर्थ याचा । ऐकुं दे रे तूझी वाचा ॥
दास म्हणे वाचा नको । तुझा माझा योग टीको ॥

१७७

केवढा तूं तूझें केवढें हें काज । कांहींच का लाज नाही मला ॥
नाहि मूठभरी पुरें माझेपण । करूं हें घेऊन काय बापा ॥
दडून राहूं दे मज कोठें तरी । डोंगरीं विवरीं घरीं जनीं ॥
कामच करोनी घ्यायाचें असेल । तरी हा सवाल पूरा करीं ॥
तुझें तुझेपण माझें माझेपण । घेई गा करून अनुरूप ॥
मग सांग मला हवी ती चाकरी । राहूं दे तोंवरी पायांपाशीं ॥
दास म्हणे नाही हातीं भांडवल । फुका चळवळ कोण करी ।

१७९

आत्म्यासंगें[3] आत्मा बोले । आत्मा आत्म्यासंगें डोले ॥
जरी देव चित्तीं नाही । तरी नाही तो कोठेंही ॥
वस्तु कोठें नाही ठावें । साउलीच्या मागें धावे ॥
व्यर्थ त्याचा आटापीटा । काय म्हणावें पिसाटा ॥
दास म्हणे खरोखर । आम्हि देवाचें मंदिर ॥

---

१ लुका १:५२; १९:४१. योहान्न ११ ३५; १९: २६, २७
२ माय बहिणी भाऊ यांना. ३ रोम ८:१६

१७९

दिशा दाही ऊजळती । सूर्य कोठें दाखवीती ॥
ऊजळलें विश्व तेवीं । देव कोठें वसे दावी
आधिं देव तूझ्या मनीं । पुढें सर्वत्र तेथोनी ॥
हीच विश्वाची घोषणा । ऐकूं येई माझ्या कर्णां ॥
दास म्हणे देव तेथें । चित्तदृष्टी माझी जेथें ॥

१८०

पाहिजे का तुम्हा देव । तरि सांगतों उपाव ॥
देह कोठें असेना कां । त्याचा पिच्छा सोडूं नका ॥
जातां येतां खातां पीतां । शय्येवरी पहूडतां ॥
सुख दुःख कांहीं असो । देवबाप दूरी नसो ॥
नांव कांहीं द्या जीवना । त्यांत बघा देवराणा ॥
हृदयांत घरींदारीं । किंवा कांतारीं[1] नगरीं ॥
पहा देवाची विभूती । पहा त्याला सर्वांभूतीं ॥
दास म्हणे उभा देव । स्वयें सर्वत्र सदैव ॥

१८१

दशदिशा साऱ्या उल्लंघाव्या तेव्हां । आलिंगावें देवा ऐसें नाही ॥
चूकवाया दीना सदा लपंडाव । खेळतसे देव ऐसें नाही ॥
हृदयीं हृदयीं त्याचें सिंहासन । घ्या हो ओळखून ज्याचें त्यानें ॥
दास म्हणे बापा धन्य धन्य धन्य । परम वदान्य प्रेम तूझें ॥

---

१ अरण्यांत.

१८२

जग विस्तीर्ण विस्तीर्ण । प्रभू माझा तयाहून ॥
म्हणोनीच मला सांगे । जारे जारे जगामागें ॥
अस्त नाही नित्योदय । प्रभू माझा कोटी सूर्य ॥
निवारीतो सारा ध्वांत[1] । करीं त्याच्या मी निमित्त ॥
हस्त त्याचा उद्धरील । पडो कोणी कीती खोल ॥
दास म्हणे पात्र दीन । धन्य वहातें जीवन ॥

१८३

चल मर पाहूं आधीं खांबावर । नवा अवतार धर पाहूं ॥
अन्नपाणि कर देवाजीचें ध्यान । श्रद्धा हाच प्राण धर देहीं ॥
देह देवालय प्रवृत्ती देव्हारा । येथून संसारा आरंभीं ये ।
दास म्हणे मग बोल कांहीं तरी । मौनच तोंवरी शोभा तूझी ॥

१८४

देतील तयांच्या खाईन मी लाथा । देईन मी माथा सेवेलागीं ॥
एवढाच माझा असो अधिकार । दुर्धर संभार[2] आणीकांचा ॥
तुझीया इच्छेला वाहीले विचार । उच्चार आचार जिणें सारें ॥
येथें आटोपूं दे अवघा संसार । माझें सर्वसार[3] तूंच राही ॥
जयाच्या तयाच्या मुखीं तुझें नांवो । होवो माझे जावो विलयाला ॥
दुःख भय चिंता शिवती कशाला । तुझ्या बाळकाला देवबापा ॥
अन्यांचा उत्कर्ष हाच माझा हर्ष । वाटो सुधावर्ष[4] आत्मयज्ञ ॥
उणेंपण माझें मजलागिं ज्ञात । असूं दे सतत सर्वज्ञात्या ॥

---

१ अंधार. २ ओझे. ३ सर्वस्व. ४ अमृताचा वर्षाव.

तुझा मान तूझी पदवी अनन्ता । अबाधित सत्ता तूझी देवा ॥
कोण वांटेकरी कसा आणि कधीं । होईल दुर्बुद्धी यांचा तरी ॥
तुला राग ज्याचा असो मज त्याचा । सत्यनिष्ठ वाचा सदा राहो ॥
खरें सांगतों मी तुझीया दयेनें । अवघे जातीनें उंच मला ॥
नको रे दयाळा मज तुझा मान । रचीली त्याहून चिता बरी ॥
दास म्हणे देवा साधनसंपत्ती । आधीं दे मागूती काम सांगें ॥

१८५

इशाची मीमांसा करी त्यास हासें । येईल हो कैसें मीमांसेनें ॥
उत्पत्ती प्रचार आसवांचा ध्यानीं । रडत ह्मणोनी कोण बैसे ॥
रडणें हासणें स्वभावाच्या स्फूर्ती । ज्ञानाचीया हातीं काय माती ॥
स्वभावेंच जग स्वभावेंच देव । सारि देवघेव स्वभावाची ॥
दास म्हणे दास ज्ञानाच्या वेगळा । पडलेला गळां बापा तूझ्या ॥

१८६

*परिणामवादी[१] करो कांहीं कल्पे[२] । प्रागतिक[३] जल्पें[४] कांहीं करो ॥
परिणती आणी प्रगती गर्भिणी । किती काळ कोणीं सांगावें हें ॥

---

* मनुष्याची आत्मिक वाढ परिणामवादाच्या व प्रगतिवादाच्या (Evolution and Progress) तत्वाप्रमाणें होईल असें समजणारे पुष्कळ लोक आहेत. हा अभंग रचणाराची या तत्वांवर मुळींच भिस्त नसून, हा म्हणत आहे कीं, ही वाढ होण्याला भावान्तरप्राप्ति ह्मणजे Conversion मनुष्याच्या भावाचाच पालट झाला पाहिजे, व हा निवाडा म्हणजे नकाल-परिणाम आत्मा आणि आत्मा भेटतील म्हणजे परमात्मा जो देव व जीवात्मा जो मनुष्य यांची भेट होईल तेव्हांच होईल.

प्रसवती अंतीं अर्थ वा अनर्थ । हेंहि कोणा ज्ञात सर्वज्ञाला ॥
मन बुद्धी सारें घेइं तुझ्या करीं । हवें तें तूं करीं याचें देवा ॥
पाहिजे जहाली भावान्तरप्राप्ती[1] । ही तो तूझ्या हातीं परात्परा ॥
दास म्हणे आत्मा आत्मा भेटतील । निवाडा होईल तेव्हां खरा ॥

१८७

पुरे करा आतां रिकामें भांडण । प्रेमानें आपण बसूं बोलूं ॥
देवबाप मध्यें आपण भोंवतीं । अहाहा मौज ती मौज खरी ॥
जाणतीं नेणतीं धूर्त वेडथर । कृपा सर्वांवर सदा त्याची ॥
नेणतीं उराशीं आणि खांद्यावर । पुरे हो नजर जाणत्यांना ॥
समजून घेती धूर्त परी भोळे । थांबती जों बोले स्वयें बाप ॥
प्रेमज्योतिमाजी अन्य भिन्न वृत्ती । सर्व काढवाती एक झाल्या ॥
दास म्हणे बापपण भाऊपण । देव धर्म भिन्न व्यामोह[2] हा ॥

१८८

चला चला चला सारे । एकवार जाऊं यारे ॥
देवबापाचीया पायीं । तिथें भेदभाव नाहीं ॥
तिथें सारें माझें तूझें । अस्त पावे नको जें जें ॥
तिथें नित्य रम्य एकी । नांव जीचें नको लोकीं ॥

---

Evolutionist—ज्या सिद्धान्ताला उत्क्रान्ति असें ह्मणण्याचा प्रघात आहे, त्याचा पुरस्कर्ता ह्या सिद्धान्ताला आमचे नैय्यायिक परिणामवाद ह्मणत आले असून अलिकडच्या पंडितांनीं उत्क्रांति–उत्क्रमण असले विचित्र शब्द कां प्रचारांत आणिले हें त्याचें त्यांनां माहीत ! २ठराव, ठराविक मत. ३ प्रगतीच्या (Progress) सिद्धान्ताचे समर्थन करणारा. ४ बडबड.

१ निराळें बनणें–Conversion. २ भ्रम.

तिथें फिटेल संदेह । सर्व ऊह[1] सर्व मोह ॥
दास म्हणे शुद्ध प्रेम । एवढाच तेथें धर्म ॥

१८९

धन्य धन्य माझ्या जन्मभूची कूशी । उपजे महर्षी संत मुनी ॥
कां रे ख्रिस्ती मला कोणीच पुसेना । कोणी रागवेना मजवरी ॥
भेटतों वंदीतों प्रेमें आलिंगीतों । कोणी न म्हणतो विटाळलों ॥
माझिया गुरूला सुखें सन्मानीती । आप्त हा म्हणती आमूचाच ॥
सांगतों नित्याचा माझा अनुभव । नका अवास्तव म्हणूं कोणी ॥
दास म्हणे माझी जननी उदार । तीचा परिवार तीच्याऐसा ॥

१९०

परक्याचे हातीं पडलें जाऊन । परकें म्हणून काय झालें ॥
येथें उगवलें तेथें विस्तारलें । म्हणून जहालें तेथलें का ॥
आपण अपूलें दूसऱ्याला द्यावें । पाहत राहावें तोंडाकडे ॥
या रे या रे सारे परतून घेऊं । करुनीयां दाऊं हक्क खरा ॥
दास म्हणे सांगा सांगा पाहूं ख्रिस्त । आपुलाच आप्त नाही का हो॥

१९१

कशाचा स्वधर्म आणि परधर्म । कां रे हा अधर्म आलिंगीतां ॥
आलिंगुन कोप वैर अभिमान । कुणाचें कल्याण केव्हां झालें ॥
कोण जाय स्वर्गा जातों मी म्हणून । नरकास कोण कोणा धाडी ॥
विश्व सर्व माझें विश्वनाथ माझा । धर्माची सहजा वृत्ती हीच ॥
दास म्हणे नित्य प्रेम विश्वव्यापी । धर्म न कदापि दुजें कांहीं ॥

---

१ तर्क.

१९२

अधर्म विधर्म धर्म महाधर्म । कांहीं म्हणा वर्म सांगतों मी ॥
उरायाचें नाही मज हिंदु खिस्ती । उल्लंघील्या जाती धर्म सारे ॥
होत होत होणें स्वयें मज खीस्त । हेंच मनोगत त्याचें माझें ॥
काय सांगायाचें राहिलें याहून । सांगण्यानें मन कीती कळे ॥
दास म्हणे खीस्ता कर म्हटलेलें । जीवित हें केलें हवालीं मी ॥

१९३

असतील धर्म तेथून सारखे । किंवा ते पारखे एकमेकां ॥
नको आम्हाला ही फुका पंचायीत । आम्हि तों अतीत हीच्या सदा ॥
देवा तुझ राज्य आम्हा लाधलेलें । धर्म समावले यांत सारे ॥
खिस्तासह आम्ही मेलों जन्मा आलों। तुझ्याठायीं झालों जगणारे ॥
देवा तुझे पुत्र मनुष्याचे पुत्र । आम्हाला सर्वत्र आमूचेच ॥
दास म्हणे बापा सांभाळ आम्हाला । तुवां दुर्बलांला उद्धारील्या ॥

१९४

सोडिली मीं जात जात निर्मावया । असें देवराया न हो[1] कधीं ॥
सोडिलें सोंवळें सोंवळें नेसाया । असें देवराया न हो कधीं ॥
सोडिला मीं धर्म धर्म जोडावया । असें देवराया न हो कधीं ॥
आणीत आणीत आणीयेलें जेथें । ठेव मला तेथें तूंच बापा ॥
दास म्हणे बापा तुझें मी लेंकरूं । शिकवीं हें करूं नातें खरें ॥

१९५

मज खिस्ती धर्म कुठें आहे सांगा । नका येऊं रागा विनवीतों ॥
विनवीतों जा हो खिस्ताला विचारा । वृथैव असारा भुलूं नका ॥

---

१ होवो.

नका भुलूं नका भुलवूं अन्याला । मोह न कामाला आला कधीं ॥
नव्हे खिस्ती धर्म हा तों योग पूर्ण । होय अवतीर्ण जगामाजी ॥
देवबाप खिस्त आणि तुम्ही आम्ही । समाधीच्या धामीं विराजलों ॥
म्हणा आम्हा खिस्ती किंवा म्हणूं नका । आम्हा न ठाऊका भेदभाव॥
दास म्हणे माझा गुरू योगीश्वर । एवढेंच सार पुरे झालें ॥

१९६

प्रीतिभूमिमाजी ईश्वरें पेरीलें । बीज वाढवीलें तयानें तें ॥
साधुसंत आणि संदेष्टे जपती । अश्रूंनीं सिंचीती मूळ त्याचें ॥
प्रभु येशू अर्पी निजरक्तसार । दिव्यफलभार तेणें तया ॥
धर्म ऐसें याला म्हणतात जन । प्रभूनें स्वाराज्य[1] नाम दीलें ॥
अलंकार साऱ्या विश्वाचा हा शाल[2] । आश्रय विशाल वैभवाचा ॥
छाया याचि सर्वसंतापहारिणी । आनंदकारिणी निरंतर ॥
स्वर्गपृथ्विवर विस्तार जयाचा । अनन्य हा साचा वृक्षराज ॥
छायेंत मी ह्यांच्या सदा सुखासीन[3] । होतसे वरून पुष्पवृष्टी ॥
माझ्यासवें माझा प्रभु येशु खिस्त । सदाचेच युक्त आह्मी दोघे ॥
प्रेमाश्रूंची वृष्टी माझी तयावरी । त्याचि माझ्यावरी वारंवार ॥
काय सांगु आतां शांतीची माऊली । ययाची साऊली याहो याहो ॥
याहो याहो याचा फुलांचा सुवास । नेई विलयास अशुद्धता ॥
याहो फळें याचीं स्वयें मीं चाखीलीं । अक्षयता झाली माझी तेणें ॥
दास म्हणे याहो इथें खिस्तराणा । अतुल्य सुखांना अर्पीणारा ॥

---

१ स्वर्गाचें राज्य. २ वृक्ष. ३ सुखानें बसलेला.

१९७

कांहिं गुप्त खोल कांहीं हातापाशीं । घरीं माझ्या राशी संपत्तीच्या ॥
असा तसा नोहे गर्भश्रीमंत मी । मला काय कमी केव्हां कोठें ॥
कमी नसतांही कमीसें भासलें । भासलें तें आलें अनुभवा ॥
अनुभवा आलें मन खिन्न झालें । टाकून मीं दीलें अन्नपाणी ॥
पिसाटासमान हिंडतां तूजला । पाहिलें मीं डोळां माझ्यापूढें ॥
मेलेला जीवंत फिरून मी झालों । तुला बिलगलों महालाभा ॥
असेल तें माझें खरें झालें आतां । खरी संपन्नता माझी झाली ॥
दास म्हणे खीस्ता माझीया जीवना । अगा माझ्या धना सर्वस्वा रे ॥

१९८

म्हणा हें अज्ञान किंवा हें विज्ञान । आम्ही बाटेपण स्वीकारीलें ॥
म्हणा ही अनीती किंवा ही सुनीती । आमुची तो वृत्ती बाटवीणें ॥
म्हणा ही कल्पना किंवा अनुभूती । मृत्यु आम्हाप्रती आला गेला ॥
म्हणा दुर्विचार किंवा हा विचार । आमुचा संसार खिस्त येशू ॥
म्हणा हा विरांग कींवा अनुराग । आम्हि पूढें जग आम्हामागें ॥
दास म्हणे आम्ही रंगलों देऊन । आमूचें मीपण खिस्ता हातीं ॥

१९९

नाहि तूं आलास खिस्ती करायास । असले आयास कोण करी ॥
बाह्य आणि खिस्ती जगानें कल्पीले । उदरीं जन्मले हेलनेच्या ॥
घरोघर खिस्त गांवोगांव खीस्त । तरीच पर्याप्त हेतू तूझा ॥
जग हें नाचतें घेऊनीयां नांव । नसेना कां ठाव पदार्थाचा ॥
माजला गोंधळ सारी खळबळ । येणें तळमळ जगीं सारी ॥
दास म्हणे ये रे तूंच ये सत्वर । तूंच ये सुधार बीघडलें ॥

२००

माझा धर्म मज सांगतां येईना । मलाच कळेना कोणता तो ॥
जात कूळ यांची पडली विस्मृती । मजला मेलीं तीं मीही त्यांना ॥
देवाजीचा पुत्र मनुष्याचा पुत्र । एवढेंच मात्र नातें माझें ॥
एवढाच धर्म एवढेंच ज्ञान । एवढें प्रमाण पटलेलें ॥
कसाही असलों तरी नाहीं कच्चा । चेला मी गुरूचा माझ्या जाणा ॥
दास म्हणे आधीं ओळखा तयाला । ओळखा मजला मागाहून ॥

२०१

विश्व सारें एका हातें । विश्वपती एका चित्तें ॥
आकळाया धादावले । अहंकारें भांबावले ॥
स्वयें फसले अन्यांप्रती । त्याच आडमार्गी नेती ॥
नको आम्हा ही दुर्गती । आम्हा आलेली प्रतीती ॥
तूंच आम्हाजवळीं ठेली । स्वयें येवोनी माऊली ॥
बाळकांचें अभ्यन्तर । तूंच केलेलें माहेर ॥
दास म्हणे तूंच येशी । स्वयें आम्हां सांपडशी ॥

२०२

तुझें नाम गावें गानीं दंग व्हावें । विसरून जावें तूला मला ॥
तुजला चिंतावें चिंतनीं रंगावें । आपण बुडावें आपणींच ॥
असली ही विद्या असला अभ्यास । मला शिवायास नको नको ॥
पुत्रनाम आत्मा प्रेमाची भाषा ही । [1] भिन्न भिन्न दोन्ही ऐक्यामाजी ॥
दास म्हणे माझा जसा प्रभू ख्रिस्त । तसा मज युक्त करीं बापा [2] ॥

---

१ आत्मा वै पुत्रनामाऽसि. २ योहान १७:२१-२३.

२०३

सेवेंत रंकांच्या राव रंगलेले । अंत्यजाचे चेले अग्रजन्मे ॥
पतिव्रतांहोनी थोर सत्वधीर । झालें घरोघर पत्नीव्रत ।
अपमान होतां तोच मान झाला । धावे शेवटाला पहिलेपण ॥
घरीं दारीं जेथें तेथें बाटेपण । दिव्यत्वाची खूण हीच झाली ॥
घेवोनियां स्कंधीं प्रेमें नीचतेला । नर्तनीं रंगला उच्चपणा ॥
जीवंतांचे मेले मेल्याचे जीवंत । पहा हें अद्भुत काय झालें ॥
दास म्हणे माझ्या ख्रिस्ताचा दर्बार । सारा चमत्कार मूर्तिमंत ॥

२०४

सागरा नदीनें अर्पिलें मीपण । तरी नदीपण आहे तैसें ॥
दिवाकर आणी दिवस अभिन्न । तरी तेही दोन नवल हें ॥
माझा देव आणि माझा ख्रिस्त एक । तरी तो आणीक[1] निरंतर ॥
आणिक सदाचा मजसाठिं माझा । सखा गुरू राजा जीव माझा ॥
मीहि तयांमाजी जाहलों विलीन । वेगळा फिरून माझ्यासाठीं ॥
दास म्हणे येथें पाहिजे प्रतीती । तियेवीण रीती पंगू साऱ्या ॥

२०५

करा जा हवें तें म्हणा सच्चा झूट । करा काथ्याकूट पोटभरी ॥
साखरेची चवी कळे अनुभवें । अन्योपायें नव्हे ग्राह्य केव्हां ॥
अनुभव व्हावा तरी चला नीट । सांपडली वाट सोडूं नका ॥
दास म्हणे वाट तेंच खरेपण । तेंच हो जीवन तिन्ही एक[2] ॥

---

१ निराळा. २ योहान्न १४:६

२०६

व्युत्पत्तीचें नाहीं इथें कांहीं काम । बुद्धिमत्ता नाम प्रमादाचें ॥
तार्किकांचे तर्क भले ऐकावया । विचारीतो तया कोण येथें ॥
अथातो[१] जिज्ञासा धर्माची कर्माची । कांहीं फायद्याची येथें नाही ॥
इथें व्हावें लागे बाळाहून बाळ । तेव्हांच जवळ जाणें होई ॥
दास म्हणे येथें संबंध सदाचा । आत्म्याचा आत्म्याचा ठेवा ध्यानीं ॥

२०७

नाहि वीझवीला दाबूनी ठेवीला । अग्नि हेतु झाला प्रळयाला ॥
नाहि व्यापादीला[२] गृहीं लपू दीला । सर्प हेतु झाला प्राणघाता ॥
नाहि उच्छेदीला[३] मनीं संग्रहीला[४] । क्रोध हेतू झाला विग्रहाला[५] ॥
दास म्हणे आधीं सोक्षमोक्ष[६] करा । निवास न बरा मध्यंतरीं ॥

२०८

पाहिजे खणोनी टाकिली वासना । तरीच ही दैना टळेल कीं ॥
हीच महामाया[७] षडरींची[८] आई । दुर्विचार भाई सारे हीचे ॥
हिचीं नातवंडें पातकें तितुकीं । विश्वासघातकी वासना ही ॥
दास म्हणे झाला पुरा अधःपात । वासनेचा हात कंठीं तरी ॥

२०९

पाहिला मीं एक पक्का वेडा पीर, । थोडकेसे चार ऐका त्याचे ॥
झुगारूनी देई हातिं आलें मोतीं । उगा चाळी रेती खंडीभर ॥

---

१ यापुढें. २ ठार मारिला. ३ समूळ उपटून टाकिला. ४ सांठवून ठेविला. ५ कलहास. ६ अखेरचा, कायमचा, निकाल. ७ मूर्तिमंत फसवणूक. ८ काम क्रोध लोभ मद मोह मत्सरादि सहा शत्रूंची. ९ खालीं पडणें–नरकाला जाणें.

कल्हईचे सारे दागीने चढवी । जगांत मीरवी डौल त्यांचा ॥
घेऊनी वाऱ्याची मोट डोईवरी । फिरे पृथ्वीवरी वणवण ॥
लिहूनियां ठेवी नांव पाण्यावर । म्हणे हें अमर झालें आतां ॥
सर्प बीलगला पायाला न जाणें ; चिरंजीवपणें गोष्टी करी ॥
दास म्हणे एक नवल याहून । हासतें फिरून आम्हां वेडें ॥

२१०

स्वच्छ पाण्यानें भरलें । भांडें एक पूढें केलें ॥
म्हणे त्यांत दुग्ध घाला । काय म्हणावें वेड्याला ॥
स्वच्छ आणि रिक्त व्हावें । ज्ञान साधें हें नसावें ॥
दास म्हणे येतो राग । असे वेडे जागोजाग ॥

२११

जीवात्म्यादरती परमात्म्याची सत्ता । न ये तो विकीतां कोणा कोणा ॥
देवाचें लेंकरूं भावंड सर्वांचें । कोणी न तयाचे मायबाप ॥
मनुष्याचा पुत्र देवाजीचा पुत्र खिस्त हें सर्वत्र ध्यानीं ठेवा ॥
देवाजीच्या राज्यीं तुम्ही सरदार । नका अधिकार गमावूं हा ॥
रहा आज्ञांकित विनयसंपन्न । करारे सहन छळ निंदा ॥
परी नका सोडूं आपण आपणा । जरी देवराणा व्हावा तरी ॥
रात्रंदिन माझा हाच उपदेश । फोडो सावकाश डोकें कोणी ॥
दास म्हणे देव बोलवीतो आम्हा । आमूचा रिकामा तर्क नाही ॥

२१२

पाहिलें कनक फिरलें मस्तक । चरणहस्तक भ्रांत झाले ॥
आजपेक्षां उद्यां भलतेंच करी । अंधार अंतरीं तों तों माजे ॥

पाहि देवराणा वाट दुःखावेशें । इकडे हें पीसें आहे तसें ॥
स्वयें खणीयेल्या खांचेमध्यें पडे । घडावें ते घडे परिणामीं ॥
दास म्हणे ऐसे कितीक बूडाले । तरी नाही झाले जागें जग ॥

२१३

माळि झाड तोडी कीं त्या जोर यावा । काय निवारावा त्याचा हात ॥
माउली दे बाळा कडू कषायाला । आरोग्य तयाला व्हावें इच्छी ॥
पायींचा कंटक सुईनें काढीतो । काय निर्दय तो मित्र सांगा ॥
बाप नेइ बाळा उन्हांतून घरीं । काय वैरी तरी मानावा तो ॥
नेई उचलोनी आपल्या चरणीं । संकटहरणीं सिद्ध तात ॥
संकटें हजार भक्तांवर लोटी । साधी देव मोठीं कार्यें त्यांची ॥
भजा देवबापा प्रेमानें निर्मल । हृदय कोमल जाणा त्याचें ॥
दास म्हणे देव समजला ज्याला । प्रिय तो तयाला सुखीं दुःखीं ॥

भजनसंग्रह.

# अञ्जलि दहावा.

## विशेप प्रसंग.

२१४

[ या अभंगाचा संबंध मायबाराशीं आहे—संपादक ]

करांत पोतेरें, मुखीं नाम तूझे । हृदयीं विराजे हर्ष सारा ॥
धुरानें फूटती वाटतें नयन । मनांत चिंतन भुकेल्यांचें ॥
ऊरलें सूरलें अमृतासमान । घालेले पाहून अन्य डोळां ॥
फाटकें तूटकें आवडलें मना । प्रेमानें अन्यांना नटवीतां ॥
अन्यसेवा हेंच श्रमविनोदनें[1] । सारा अभिमान इतरांचा ॥
अन्यत्वांत स्वत्व सांठलें विराजे । तुझें तेंच माझें खरें येथें ॥
दास म्हणे येथें जाहलों मी लीन । माझें मज दैन्य कळों आलें ॥

२१५

कई वहावें जीवन । कई पलंगीं शयन ॥
ईश्वराचीं दानें दोन्ही । लाभ अलभ्य म्हणोनी ॥
कुणा काय केव्हां द्यावें । हें तों तयालागीं ठावें ॥
माझा हाच अनुभव । एक प्रेम आणी देव ॥
स्तनपान बाळा व्हावें । असो उजवें किंवा डावें ॥
दास म्हणे सुखदुःख । भेद आलिंगोत मूर्ख ॥

---

१ श्रमपरिहार.

२१६

[ २१६--२१७ हे अभंग यूरोपिअन् महायुद्धानें
सुचविलेले आहेत—संपादक. ]

एकाच रांगेनें व स्तंभ तीन । पुन्हा भिन्न भिन्न पहातों मी ॥
एकाला खिळीला अन्याय संताप । वमे शिव्याशाप भयंकर ॥
एकाला खिळीला पश्चात्ताप रडे । पाही देवाकडे दीनवाणा ॥
मधें खिळीयेलें परार्थ निष्काम । पावित्र्याचें धाम प्रेम शोभे ॥
दास म्हणे आला परीक्षेचा काल । यशस्वी होईल तोच खरा ॥

२१७

संकटाचा अर्थ देवाला ठाऊका । ठाउका भाउका थोडा थोडा ॥
संकट ह्मणजे सोन्याची परीक्षा । खरी खरी दीक्षा महा त्यांची ॥
संकट ह्मणजे देव उशापाशीं । सिद्ध करपाशीं आलिंगाया ॥
संकट ह्मणजे आत्मयज्ञ मूर्त । खिळलेला ख्रिस्त वधस्तंभा ॥
दास म्हणे बापा ऊजवा वा डावा । आधार विसावा हस्त तूझा ॥

२१८

[ सातारा रोड स्टेशनवर एकदां एका ब्राह्मणाचा व एका
ब्राह्मणेतराचा वर्णाश्रमधर्मावरून कडाक्याचा वादविवाद
झाला, तो ऐकून २१८–२२० हे अभंग कवीला
सुचलेले आहेत—संपादक. ]

खरें मी बोलेन पाहिलें सांगेन । म्हणे मज कोण खोटा पाहूं ॥
पाहिली मीं एक प्रसवतां गाय । झालें तिला काय ऐका सारें ॥
सिंह बैल मेष कुक्कुर[1] सूकर । व्याली भराभर एक्या वेळीं ॥

[1] कुत्रा.

अशक्य म्हणोनी हसूं नका मला । पहा प्रमाणाला दावीतों मी ॥
वंदे मातरं या स्तोत्रें वंदिताती । तिचीच संतती पहा कैशी ॥
दास म्हणे धन्य वर्णाश्रमधर्म । निजमातृमर्मच्छेदी खरा ॥

२१९

चिखलाकारणें कमळही त्याज्य । राखुंडी संपूज्य अग्नीमूळें ॥
घटास पाहून शेणखळा माथां । विटाळ अमृता निरंतर ॥
वहात्या गंगेचीं डबकें करोनी । सदा ज्याचीं त्यांनीं सांभाळीलीं ॥
दास म्हणे धन्य वर्णाश्रमधर्म । मूर्तिमंत वर्म विनाशाचें ॥

२२०

जेथोनी जन्मलें तेथेंच सांचलें । जीवन मेलेलें जीवनाला ॥
कूपांत राहोनी विश्वाचा आकर्ष । अवघा संतोष स्वप्नामध्यें ॥
वर्णाश्रमधर्म श्रेयसाचें धाम । केवळ हा भ्रम शहाण्यांचा ॥
दास म्हणे देवा वेडा बाटलेला । भला मीच भला तुझ्या राज्यीं ॥

२२१

[ याचा व याच्या पुढच्या अभंगाचा प्रसंग सहज लक्षांत येण्यासारखा आहे. ]

प्रसाद पद्माचा चापल्य मीनाचें । तेजस्विता नाचे नक्षत्रांची ॥
किती किती किती मोहक हीं नेत्रें । मूर्तिमंत वेत्रें सौंदर्याचीं ॥
वांकडीं तिकडीं हवीं तशीं करी । चमत्कार तरी एक यांचा ॥
स्पर्शमात्रें यांच्या उपजे मनांत । वात्सल्य नितांत शुद्ध रम्य ॥
अस कोठलीही कोणीही कशीही । होई माझी बाई धर्मकन्या ॥
नाहि ह्मणूं नको ऐक ही विनंति । एकदा प्रतीती घेई पाहूं ॥
दास म्हणे तूला सौख्याचें आगर । अक्षय माहेर देतों चल ॥

२२२

एकाएकिं कैशी कळी उमलली । क्षणें उषा झाली रजनीची ॥
उधळीं उधळीं सुधेचे तुषार। करी परिहार तामसाचा ॥
खरीच उषा तूं तुला पाहतांना । आठवण मना ईश्वराची ॥
सस्मित वदन असेंच प्रसन्न । संतोषे पाहून देवबाप ॥
अस कोठलीही कोणीही कशीही । होइं माझी बाई धर्मकन्या ॥
नाहि म्हणूं नको ऐक ही विनंति । एकदा प्रतीती घेईं पाहूं ॥
दास म्हणे तुला सौख्याचें आगर। अक्षय माहेर देतों चल ॥

२२३

विनाशाच्या डोहीं उड्या टाकावया । धांव देवराया चालले हे ॥
चालले जिवाचे बंधु माझे धाव । धरुनीयां ठेव तूंच यांनां ॥
धाव हिंदभूमी रडते म्हातारी[1] । तारक कैवारी तूंच हीचा ॥
तुला सोडुनीयां गेलों यांच्यामागें । भर मला रागें परी धांव ॥
नलगे मजला राजप्रजाकार्य । परी अनिवार्य ममत्व हें ॥
दास म्हणे माझा आधार इथें ही । तुजवीण नाहीं कोणी दूजा ॥

२२४

कोणिं आमंत्रीलें कोणिं मनवीलें । ओढून आणीलें पतंगाला ॥
दिवा पाहियेला वेडावून गेला । विवेका मूकला त्याचा तोच ॥
जाय धाइधाई आलिंगन देई । जळे खाक होई क्षणार्धांत ॥
विपरीत बुद्धी विनाशाच्या कालीं । म्हण ही न झाली वृथा कदा ॥
दास म्हणे बापा सावध अशांना । कोण तुझ्याविना करणारा ॥

---

१ आईला म्हातारी म्हणण्याचा प्रघात आहे.

## २२५

[ २२५–२२९ हे अभंग १९१८ सालचें अवर्षण व दुष्काळ यांना उद्देशून लिहिलेले आहेत—**संपादक** ]

अरे आला आला होय गलबला । जीवमात्र झाला हर्षोन्मत्त ॥
उत्कंठेनें पाही तोंच कांहिं नाही । मांडिली थट्टा ही दुर्दैवानें ॥
अहर्निश व्योमीं मेघ हिंडताती । विव्हळ खालतीं धरित्री ही ॥
आशेनिराशेची चाललेली स्पर्धा । वर्षाकाल अर्धा गेला ऐसा ॥
कालवे हृदय पूढचें चिंतीतां । कुठें जावें आतां जगतानें ॥
धाव देवराया क्षमा कर धाव । तूंच ये वांचीव दयासिंधो ॥
एक हाक हीच धर्म आणि जाती । किती पंचाईती असतीना ॥
एकाचीया पायीं नम्र लोक सारा । सर्वा एक थारा सांपडला ॥
दास म्हणे भेदभाव कटकटी । लोपती संकटीं तूंच एक ॥

## २२६

अन्नावीण झाला कासावीस जीव । धाव रे वांचीव देवा बापा ॥
जीकडे तिकडे हीच रडारड । हीच रे ओरड तूझ्या नांवें ॥
ऐकवेना कानीं पाहावेना डोळां । कल्लोळ माजला विलापाचा ॥
मिळेना भावंडां पुरा एक घास । मजला सुग्रास अन्न देशी ॥
उपकार तूझे मानीतों दयाळा । परी मन्मुखाला चव नाहीं ॥
चव नाहि आतां जगीं राहाण्यांत । पाहणें अनर्थ नको डोळां ॥
राहातों उपाशीं तुझ्या पायापाशीं । रुचेल तुजशीं तेंच करीं ॥
देइं देइं माझें कुणा तरी अन्न । हेंच देगा दान दास म्हणे ॥

२२७

[ लढाया, सांथी, दुष्काळ इत्यादि सध्यां मनुष्यावर तुटून पडलेल्या आपत्तींची शेवटीं परिणति काय होणार हें या अभंगांत सांगितलें आहे—संपादक ]

सवाल देवाच्या फकिराचा माझा। जगाला सांगा जा ऐकाल तें ॥
ऊलट्याचें सारें सूलटें होणार। तोच जगणार मरेल जो ॥
जगेल तो दीन मरून जाणार। श्रीमंत होणार जपेना तो ॥
जपेल तो मूढ भीक मागणार। सेवा करणार सेव्य तो तो ॥
देवळें देवाचीं रितीं पडणार। देऊळ होणार संसाराचें ॥
दास म्हणे पूरी शिजूं द्या कढई। नासायाची नाही भीऊं नका ॥

२२८

नका नका देऊं मज मेजवानी। गरीबाची हानि करूं नका ॥
कंठिं प्राण आले वांचवा तयांना। पावलों सन्माना मग साऱ्या ॥
अलीकडे माझी चव हरपली। क्षुधाही जहाली मंद भारी ॥
वारंवार मूर्च्छा येतसे मजला। ठाउका देवाला रोग माझा ॥
तोच बुद्धिदाता सुचवो माझ्यांला। कसें हो मजला जपावें तें ॥
दास म्हणे देव सांगेल तें करा। अन्य उपचारा करूं नका ॥

२२९

काळ आजचा हा गर्जुनीयां सांगे। व्हा रे व्हा रे जागे ऐका ऐका ॥
गोडघासे सारे ठराल चोरटे। अट्टल भामटे गाढमुष्टी[१] ॥
विलासीं रंगले प्रत्यक्ष रौरव। नको शंकालव यांत कोणा ॥

---

१ मूठ दाबून बसलेला–कंजुष मनुष्य.

ज्यांहिं गोडघास चारीले अर्पीले । मोहरांचे थैले लोभाविष्टां ॥
ज्यांहिं चालवीले तूमचे विलास । साहुनी आयास नानापरी ॥
अन्नावीण त्यांचें कंठिं आले प्राण । करा त्यांचें त्राण पुढें व्हा रे ॥
पुरे करा आतां जिवाचें चोचले । थोडें तरी भलेपण दावा ॥
फकीर देवाचा आणिला निरोप । झालें तेंच पाप पुरे झालें ॥
बंधुभगिनींला ठेवून उपाशीं । कोणींही तुपाशीं खाऊं नये
नाहि नाहि अंध नाहि नाहि दूर । जवळ ईश्वर पाहताहे ॥
दास म्हणे देव शोधीतो माणसें । तया असें तसें कोणी नको ॥

२३०

[ हा व याच्या पुढचा अभंग गरिबांवर जुलूम करून आपला तळीराम गार करणाऱ्या परंतु संभावित समजण्यांत येणाऱ्या माणसांना उद्देशून लिहिलेले आहेत—संपादक. ]

ये रे ये रे ये रे मार ये मजला । परी मेलेल्याला मारूं नको ॥
बुडव ये माझें अवघें डबोलें । गरीबाचें झालें देई देई ॥
करीतों तुझी मी फुकट चाकरी । नको दीनावरी शस्त्र धरूं ॥
ठेव माझ्या डोई खेंटरें आपुलीं । गरिबाची तळी भरू नको ॥
दास म्हणे मत्ता सांभाळ आपणा । नाहि देवराणा नीजलेला ॥

२३१

उपदेशु जातां अग्निमाजि आज्य[1] । आणखींच माज वाढायाचा ॥
न्याय मागुं तरी गरीबें बापूडीं । सदाची लंगडी बाजू यांची ॥
तशांत जगानें ठरवीले थोर । हेच दुष्ट चोर महा ठक ॥
रडत बसावें तुझ्या पायांपाशीं । एवढेंच मशीं सुचे देवा ॥

---

1 तूप.

तूंच ये एकदां पीळ यांचे कान । देईं प्राणदान अनाथांना ॥
दास म्हणे बापा देव गरीबाचा । अनुभव याचा दे दे मूढां ॥

२३२

[ या व याच्या पुढच्या अभंगाचा प्रसंग खिस्तजयंती हा आहे—**संपादक** ]

आज तूझा जन्मदिन । तुला देतों उपायन ॥
आधीं करीं पुढें हात । मग बैस पारखीत ॥
जिणें माझें खूळखूळा । तुझ्या हातीं देतों बाळा ॥
प्रभो माझा माझेपणा । तुझा होऊं दे पाळणा ॥
दास म्हणे गातों गीत । तुला मला मात्र ज्ञात ॥

३३३

झालें तें कशाला पुनः पुनः आतां । लववीतों माथा क्षमा करा ॥
आनंदाच्या पूरीं वाहुनीयां सारी । जाऊंद्या कांटेरी सांचलेली ॥
करूं या साजरी खिस्ताची जयन्ती । भरूनीयां चित्तीं आधीं तया ॥
चला एकचित्त होउनीयां जाऊं । भेटुनीयां येऊं बालखिस्ता ॥
देउं घेउं या हो प्रेमाचीं वायनें । गाउंया गायनें विजयाचीं ॥
गौरव प्रभूचें पृथ्विवर शांती । सदिच्छा जगतीं मनुष्यांत ॥
दास म्हणे हेंच धरू याहो व्रत । सर्वथा संमत सर्वांना हें ॥

२३४

[ २३४–२३७ या अभंगांचा विषय शब्बाथ–विश्रामवार हा आहे—**संपादक.**

बाळ खेळतें जाहलें । पूर्ववृत्त विसरलें ॥
लीलाहर्ष भरे चित्तीं । जननीची जुरे स्मृती ॥

प्रेमदृष्टी तिची सारी । परी तया बाळावरी ॥
वेळ केव्हां हो भूकेची । तिला ठावें लाडक्याची
गृहीं ऊचलोनी आणी । चारि तया अन्नपाणी ॥
मायपणाचा निर्मिता । देवबाप जगत्कर्ता ॥
धावे तुम्हांआम्हामागें । उचलीतो अनुरागें ॥
गृहीं आणी चारी अन्न । देइ जीवन नवीन ॥
हाच पवित्र शब्दार्थ । हाच याचा रम्य अर्थ ॥
दास म्हणे देव प्रीती । दोन अज्ञानी मानीती ॥

२३५

सुंदर आदाना मूकला आदाम । तरी तुझें प्रेम सनातन ॥
आज्ञाभंग करी कुधी नीचकाम । तरी तूझे प्रेम सनातन ॥
अनुतार नाही ठावें तया नाम । तरी तूझें प्रेम सनातन ॥
पापतप्ता देई नियत विश्राम । तरी तूझें प्रेम सनातन ।!
दास म्हणे देवा शाब्दार्थ संगम । तुझा तुझें प्रेम सनातन ॥

२३६

आम्हि सारे यात्रेकरू । संसारींचे वाटसरू ॥
आम्हि जातों अमुच्या गांवा । तेथें अक्षयतेचा ठेवा ॥
सहा वार चालण्यांत । सुखें दुःखें भोगण्यांत ॥
सातवा हा विश्रांतीचा । अम्हां देवदर्शनांचा ॥
सहा वारांचें सासर । सातव्याला ये माहेर ॥
दास म्हणे योजी देव । तें तें अवघें अभिनव[1] ॥

---

१ आश्चर्यकारक.

२३७

संसारसागरीं पोहतां पोहतां । नरनारी आतां बूडतील ॥
म्हणोनी नेमकीं लहानालीं द्वीपें । मधें देवबापें निर्मायेलीं ॥
येईल तयाचा जिवलग मित्र । सिद्ध येशू अत्र स्वागताला ॥
स्वयें देवबाप द्वीपीं या वावरे । सांभाळीं लेंकरें प्रेमानंदें ॥
पवित्र आत्म्याचा वारा द्वीपांवरी । श्रम दूर करी आश्रितांचे ॥
पवित्र शास्त्राचें येथें अन्नागार । कृपेचे निर्झर वाहताती ॥
शाबाथ हें गोड नांव ह्या द्वीपाचें । दर्शन जयाचें हर्षदायी ॥
दास म्हणे येथें घेतांना विसावा । भवसिंधू व्हावा खेळ जैसा ॥

२३८

[ २३८–२४० हे अभंग एका खिस्ती बंधूच्या दीक्षेला उद्देशून लिहिलेले आहेत.—संपादक ]

तुवां हात उचलीला । माझि दीक्षा करायाला ॥
अतां कोठें तरी जाऊं । खोल डोहीं जीव देऊं ॥
सांग पूढें काय करूं । मी तों नादान लेंकरूं ॥
सोड सोड प्रभू मला । हात जोडीतों तूजला ॥
मी तों सोंगाहुनी सोंग । काय तूझ्या मनीं सांग ॥
दास म्हणे खिस्ती भला । नको खिस्त करूं मला ॥

२३९

ऐकुनी ही दीनवाणी । प्रभु बोले आश्वासुनी ॥
तुझ्याऐसे जे जे भ्याले । तेच मला आवडले ॥
पेत्र भ्याला मोशे भ्याला । भीत भीत पुढें झाला ॥
भीरु ऐसे सांगूं किती । माझ्या सैन्यीं सांपडती ॥

हेच परी महावीर । माझ्या राज्याचे आधार ॥
सांग सांग कैसे झाले । स्वयें किंवा कोणीं केले ॥
दास म्हणे आतां येथें । काय द्यावें उत्तरातें ॥

२४०

प्रभू तूझ्या हातीं देह आणि जीव । सांभाळ ही ठेव तूझी तूंच ॥
पाहीजे तो करीं हीचा विनियोग । पाहिजे तें सांग काम आतां ॥
तूंच सांगणारा तूंच करणारा । मी तों सर्वभारावेगळाच ॥
नव्हे मी सर्वत्र माझ्यांतला खिस्त । पुरे ही प्रचीत एवढीच ॥
दास म्हणे हीच खरी खरी दीक्षा । इतर परीक्षा दुर्दैव्याची ॥

२४१

[ हा अभंग कवीनें आपल्या मुलाच्या विवाहप्रसंगीं रचिलेला आहे—संपादक ]

शुभ लग्न सावधान । पडे कर्णीं प्रबोधन ॥*
देवाजीची दिव्यवाणी । हा तों तीचा प्रतिध्वनी ॥
करी ज्याचा त्याचा वंश । करी धर्म आणि देश ॥
वधूवर अन्योन्यातें । याच देती सूचनेतें ॥
शुभ लग्न सावधान । करी संसार गर्जन ॥
पुढें येणारी संतती । हेंच गर्जत पुढें होती ॥
दास म्हणे सावधान । शुभ तयांचेंच लग्न ॥

---

* देवांच्या दरबाराच्या विवाहपद्धतींत कवीनें याचें पुढें दिल्याप्रमाणें विवरण केलें आहेः—संपादक

मों शुभलग्न सावधान म्हटलें, हा देवाच्या वाणीचा प्रतिध्वनि होय. देव म्हणतो, वधूवरांनों शुभलग्न सावधान ! सावधान राहा ! माझ्या इच्छेला मान्य असा, आणि हें तुमचें लग्न निरंतर शुभ ठेवा. तुमचीं कुळें म्हणत आहेत, शुभलग्न सावधान ! सावध रहा ! आमची इभ्रत

२४२

माझेच विचार मज लाजवीती । सांगु ही फजीती कोणा देवा ॥
माझिया नांवाचा वाजताहे ढोल । मी तों मातिमोल मला ठावें ॥
तोंड काढवेना जगामाजि मला । तुला सर्वज्ञाला ज्ञात सारें ॥
जिवंतपणींच लोटुं काय माती । देहाच्या वरतीं काय करूं ॥
उभा पातुकांच्या[१] गिरीच्या खालतीं । तशीच ही कीर्ति झाली मला॥
ये रे ये रे ये रे ने रे ऊचलून । काय आक्रंदन ऐकूं नये ॥
दास म्हणे बापा सांभाळ सांभाळ । भेदरलें बाळ भारी तूझें ॥

---

कायम राखा. तुमचा धर्म म्हणत आहे, शुभलग्न सावधान ! सावध रहा. माझा उत्तम प्रकारें प्रतिपाळ व्हावा म्हणून तुम्ही सहधर्मिणी व सहधर्मी झालां आहां. तुमचा देश म्हणत आहे, शुभलग्न सावधान ! सावध रहा ! तुम्ही उभयतां युक्त झालां आहां, तीं तुम्ही माझें ऋण फेडावें म्हणून वधूवराला म्हणते, शुभलग्न सावधान ! सावध असा ! तुमच्यामुळें माझ्या जन्माचें सार्थक्य होणारें आहे. वर वधूला म्हणतो शुभलग्न सावधान ! सावध अस ! माझ्याहि जन्माचें सार्थक होणें तुजवर अवलंबून आहे. सारा संसार म्हणतो, शुभलग्न सावधान ! सावध असा ! मी तुम्हाला सुखावह होणें वा न होणें तुमच्या सद्गुणांवर व शहाणपणावर अवलंबून आहे. पुढें या दंपतीला संतति होईल, तीसुद्धां शुभलग्न सावधान म्हणत म्हणत जगांत येईल. ती म्हणेल कीं, सावध असा ! माझ्या जन्मापासून जगांत मीं तुमचा आश्रय सोडायला योग्य होईन तोंपावेतों माझ्या सर्व बऱ्यावाईटाचा तुम्हाला जबाब द्यावा लागेल ! सारांश हें शुभलग्न निरंतर शुभ रहाणें हें नवदंपतीच्या निरंतर सावधान असण्यावर अवलंबून आहे.

१ पडत असलेल्याच्या–गिरीच्या म्हणजे पडत असलेल्या डोंगराच्या

## २४३

या अभंगाचा संबंध एका उदात्त विचारांच्या, प्रेमळ, पवित्र कुमारिकेच्या मरणाशीं आहे, इतकें समजल्यावर ह्याचा अर्थ लक्षांत येणें कठीण नाहीं.

विझाली ठिणगी बाग सांवरला । फुलाया लागला जोमें माझा ॥
होतों मी निश्चिन्त आनंदभरांत । नवीं गाणीं गात रोज रोज ॥
तोंच ऊठे जाळ एकाएकीं कोणीं । टाकिलें मीं पाणी तयावर ॥
आज येथें उद्यां तिथें लागे आग । होईना ऊमग कांहीं मला ॥
हळूहळू माझा बाग करपला । नामशेष झाला तोही गेला ॥
कोणा तरी मूढें टाकोनी ठीणगी । केली मौज ऊगी घडीभर ॥
परी मौज त्याची भोंवली बागाला । तया अधमाला काय त्याचें ॥
दास म्हणे ऐसे मौजा करणारे । गळ्यांत खेटरें बांधा यांच्या ॥

## २४४

२४४–२४९ हे अभंग ख्रिस्तविलीन मिसेस् एल्. एम्. एड्वर्ड्स् यांच्या निर्याणानें कवीला सुचलेले आहेत.

कां गा नेलें म्हणे शोभेना रांगेंत । गुणांहीं पर्याप्त[1] झालेलें हें ॥
कां गा नेलें म्हणे याच्यामागें चोर । ठेवीतों निर्घोर स्थानीं याला ॥
कां गा नेलें म्हणे आवडलें मला । माझी कंठमाला रम्य यानें ॥
कां गा नेलें म्हणे याहून बरवा । विनियोग व्हावा याचा आतां ॥
कां गा नेलें म्हणे वियोगेंच याच्या । साधणें तूमच्या कार्या मज ॥

---

१ परिपूर्ण.

कां गा नेलें म्हणे सांगत मी नाही । कळेल तुम्हां ही आशा नको ॥
दास म्हणे नाही विचारीत आम्ही । गेलें तुझ्या धामीं हेंच पूरे ॥

२४५

कोण गेली कोण गेली । श्रद्धा नांवरूप ल्याली[1] ॥
कोण गेली कोण गेली । प्रेम, सेवा एक झाली[2] ॥
कोण गेली कोण गेली । विद्या विनयें वरीली[3] ॥
कोण गेली कोण गेली । छाया प्रभूची पडली[4] ॥
दास म्हणे कोण मेली । गेली म्हणोनी राहीली ॥

२४६

म्हणे काळजीनें कळी संगोपीली । माझी ही खुडीली कोण्या दुष्टें ॥
होय मनिं भारी खिन्न मालाकार । कोप भयंकर नावरे त्या ॥
म्हणे बरें चोरा सांपड एकदा । मग चेंदामेंदा झाला तूझा ॥
करी हातवारे निरर्थ वल्गना । देइ शाप नाना कोणा तरी ॥
करांत धरोनी कळी तीच आला । पाहि मालकाला तोंच डोळां ॥
लाजला हासला प्रसन्न जहाला । म्हणे का वेड्याला शिंगें कोठें ॥
नीवडीलि यानें माझी आवडती । धन्यता थोर ती मानी माळी ॥
दास म्हणे जीवा न हो तूं अधीर । अवघा विचार लोपे तेणें ॥

२४७

न्याय आणि नीती जेथुनी जन्मती । अन्यायाची प्राप्ती[6] तेथें कैंची ॥
सर्वज्ञता दडे प्रमादाच्या[7] आड । केवढा हा द्वाड तर्क तरी ॥

---

१ ल्यालेली. २ झालेली. ३ वरिलेली. ४ पडलेली. ५ राहिलेली.
६ येऊन दाखल होणें. ७ चुकीच्या.

प्रेम हेंच ज्याचें स्वरूप तयाला । धजे शिवायाला क्रौर्य केवीं ॥
देवराया तूं जें योजिशी तें बरें । सर्वथैव खरें कल्याणाचें ॥
कळो त्याचा अर्थ न कळो आम्हाला । ज्ञात तूझें तुला मात्र राहो ॥
दास म्हणे व्हावें एवढेंच दान । तुझ्या पायीं लीन वृत्ती राहो ॥

२४८

कृपादृष्टि तुझी सदा माझ्यावर । श्रुतीही तत्पर माझ्या शब्दा ॥
तुझीया मनाला सदा माझें वेड । सदा माझे लाड हर्ष तूझा ॥
तरी मग दंड करांत पाहून । सोडून पळेन कसा माये ॥
धावून येईन, बिलगेन पायीं । वाहीन माळा ही आसवांची ॥
मस्तकीं माझीया तुझींही आसवें । काय मला व्हावें याच्याहून ॥
दास म्हणे जरी दंडिनी[1] जहाली । तरी ती माऊली माऊलीच ॥

२४९

जीव ख्रिस्तासंगें युक्त । परात्परीं राहे गुप्त ॥ *
तिथें देहाचें धारण । किंवा देहविसर्जन ॥
दोन्हि सारखीं सारखीं । जणूं भावंडेंच सखीं ॥
दोन आळया एक गांव । हिचें तीचें भिन्न नांव ॥
आज ऊद्यां येथें तेथें । तिथें नांवें एकावस्थे ॥
दास म्हणे मृत्युंजय । गुरू शिष्यही उभय ॥

---

१ हातांत छडी आहे जिच्या अशी.

* "तुम्हीं मेलां आहां, आणि तुमचा जीव ख्रिस्तासह देवामध्यें गुप्त आहे" कलस्सै. ३:३.

२५०

[ या अभंगाचा पुनरुत्थान हा विषय आहे—संपादक. ]

बीज मातींत टाकीलें । दृष्टि आड सदा केलें ॥
मेल्यामधून अंकुर । फुटे वाढे वृक्षवर ॥
अग्निमाजीं सोनें गेलें । म्हणे बाळ आटपलें ॥
तेंच कंकण होऊन आलें । बाळ पाहोनीयां डोले ॥
कोष रीकामा पडला । मेला कीटक त्यांतला ॥
तोच पुष्पीं तृणांकुरीं । पंख करी खालवरी ॥
चिंध्या कामांतुनी गेल्या । कुठें तरी फेकुन दील्या ॥
तोच कागद सुरेख । घरीं महाकाव्यलेख ॥
दास म्हणे आम्ही राहूं । देह गेला तरी जाऊं

( भजनसंग्रह. )

# अञ्जलि अकरावा

## प्रेम आणि सेवा.

२५१

घरोघर बाप घरोघर आई । घरोघर ताई भाई माझे ॥
माझिया ममत्वें व्यापियेलें नाही । असें न एकही स्थान कोठें ॥
प्रेम आणि देव एक हा विश्वास । कसा तो विश्वास दूर मानी ॥
विश्व दूर तरी विश्वनाथ दूरीं । काय सांगू वैरी मीच त्याचा ॥
स्वप्नांतहि मज नसो दुजा भाव । हीच एक ठेव दे दे देवा ॥
दास म्हणे बापा माझें भाऊपण । करी संरक्षण तूंच त्याचें ॥

२५२

खालीं आला दूर रानीं । झरा डोंगरावरोनी
आला तेथें सांठवला । पुढें रोड रोड झाला ॥
तळीं सांचलेला गाळ । वरी माजला शेवाळ ॥
कोणि विचारीना प्राणी । कृमी मुर्कूटांवांचोनी ॥
झरा दूसरा पाहीला । क्षण विसावा न त्याला ॥
निघे तैसा धांवे पुढें । कशाचा तो कोणा अडे ॥
सान थोर झरे आले । ते ते सारे आलिंगीले ॥
आलिंगीले एक झाले । भव्य रूपाला पावले ॥
तोषदायिनी ही गंगा । पूजनीया होय जगा ॥
दास म्हणे खरा खरा । हाहि झरा तोही झरा ॥

SURESH V. RANADE, Pune PERSONAL LIBRARY B 3652

२५३

पुण्य गांठिं व्हावें ह्मणून परार्थ । पापमय स्वार्थ नको नको ॥
मेल्यामागें नांव नाचवावें भूत । केवळ अनर्थ हाही नको ॥
नको आवडतो मनाला म्हणून । कोण हो जामीन आवडीचा ॥
तुझी आज्ञा बापा म्हणून साधणें । ह्याहि पोरपणं सिद्धी नाही ॥
स्वपरभेदाचा गळयांत पाषाण । आधिं सोडवण हीच व्हावी ॥
मींच जेथें तेथें मजला पहावें । देणें तरी द्यावें दान हेंच ॥
दास म्हणे गुरू मनुष्याचा पुत्र । तसाच सर्वत्र चेला व्हावा ॥

२५४

असेल तें द्याया सांपडतें येथें । ह्मणून वाटतें जगावेंसें ॥
जिकडे तिकडे सेव्य विराजले । मज लाधलेले सेवकाला ॥
माझा ख्रिस्तराणा मनुष्याचा पुत्र । प्रत्यय हा अत्र पदोपदीं ॥
दास म्हणे जग जगाच्या कारणें । स्वर्गाहून दूणें वाटे मज ॥

२५५

गाडी गाडा घोडा बैल किंवा खर । कोणिं ही साकर आणीयेली ॥
विचारीना कोणी ग्राहक वाण्याला । माल हातिं आला पुरे झालें ॥
फळें गोड गोड तबकीं मांडीलीं । समर्पण केलीं आदरानें ॥
कोणत्या खतांहीं तरू तृप्त केले । कोणाचें अडलें विचाराया ॥
कमलें वेधीलें लक्ष पंकाकडे । कशाला बापुडें जाणार तें ॥
दास म्हणे हीच करून घे वृत्ती । अवघी संसृती गोड लोकीं ॥

२५६

नका म्हणूं तूझे झाले उपकार । ओळखा पामर केवढा मी ॥
अशाचीहि सेवा मान्य करणारे । उदार ते सारे खरे खरे ॥

सेवाधर्म माझा तुम्ही चालवीतां । केवढें हें माथां रीण माझ्या ॥
माझें मज ठावें भिकार जीवित । तुम्हांवीण सार्थ कोण करी ॥
दास म्हणे सेव्य ऋणी सेवकाचा । कशी मज वाचा पटावी ही ॥

२५७

[ मुंबईच्या इन्फ्लुएन्झाच्या सांथींत ज्या उदार, त्यागी स्वयंसेवकांनीं जिवापाड मेहनत करून गरिबांचे प्राण वांचविले त्यांना हा अभंग कवीनें प्रेमपूर्वक अर्पिला आहे—संपादक. ]

परदुःखें दुःखी करी अश्रुपात । तया प्रणिपात माझा असो ॥
परापूढें लोटी ताट जो आपुलें । तयाचीं पाऊलें माथां माझ्या ॥
आर्तशुश्रूषेला देह वाहियेला । बसवीन त्याला माथां माझ्या ॥
दास म्हणे देव देऊळें आपुलीं । करी लोपलेलीं व्यक्त आज ॥

२५८

पाणि म्हणोनीयां पायस अंधारीं । सारें पायांवरीं ओतीयेलें ॥
समजतां आलें मज माझें हासें । वाईट थोडेंसें मना वाटे ॥
हेंच भार्या पुत्र कन्या सून दास । करीतां कोपास मूळ होतें ॥
संयमन त्याचें[1] किंवा विस्तरण । हा न येथें प्रश्न निरर्थक ॥
झालें का समान मीपण तूंपण । सोडविणें प्रश्न हाच येथें ॥
आपणीं जें प्रेम तेंच अन्यावर । पाहिजे उत्तर आधीं याचें ॥
प्रभु येशु ख्रिस्त मनुष्याचा पुत्र । तसाच तूं छात्र त्याचा काय ॥
दास म्हणे जीवा सद्गुरूवांचून । नाहींत हे प्रश्न सूटायाचे ॥

२५९

आपुल्या खुशीनें पाय बांधूं द्यावा । आरडावें देवा सोडीव रे ॥
मूर्खपणा माझा मज कळों आला । करुणा देवाला आली तेव्हां ॥

---

१ त्या कोपाचें

माझें हिंदिस्तान कां न आंग्लस्तान। किंवा तुर्कस्तान कां न माझें ॥
मनुष्याचा पुत्र माझा गुरुराज। मज नाही लाज कांहीं याची ॥
देव आणि प्रेम एक हा विश्वास। हरताळ ह्यास लावीला मीं ॥
वाहत्या गंगेचें पाडुनी डबक। तयांत बदक रंगलों मी ॥
सोडवीलें देवें ह्मणून निभालें। नातरी वाटोळें झालें होतें ॥
दास म्हणे आतां आनंदी आनंद। ममत्वच बंधमुक्त झालें ॥

२६०

कोणिं मानिता आभार। होय केलेलें निःसार ॥
केलेल्याची आठवण। घाण वाईट वमन ॥
अबबब आत्मस्तुती। ही तों रौरवाची प्राप्ती ॥
नांव कीर्ती पुण्यप्राप्ती। उरावरी धोंडे माती ॥
केलेलें तें खिस्तार्पण। पुन्हा मोकळा आपण ॥
दास म्हणे खरी मौज। तरी व्हावें सहजीं सहज ॥

२६१

जाइन स्वर्गाला किंवा नरकाला। नको ही मनाला चिंता माझ्या ॥
नको नको स्वार्थ नको आत्मघात। नको हा सीमन्त पातकाचा ॥
संसाराचा रथ परार्थ हा रथी। कुशल सारथी माझें मी हा ॥
रथ पोंचवीन तुझ्या पायांपाशीं। एवढीच मशीं आशा बापा ॥
तुला पाहिजे ती करीं माझि गती। करीं आशापूर्ती एवढीच ॥
दास म्हणे स्वर्गप्राप्ति माझियांना। माझ्या वेगळ्यांना आधीं होवो ॥

२६२

क्षणामाजि वृष्टी क्षणामाजि ऊन। रम्य संमेलन क्षणें त्यांचें ॥
चाललें बाहेरी इकडे अन्तरीं। हीच माझि परी जाहलेली ॥
किति अशा मौजा तुझ्या समागमीं। कोठवर त्या मी वर्णू खिस्ता ॥

स्मरती प्रसंग मज भिन्न भिन्न । जाय वेडावून जीव माझा ॥
एकदा ह्मणालों गुरुशिष्यनातें । सांभाळीलें यातें पाहीजेच ॥
बसलों येऊन दूर भीत भीत । कसें तरी चित्त आकळोनी ॥
परी हासण्यानें तुझ्या घात केला । यत्न व्यर्थ झाला सारा माझा ॥
ऊठलों धावलों गळां मी पडलों । हसाया लागलों खदखदां ॥
सांभाळितां येना आपूली पायरी । स्थिति झालि खरी ऐशी माझी॥
दास म्हणे भेद आणि सख्य दोन्ही । सांभाळावें कोणीं केव्हां कैसे ॥

२६३

जगाला मेलेले जगासाठीं मेले । जगासाठीं झाले चिरंजीव ॥
जगानें निंदीले जगानें वंदीले । देवासाठीं झाले लीन जगीं ॥
खिस्तमय मन खिस्तमय वाचा । देहही खिस्ताचा सदा केला ॥
आधिव्याधी मृत्यु पळोनियां जाय । आम्हाला अपाय नाही कोठें॥
संपत्ती आमुची अगाध अमोघ । सदा तीचा ओघ वाहताहे ॥
वधस्तंभ वागे नित्य खांद्यावर । राज्य जगावर करूं आम्ही ॥
दास म्हणे आम्ही खिस्तशिष्य ऐसे । जसा गुरू तैसे अलौकिक ॥

भजनसंग्रह.

२६४

हेंचि दान दे गा देवा । घडो नित्य तूझी सेवा ॥
तुझ्या प्रीत्यर्थ विचार । घडो उच्चार आचार ॥
तुझी इच्छा तीच माझी । सदा असूं दे देवाजी ॥
तुझें लेंकरू मी देवा । घेइं बापासम सेवा ॥
तुझें चिंतन जीवन । मृत्यु तूझें विस्मरण ॥
दास म्हणे पुरे झालें । सर्व वैभव हाता आलें ॥

भजनसंग्रह.

# अञ्जलि बारावा

## आयुष्याची क्षणभंगुरता.

२६५

ख्रिस्ताचा मी शिष्य तुझें मी लेंकरूं । तुझी सेवा करूं लागलेलें ॥
एक एक क्षण जिण्याचा माझीया । घे घे देवराया मोजून तूं ॥
माझे जें जें तें तें तुझेंच दयाळा । देऊं हें कोणाला तुझ्यावीण ॥
घ्यावयास ह्याला हात घाली दूजा । तेव्हां हात तूझा पुढें येवो ॥
चोरां भामट्यांचा झाला सुळसुळाट । धेरीयेला हाट सारा याहीं ॥
देवा माझा मला नाही रे विश्वास । तूंच जपण्यास सिद्ध राहीं ॥
बाप तूं समर्थ भिऊं मी कुणाला । कां गा मी चिंतेला वश होऊं ॥
दास म्हणे मौज लेंकूरपणाची । सारि चिंता त्याची मायबापा ॥

२६६

निघन आत्म्याचें धन सांभाळीती । हिशोब मांडीती कवडीचा ॥
तांबें चांदि सोनें पुन्हा लाधतील । काय गेला काल हाता येणें ॥
सांडलेले क्षण एक दोन द्या रे । तुम्हां द्रव्य सारें आर्पितों मी ॥
तुमच्या दासाचा सुखें होतो दास । लववीतों शीर्ष रात्रंदिन ॥
आयुष्य देवाची अमोल देणगी । नका रे वाउगी करूं कोणी ॥
अंगावरल्याची दाद नसे कोणा । हरपल्या रत्ना मोल चढे ॥
जमा खर्च अंतीं विचारील देव । सारी देवघेव चोख ठेवा ॥
दास म्हणे द्या रे देवाचें देवाला । द्यावें ज्याचें त्याला हाच धर्म ॥

२६७

काळाच्या डोहांत कासव संसार । पृष्ठीं नारीनर तयाच्या हीं ॥
खेळती रंगती नाचती हासती । संकटाची भ्रांती नाही कोणा ॥
तोंच एकाएकीं कांसव हालला । हालला पोंचला पाताळांत ॥
दास म्हणे जग बुडत्याच्या छंदीं । स्वयें नित्य वंदी विनाशाला ॥

२६८

नाहि मोजियेले प्रवेश वा अंक । नाही विष्कंभक[1] ठावे कीती ॥
अर्धवट किंवा मुळीं न तयारी । आविर्भाव करी रंगीं नट ॥
भलत्या प्रसंगीं आडवें अपट[2] । आरंभ शेवट भेद नाही ॥
दास म्हणे हेंच सुज्ञांना अज्ञांना । आबालवृद्धांना नाट्य गोड ॥

२६९

घडा फूटलेला सदैव पाझरे । अक्षय हा पूरे म्हणे मूढ ॥
बिडालसर्पांहीं[3] व्यापीला प्रदेश । मध्यें सावकाश फिरे मूष[4] ॥
कडाडली वीज आलि अंगावरी । मद्यप्याला तरी दाद नाही ॥
दास म्हणे काय म्हणूं या प्रकारा । वेडेपणा सारा शहाण्यांचा ॥

२७०

प्रफुल्ल सुंदर रसें पूर्ण ऐसें । पुंडरीक[5] हासे आनंदानें ॥
पाहूनी भूलला भृंग वेडा झाला । तयाचा जहाला दास जैसा ॥
आपण आपणा विसरून जाय । आलों कोठें काय वीसरला ॥
फिरे कमलाच्या भोंवतीं भोंवतीं । गाई त्याची स्तुती हर्षभरें ॥
आलिंगीतां तया पंख थरारती । स्वर्गसुखप्राप्ती झाली वाटे ॥
मधुपानासक्त दिन गेला किती । दाद न तया ती मोहांधाला ॥
रात्र झाली पद्म संकोच पावलें । कारागृह झालें भृंगाचें तें ॥

---

१ दोन अंकांना जोडणारा प्रवेश. २ पडदा. ३ बोक्यांनीं आणि सापांनीं. ४ उदीर. ५ कमळ.

ह्याच कारागृहीं म्हणे मी राहीन । कोठें हो याहून सौख्य लोकीं ॥
दास म्हणे अन्य विषयासक्ताला । नको स्वर्ग झाला विषयची ॥

२७१

[ २७०–२७१ हे अभंग एका संस्कृत श्लोकाचेंच प्रवचन आहे.—संपादक ]

*संपली शर्वरी[1] गभस्ती[2] उदेला । विकास जहाला पद्मिनीचा ॥
आपण सूटलों बाहेरी पडलों । सेवेला लागलों पुन्हा तीच्या ॥
स्वप्न ऐसा पाहे भृंग तोंच गज । एक ये सहज सरोवरीं ॥
लीलेलें तयानें शुंडाग्रें धरीलें । कमल तें केलें स्थानभ्रष्ट ॥
भ्रमर आरडे मेलों हाय हाय । झालों क्षीणोपाय धांव देवा ॥
प्रमत्त तो हस्ती नाही दयामाया । ओळखीना न्याया अन्यायाला ॥
खालीं पद्म ठेवी ठेवी वर पाय । पुढें झालें काय काय सांगू ॥
दास म्हणे निंद्य विषयीं आसक्ती । कितीकां लोटीती मृत्युमुखीं ॥

२७२

पुन्हा एकवार पुन्हा एकवार । गर्जती आतुर सामाजिक[3] ॥
वीनवण्या केल्या धाक दाखवीला । परी व्यर्थ झाला आयास तो ॥
जवनिकेआड[4] पावे अन्तर्धान । रंगीं तें फिरून पात्र नये ॥
रडा नांवें त्याच्या अर्पा त्यास पूजा । करा हवें तें जा आतां पूढें ॥

---

*रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं ।
भास्वानुदेष्यति हसिष्यति चक्रवालं ॥
इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे ।
हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार ॥

१ रात्र. २ सूर्य. ३ प्रेक्षक. ४ पडदा.

रुचेल पचेल पुरेल तोंवरीं । दिलें तयावरी तुष्ट राहा ॥
दास म्हणे सारें असेंच मागलें । आहे तें चांगलें करोनी घ्या ॥

२७३

शिळोप्याच्या गोष्टी आजवरी होत्या । पाहिजेत त्यात्या खऱ्या केल्या॥
* दिवस बुडाया थोडा आवकाश । विषण्ण निराश चित्त झालें ॥
फार आणि थोडें हिशोब आम्हाला । तुला अनंताला काय त्याचें ॥
लेंकुराचें चित्त क्षणैक ऊसनें । तुज ठावें घेणें परी बापा ॥
तेंच घेउनियां जाणुन घे आतां । दुःसह अवस्था माझी देवा ॥
दास म्हणे झालों पुरता अधीन । घेई करवून घेशील तें ॥

* योहान ९ ४. १ खिस्त.

# अञ्जलि तेरावा

## आजार आणि मृत्यु

### २७४

[ २७४–३०० हे अभंग कवीनें आपल्या शेवटल्या
आजारीपणांत लिहिलेले आहेत—संपादक. ]

काय मज होतें सांगु तरी काय । ओळख उपाय नाहीं दूजा ॥
विचार सांगतों थोडींशीं लक्षणें । निदान करणें तुझ्याकडे ॥
तुला पाहिजे ते करीं उपचार । किंवा साक्षात्कार दावीं पाहूं ॥
तुझ्या पायांपाशीं देह ठेवियेला । आतां या जीवाला घोर कचा ॥
दास म्हणे माझी श्रद्धा तूझि शक्ती । आधिव्याधि किती यांच्यापूढें ॥

### २७५

कळेना हा दंड किंवा हा उपाय । असेल हा काय यज्ञ माझा ॥
कांहिं का असेना नीटच हें सारें । होय परभारें इष्ट माझें ॥
निबाप्याला दंड कोण करणार । कसा साहणार केल्या कोणीं ॥
अहाहा जयाला तुवां दंडियेला । धन्य तोच झाला पुत्र तूझा ॥
तुझें तूज ठावें उपाय कोणता । लाभदायी ताता बाळकाला ॥
यज्ञ हा दयाळा करवून घेशी । एवढीच मशीं कृपा पूरे ॥
दास म्हणे बापा जसा भातुक्याला । तसा शासनाला जीव वेडा ॥

२७६

कण्हावें कुंथावें रडावें मोठ्यानें । तेव्हां कोठें होणें जग जागें ॥
कोणिं करावा हा वृथा अविचार । यातनांत भर घालावी ही ॥
जगाला तरी कां उगा त्रास द्यावा । दुधांत सोडावा तक्रबिंदू ॥
तुझ्या अंकावर तुला अंतरांत । भरून मी शांत नीजलेला ॥
राहीन आनंदें जाईन नाचत । ठेव तूशीं युक्त तुझ्याला तूं ॥
दास म्हणे देवा तूंच माझा बाप । ठरेल ही थाप ऐसें न हो ॥

२७७

तूंच माझा वैद्य आतां । अगा माझ्या सद्गुरुनाथा ॥
नाडि माझी तुझ्या हातीं । इथें संदेह संपती ॥
सदा मंगल तुझें ध्यान । हेंच औषध रामबाण ॥
धन्य तूझा अनुग्रह । महासंजीवनावह ॥
दास म्हणे दुःखीं हर्ष । हाच प्रेमाचा निष्कर्ष ॥

२७८

तुझे दिव्यदूत माझियाभोंवतीं । घरीं दारीं चित्तीं देवराया ॥
प्रेमभरें कोणी हळूच हसती । कळेच लागती ऊमलाया ॥
कोणी सांवरीती कोणी आंवरीती । उदीप्त करीती कोणी कोणी ॥
कोणी मज माझा म्हणून जपती । विसरून जाती आपणातें ॥
कोणी निषेधीती कुणी बोध देती । निजतां करीती जागा कोणी ॥
कोणी नीजवीती कोणी खेळवीती । गायनें म्हणती नवीं नवीं ॥
दास म्हणे बापा सारि माझी चिंता । तुला तूझ्या चित्ता विसावा हा ॥

२७९

जगीं दूखणें असेना । परी नकोत वेदना ॥
अशी प्रार्थना मीं केली । देवाबापा ऐकूं गेली ॥
तरी येईना उत्तर । जीव झाला चिन्तातुर ॥
तोंच ऐकिली मी वाणी । दिव्य गंभीर कल्याणी ॥
व्याधि घालितील घाला । कोण सांगेल प्राण्याला ॥
जरी वेदनांचा अंत । तरी तोच आत्मघात ॥
जग आपुलें आपण । क्षणें गांठील मरण ॥
दास म्हणे झालें ज्ञान । वेदनाही कृपादान ॥

२८०

नका रडारड करूं । नका वृथैव घाबरूं ॥
देवबापें धाडीयेला । नवा पंतोजी हा भला ॥
दिसे भारी क्रूर स्वारी । छडी घोडी आली खरी ॥
अतां मानेवर खडा । बरे आह्मी बरा धडा ॥
उलटलें पोरपण । बरें झालें हें फीरून ॥
नाहि लाज कांहीं आम्हां । आम्हां आरंभू ओनामा
दास म्हणे ऊजळणी । बरी झालेली फीरोनी ॥

२८१

प्रभू तुझा हस्त माझ्या खांद्यावर । फिरवीतो कर बाप पृष्ठीं ॥
क्षणमात्र नाही दूर होववत । तुमचें हें व्रत धन्य खरें ॥
सांगूंच का मज काय वाटतें तें । सखा संकटातें मानीतों मी ॥
बंधु बाप माझे सर्वथैव माझे । करी कोण दूजें तयावीण ॥

आपण होऊनी तुम्ही धांव घेतां । अगा बंधो ताता माझ्याकडे ॥
दास म्हणे माझा वास हृदयांत । तूमच्या हें ज्ञात येथें होय ।

३८२

मला आठवतें घेतली पासोडी । आणिलि हुडूडी बळें अंगीं ॥
मुखें चालवीलें अगाई अगाई । ठेवियेलें नाही कांही ऊणें ॥
घाबरली माझी धावली माऊली । मजला कवळी दोन्ही हस्तीं ॥
अश्रुपूर्ण तीचीं नयनें पाहीलीं । माझीही जहाली तीच गती ॥
अनुतापें तस म्हणालों मीं आई । खरें खरें नाही हींव माझें ॥
सारें सोडुनी तूं बसावें जवळ । उत्कंठा सबळ आंवरेना ॥
म्हणून हें सोंग बतावणी सारी । क्षमा मज करीं रडूं नको ॥
क्षणें वात्सल्याचा वाहे महापूर । त्यांत पळीभर खेद कोप ॥
लबाडा म्हणून धरीयेला कान । वाटतो अजून धरीलेला ॥
दास म्हणे प्रेम खरें खरें वेडें । आनंदें सांकडें आलिंगील ॥

२८३

तुझ्या मनांत जें होतें । तें तें पावे उदयातें ॥
हेंच विश्व विश्वनाथा । कळों आलें मला आतां ॥
हेंच आलिंगावें जेव्हां । तुला आकळावें तेव्हां ॥
केल्यावीण माझ्या देवें । कळेना हें कैसें व्हावें ॥
कांहिं नाही करायाचें । तुझ्या अधीन व्हायाचें ॥
मग होईल तें होवो । एवढाच आतां भावो ॥
तुझी भेट मला व्हावी । माझ्या साऱ्या अनुभवीं ॥
दास म्हणे देवराया । नाही सोडीत मी पायां ॥

२८४

कुठें केव्हां होता काल । दिशा नेहमींची भूल ॥
कशाचें रे एव्हां तेव्हां । इथें तेथें हेंही किंवा ॥
देवराया तूंच आधीं । तुझ्यासाठीं हे उपाधी ॥
दास म्हणे नाही तया । भक्ति लावी आलिंगाया ॥

२८५

माझें घरदार माझे आप्तजन । माझा देह मन माझें बुद्धी ॥
माझें ह्मणणारा याहोनी निराळा । सांगाया कशाला कोण हवा ॥
हाच चोर आज भला सांपडला । यानेंच मांडीला खेळ सारा ॥
यानें वाहियेलें सर्व तूझ्या पायीं । तरी हा न होई दूर लोभी ॥
दिलें तया हात हळूच घालीतो । तुला फसवीतो मूढ पापी ॥
घरीं यास कोंडीं अधि कारागृहीं । क्षमापात्र नाहीं निर्लज्ज हा ॥
दूसरें तीसरें कारागृह व्यर्थ । एक तूझें चित्त योग्य याला ॥
आतां प्रभो याची नको करूं गय । होऊनी सदय धरीं याला ॥
दास म्हणे मी चा बंदोबस्त होतां । मग सारी सत्ता[1] स्वर्गमय ॥

२८६

खेळ चाललेला जिवाचा माझीया । किती देवराया पाहाशील ॥
तुझ्या मांडिवरी झोंप ये थोडीशी । तोंच ती[2] नाहींशी झाली भासे॥
अंगावर हस्त तुझा मीही स्वस्थ । तोंच तोही लुप्त झाला वाटे ॥
पाहातां पाहातां दिसेनासा होशी । ऐकतां धरीशी मौन कां गा ॥
जीवन मरण मरण जीवन । हेंच आवर्तन[3] चाललेलें ॥
कोठवर तरी पाहशील अंत । मज हें सोसत नाही नाही ॥
दास ह्मणे बापा पुरे धरसोड । जिराली रे खोड पुरी माझी ॥

---

१-अस्तित्व. २ मांडी. ३ आळीपाळी.

२८७

घरधनी झाला कराच्या अधीन । रथी दीन लीन रथापूढें ॥
साधकावरतीं साधनाची सत्ता । सेव्य सेवि लत्ता सेवकाच्या ॥
वागवी राबवी जड चैतन्यास । हन्त[1] विपर्यासें[2] जगीं सारा ॥
बिघडली घडी घसरला पाय । सुचेना उपाय कोणा कांहीं ॥
दास म्हणे आतां गुंडाळावा गाशा । जावें जेथें आशा गुंतलेली ॥

२७८

सलूं दे सलूं दे आणखी हा कांटा* । पळो बारा वाटा जीव-माझा ॥
असाच पाहीजे चोराला ह्या दंड । केवढा हा पुंड तुला ठावें ॥
कर आधिं याचा पुंडपणा दूर । मग हा उद्धरें[3] कांटा देवा ॥
कळ सोसवेना नलगे सांगाया । लेंकुराची माया तुला बापा ॥
दास म्हणे देवा, ठेव तुझ्या पायीं । यांत मात्र कांहीं बाध नको ॥

२८९

समुद्राच्या पोटीं वाडव म्हणती । कविप्रसिद्धी[4] ती मला वाटे ॥
ज्ञानीचीया स्कंधीं लाभ आरूढला । अज्ञेय हें मला कोडें वाटे ॥
जीवनाच्या पोटीं मरणाचें चिन्ह । उगा तत्वज्ञान मला वाटे ॥
चढणारापाशीं पाय ओढणारा । वितर्क[5] हा सारा मला वाटे ॥
दास म्हणे थोडा येतां अनुभव । अवघें वास्तव[6] कळों आलें ॥

---

१ हायहाय ! २ उलटापालट.

* १ करिंथ. १२:७-९. ३ बाहेर काढ.

१ समुद्राच्या उदरीं असणारा अग्नि-वडवाग्नि. ४ कवींनीं कल्पिलेल्या गोष्टी. ५ कल्पना. ६ खरें.

२९०

व्याधि महाक्रूर वैऱ्याहून वैरी । प्राणिसृष्टि सारी गर्जताहे ॥
मज पामराला परि अनुभव । अहो अभिनव आज आला ॥
नव्हे नव्हे व्याधी वृथैव उपाधी । परी हा समाधी अनिर्वाच्य ॥
नाहि मी एकला कांहींच भोगीत । माझीयासमेत ख्रिस्त माझा ॥
अंतरीं शरीरीं पुरा वांटेकरी । आंवरी सांवरी स्वत्व माझें ॥
दास म्हणे ख्रिस्ता तुझें माझें राज्य । सुरू झालें आज मात्र खरें ॥

२९१

इकडे तिकडे पाहतों बिचारा । बाळ भीरभीरां दीनवाणा ॥
पाहि भोंवताले प्रिय आप्तजन । एक एकाहून ममताळू ॥
कुठें गेलि आई आणा जा तीजला । बाळ ज्याला त्याला वीनवीतो ॥
धांवली माऊली उचली वासरा । अंकाचा आसरा प्रेमें देई ॥
दुःख लया जाय अवघें बाळाचें । मुखावर नाचे हर्ष सारा !
माउलीप्रीत्यर्थ जीव आडकला । क्षणें मुक्त झाला देहांतोनी ॥
तरी मुखावर तोच हर्ष नाचे । वर्णवेना वाचे रडूं येतें ॥
दास म्हणे देवा हीच माझी गती । विलंब रे किती लाविशी हा ॥

२९२

माझिया घरांत माझ्या पायांखालीं । संपत्तीं परलीं अतोनात ॥
म्हणून मी साऱ्या श्रीमंतांचा राजा । भाव आज माझा असो नसो ॥
असल्या वेडानें सदा ग्रासलेला । मिरवितो डौला जेथें तेथें ॥
साधनावाचोनी साध्य हाता आलें । कल्पनेचे चाळे धन्य खरे ॥
दास म्हणे कोणी स्वप्नीं जेवलेले । जागेपणीं झाले तृप्त काय ॥

२९३

एकला असाह्य सोडिलें दुर्बला । जरी तुवां मला देवराया ॥
तरी तेंच योग्य सर्वथैव योग्य । माझें अंतरंग मला ठावें ॥
पुष्कळ मी ऊणा पुष्कळ वाईट । तुज यावा वीट असाच मी ॥
रडलों फोडीली डोई पायांपाशीं । तरी काय मशीं योग्यता ये ॥
दास म्हणे तुझी धन्य वत्सलता । एवढेंच ताता खरें येथें ॥

२९४

नको दृष्टिपूढें पीडा ही असली । अवचीत आली वाणी ऐकूं ॥
काय सांगु झालें मज तया वेळीं ॥ क्षणें बिथरली सर्व सत्ता ॥
अवघीं पातकें भुतेंच जमलीं । खावया धावलीं क्षणें मला ॥
दिशा वेडावल्या काळ खवळला । तुटोनी पडला मजवरी ॥
गेली शुद्धिबुद्धि पडलों मी प्रेत । तोंच तूं धांवत येशी बापा ॥
तुझ्या चाहुलीनें जीव मज आला । दुःस्वप्न पावला अन्तर्धान ॥
दास म्हणे तूझी धन्य वत्सलता । एवढेंच ताता खरें येथें ॥

२९५

परम पवित्रा तुझीया पूढती । क्षणमात स्थिति माझी होतां ॥
दिसे मज माझें स्वरूप भयाण । येथून तेथून अमंगल ॥
आलों त्याच पायीं वाटे परतावें । तोंड लपवावें कोठें तरी ॥
नरक कशाचा स्वयें मी नरक । मूर्त भयानक वाटे मला ॥
अशालाही तूझें प्रेम अंगिकारी । आलिंगाया करीं पुढें धावे ॥
दास म्हणे धन्य तुझी वत्सलता । एवढेंच ताता खरें येथें ॥

२९६

चला आतां नीजूं बसूं । दोघे मिळुनी रडूं हसूं ॥
आतां तूझें माझें खिस्ता । एकदाचें जावो अस्ता ॥
हें न शक्य जरी देहीं । तरी त्याची पर्वा नाही ॥
होणें देहाच्या वेगळा । धन्य केवढा सोहोळा ॥
दास म्हणे एक नातें । कोण गणी येथें तेथें ॥

२९७

धन्य धन्य ह्या वेदना । देहिं क्रूसाच्या भावना ॥
धन्य धन्य धन्य रोग । माझ्या खिस्ती पूर्ण योग ॥
धन्य सार्थक्यीं लागला । देह जीता किंवा मेला ॥
दास म्हणे आतां सुख । माझें मलाच ठाऊक ॥

२९८

जिव्हा रोधियेली नेत्रें झांकियेलीं । निश्चल ठेवीलीं गात्रें सारीं ॥
येणें काय कोणीं साधियेलें मौन । येणें काय ध्यान हाता आलें ॥
आइ आजि पंजी घालितात पिंगा । म्हणे तूंच उगा पोरी राहा ॥
पाहिजे वाहीली सारि परंपरा । आधिं परात्परा वैखरीची[१] ॥
तेव्हांच तें मौन ध्यानाचा आरंभ । ईश्वरी विश्रंभ[२] निरामय[३] ॥
दास म्हणे बापा तूंच दटावून । मज मुकेपण शिकीव हें ॥

२९९

अरे माझ्या बंधो स्कंधिं तूझा हस्त । जीव हा निरस्तभय माझा ॥
अरे माझ्या पंथा उभा तुझ्यावर । दिसे रम्य घर माझें मला ॥
अरे माझ्या सत्या तुवां आलिंगीलें । संदेह गळाले आपोआप ॥

---

१ अभंग ८० वरील टीप पाहा. २ हवाला. ३ निर्दोष.

अरे माझ्या जीवा तुवां व्यापियेलें । मरण मेलेलें माझ्यापूढें ॥
दास म्हणे आतां शेवटली दरी । आज आली तरी तीचें काय ॥

३००

निजीव मजला तुझ्या अंकावर । अंगावर कर ठेव माझ्या ॥
तुझ्या मुखाकडे दृष्टी लागलेली । राहो खीळलेली मायबापा ॥
असाच मजला दयाळा आनंदें । जीव हा सोडूं दे अंतीं आतां ॥
दास म्हणे माझा छंद शेवटला । पुरीव वत्सला एवढा हा.

## समर्पण

जें जें मनीं आलें मुखें उच्चारीलें । हातांनीं जें केलें आज बापा ॥
तें तें अर्पीतों मी तुजलागीं देवा । स्वीकार करावा ह्याचा प्रेमें ॥
मीपण हें माझें तुझेंच जाहालें । चरणीं वाहीलें सारें जीणें ॥ ॥
दास म्हणे झालों पुरताच तूझा । आतां भार माझा कोण वाही ॥

भजनसंग्रह

SURESH V. RANADE, Pune
B
3652
PERSONAL LIBRARY